सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, १३ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २५९ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# 'मला तोंड लपवावं लागतं,' नितीन गडकरी लोकसभेत स्पष्टच बोलले; म्हणाले 'इतका खराब रेकॉर्ड....'

मुंबई : आपल्या स्पष्ट आणि परखड स्वभावासाठी ओळखले जाणारे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी पुन्हा एकदा स्पष्टपणे आपलं म्हणणं मांडलं आहे. गुरुवारी लोकसभेत बोलताना त्यांनी सांगितलं की, रस्ते दुर्घटनेसंबंधी भारताचा रेकॉर्ड इतका वाईट आहे की जागतिक परिषदेत आपलं तोंड लपवावं लागतं. सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान पुरवणी प्रश्नांची उत्तरं देताना ते म्हणाले की, त्यांच्या मंत्रालयाच्या सर्व प्रयत्नांनंतरही रस्ते अपघात कमी झाले नसून वाढले आहेत.

दुर्दैवाने आपल्या देशात रस्ते अपघाताची संख्या वाढत आहे. ४ लाख ८० हजार ५८३ अपघात झाले असून मृतांची संख्या १.५ लाखावरुन १ लाख ७२ हजार ८९० झाली आहे, अशी माहिती नितीन गडकरी यांनी दिली.

### ३० टक्के लोकांना जीव वाचवणारे उपचार मिळत नाहीत

**नीति आयोगाच्या अहवालानुसार रस्ते अपघातातील ३० टक्के लोक अपघातानंतर लगेच जीव वाचवू शकणारे उपचार न मिळाल्याने मृत्यूमुखी पडतात असं नितीन गडकरींनी सांगितलं आहे. ते म्हणाले, त्यामुळे उपचारांसाठी कॅशलेस योजना आणली आहे. हा पायलट प्रोजेक्ट उत्तर प्रदेशमध्ये सुरू करण्यात आला असून, त्यानंतर तो संपूर्ण देशात लागू केला जाईल.**



नितीन गडकरी यांनी सांगितलं की, जोपर्यंत समाजाकडून सहकार्य मिळणार नाही, मानवी वर्तन बदलत नाही आणि कायद्याचा धाक नसेल तोपर्यंत रस्ते अपघातावर अकंशु बसणार नाही. नितीन गडकरींनी दिलेल्या माहितीनुसार, देशातील रस्ते अपघातांमध्ये सतत वाढ होत आहे. दरवर्षी जवळपास १.७ लाखांहून अधिक लोकांचा अशा रस्ते अपघातात मृत्यू होतो.

पुढे ते म्हणाले की, इतके लोक ना लढाईत मरतात, ना कोविडमध्ये, ना दंगलीत मरतात. मी जागतिक परिषदेत गेल्यानंतर तोंड लपवतो. (दुर्घटनांमध्ये) सर्वात खराब रेकॉर्ड आपलाच आहे. रस्ते अपघात रोखण्यासाठी खासदारांनी आपापल्या स्तरावर प्रयत्न करावेत आणि परिवहन विभागाच्या मदतीने शाळा इत्यादींमध्ये जनजागृती कार्यक्रम आयोजित करावेत, असंही त्यांनी सुचवलं आहे.

### वाहन परवाना देतोना कठोरता हवी

**भारतातील ड्रायव्हिंग लायसन्स जारी करण्याच्या पद्धतीत सुधारणा करण्याची गरज केंद्रीय मंत्र्यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, जगभरात जिथे अत्यंत सहजपणे ड्रायव्हिंग लायसन्स मिळतं त्या देशाचं नाव भारत आहे. आम्ही त्यात सुधारणा करत आहोत. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सदस्यांना रस्ते अपघात रोखण्यासाठी प्रयत्न करावेत आणि समाजाचे प्रबोधन करण्याचे काम करावे, अशी सूचना केली आहे.**

## 'एक देश एक निवडणूक' विधेयकाला अखेर मोदी कॅबिनेटची मंजुरी



नवी दिल्ली : एक देश, एक निवडणूक विधेयकाला गुरुवारी मोदी सरकारच्या मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. सरकार आता हे विधेयक संसदेत सादर करेल. सध्या हिवाळी अधिवेशन सुरु असून पुढच्या आठवड्यात हे विधेयक संसदेत मांडलं जाण्याची शक्यता असल्याची सूत्रांची माहिती आहे.

एक देश, एक निवडणूक विधेयकाला गुरुवारी मोदी सरकारच्या मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, सरकार हे विधेयक आता संसदेत सादर करण्याची शक्यता आहे. सध्या हिवाळी अधिवेशन सुरु असून पुढच्या आठवड्यात हे विधेयक संसदेत मांडलं जाण्याची शक्यता असल्याची सूत्रांची माहिती आहे. सर्वात आधी संयुक्त संसदीय समिती गठीत केला जाईल. यानंतर सर्व पक्षांकडून सूचना, सल्ले मागवले जातील. अखेरीस हे विधेयक संसदेत आणलं जाईल आणि नंतर ते पारित केलं जाईल. याआधी रामनाथ कोविंद यांच्या नेतृत्वातील समितीने सरकारकडे 'एक देश, एक निवडणूक' संदर्भात आपला रिपोर्ट सादर केला होता.

## निवडणूक काळात बदल्या केलेल्या २१५ पोलीस निरीक्षक पुन्हा पूर्ववत जागी! : डीजीकडून नवीन आदेश जारी

तभा वृत्तसेवा/जमीर काझी

मुंबई, दि.१२ डिसेंबर : निवडणूक आयोगाने बडगा दाखवल्यानंतर दीड महिन्यापूर्वी हलविण्यात आलेल्या २१५ पोलीस निरीक्षकांच्या पुन्हा त्याच पोलीस घटकात बदल्या करण्यात आहेत. निवडणूक आचारसंहिता समता राज्य शासनाने हा निर्णय घेतला आहे पोलीस महासंचालकाकडून बुधवारी रात्री त्याबाबतचे आदेश जारी करण्यात आले आहेत.

त्यामध्ये मुंबईतील तब्बल १५५ अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

महासंचालक कार्यालयाच्या या निर्णयामुळे निवडणूक आयोगाचे आदेश म्हणजे 'रात गयी बात गयी 'असे ठरले असल्याचे चर्चा आता पोलीस वर्तुळातूनच सुरू झाली आहे. निवडणूक आयोगाच्या नियमाला शासन कसे बगल देऊ शकते, याचे हे उत्तम उदाहरण असल्याचे सांगण्यात येत आहे. राज्यात विधानसभेच्या निवडणुका २० नोव्हेंबरला झाल्या त्यापूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य सरकारला दिलेल्या सूचनेनुसार चार ऑक्टोबर व ३० ऑक्टोबर रोजी मुंबईसह राज्यातील सर्व पोलीस घटकातील निवडणूक आयोगाच्या निकषांमध्ये म्हणजे एकाच जिल्ह्यात तीन वर्षाहून अधिक काळ कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्याचे आदेश जारी करण्यात आले होते. त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने बदलांच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कार्यमुक्त करून नवनियुक्त ठिकाणी हजर करण्यात आले होते. २३ नोव्हेबरला निवडणुकीचा निकाल लागून महायुती पुन्हा बहुमताने विजयी झाले त्यानंतर पाच डिसेंबरला नवे सरकार स्थापन झाले आहे. मंत्रिमंडळ विस्तार व खातेवाटप अद्याप जाहीर झाले नसले तरीही सध्या ग्रह खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पाहत आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुंबईबाहेर बदल्या झालेले अनेक अधिकारी नाराज होते त्यांना नक्षलग्रस्त व दुर्गम भागात पाठवण्यात आले होते त्यामुळे मुंबईतील अधिकाऱ्यांची कमतरता लक्षात घेऊन संबंधित अधिकारी पुन्हा मुंबई आयुक्तालयात काम करण्याची संधी द्यावी अशी त्यांच्याकडून मागणी होत होती त्याला अनुसरूनच पोलीस महासंचालकाकडून ११ डिसेंबरला राज्यातील २१५ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या त्यामध्ये चार व ३० ऑक्टोबरला मुंबई बाहेर बदल्या करण्यात आलेल्या १५५ अधिकाऱ्यांना पुन्हा मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत बदली करण्यात आली आहे. तर त्यावेळी अन्य विविध घटकातून मुंबईत बदली केलेल्या ६० अधिकाऱ्यांच्या त्यांच्या विनंतीनुसार त्यांना पूर्ववत हव्या त्या घटकात बदली करण्यात आली आहे या अधिकाऱ्यांना संबंधित ठिकाणी तातडीने हजर होण्यासाठी कार्यमुक्त करण्यात यावे असे सूचनाही घटक प्रमुखांना देण्यात आले आहेत.

### अन्य अधिकाऱ्यांच्याही होणार पूर्ववत बदल्या

**पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांबरोबरच उपनिरीक्षक सहाय्यक निरीक्षक व उपाधीक्षक सहाय्यक अधीक्षक, उपायुक्त आदी दर्जाच्या ज्या अधिकाऱ्यांच्या निवडणूक आयोगाच्या निकषाप्रमाणे बदल्या झाल्या आहेत. त्यांना पुन्हा त्यांच्या इच्छेनुसार पूर्ववत घटकांमध्ये बदल्या केल्या जातील ,असे गृह विभागातील सूत्रांकडून सांगण्यात आले.**

## अमित शाहांच्या दौऱ्यापूर्वी मोठी घडामोड; छत्तीसगडच्या नारायणपूरमध्ये ७ नक्षलवादी ठार

नारायणपूर : छत्तीसगडच्या नारायणपूर जिल्ह्यातील दक्षिण अबुझमद भागात आज सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत ७ नक्षलवादी ठार झाले. या सर्वांचे मृतदेह सापडले असून, त्यात एका उच्चपदस्थ नक्षलवाद्याचाही समावेश आहे, जो रेड मिलिटंट्सच्या केंद्रीय समितीचा भाग होता. सुरक्षा दलांनी दिलेल्या माहितीनुसार पहाटे तीन वाजल्यापासून सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये गोळीबार सुरू आहे. नारायणपूर, दंतेवाडा, जगदलपूर आणि कोंडागाव जिल्ह्याचे विशेष टास्क फोर्स, केंद्रीय राखीव पोलीस दल आणि जिल्हा राखीव रक्षक यांचे संयुक्त पथक दक्षिण अबुझमद भागात नक्षलविरोधी शोध मोहीम राबवत होते. सीआरपीएफच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार शोध मोहीम अजूनही सुरू आहे.

## अमित शाहांनी घेतली शरद पवारांची भेट

नवी दिल्ली : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांचा आज (दि.१२) ८५ वा वाढदिवस आहे. दरम्यान, वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज शरद पवारांची भेट घेतली होती. त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देखील शरद पवारांची भेट घेऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास अमित शाह ६ जनपथ निवासस्थानी दाखल झाले. खासदार सुप्रिया सुळे यांनी अमित शाह यांचे स्वागत केले. काहीच मिनिटांत अमित शाह आणि शरद पवार यांची भेट झाली. अमित शाह यांनी पुष्पगुच्छ देऊन शरद पवार यांचा सत्कार केला, तसेच निरोगी आयुष्याच्या शुभेच्छा देऊन अभिष्टचिंतन केले. आज शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्ताने उपमुख्यमंत्री अजित पवार कुटुंबियांसह त्यांना भेटायला गेले होते, त्यामुळे राजकीय वर्तुळात सर्वांनीच भुवया उंचावल्याचे पाहिला मिळाले. तसेच, अजित पवार यांनी शरद पवारांची भेट घेतल्यानंतर अनेक राजकीय तर्कवितर्क लावले जात आहेत. अशातच अमित शाह यांनी शरद पवारांची भेट घेतली. त्यामुळे वाढदिवसाच्या शुभेच्छा की, भेटीमागे काही वेगळे राजकारण आहे? अशा चर्चांनाही सुरुवात झाली आहे.

## पुढल्या वर्षी प्रत्येक चौथ्या दिवशी सुट्टी... २०२५ मधल्या १०० दिवसांच्या सुट्ट्यांची पहा यादी

मुंबई : नव्या वर्षाची सुरुवात होत नाही, तोच अनेकांना वेध लागले आहेत ते म्हणजे नव्या वर्षातील सणासुदीचे. बरं, इथं निमित्त सणाचं असलं तरीही खरं कारण आहे ते म्हणजे सुट्ट्यांच्या यादीचं. दरवर्षी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना राज्यातील महत्त्वाचे दिवस, कार्यक्रम आणि सणांच्या निमित्ताने प्रशासनाकडून सुट्टी जाहीर करण्यात येते.

२०२५ या वर्षासाठीसुद्धा अशाच सुट्टया महाराष्ट्र शासनाच्या वतीनं जारी करण्यात आलेल्या राजपत्रातून जाहीर करण्यात आल्या आहे. या राजपत्रात नमूद करण्यात आल्यनुसार येत्या वर्षात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना एकूण २५ भरपगारी सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या आहेत. राज्य शासनाच्या अख्तयारित येणाऱ्या सर्व विभागांसाठी काम पाहणाऱ्या कर्मचाऱ्यांना या सुट्टया लागू असतील.

बँक कर्मचाऱ्यांचीही मजाच मजा...

राज्य शासनाकडून देण्यात आलेल्या सुट्ट्या आणि वर्षभरातील सर्व ५२ रविवारांना असणारी सुट्टी यामध्ये जोडल्यास सरकारी कर्मचाऱ्यांच्या वाट्याला येणाऱ्या सुट्टयांचा आकडा ७७ वर पोहोचत आहे. बँक आणि तत्सम आस्थापनांमध्ये महिन्याचा दुसरा आणि चौथ्या शनिवारीसुद्धा कर्मचाऱ्यांना सुट्टी लागू असते. या हिशोबानं साधारण २६ शनिवार पकडल्यास सर्व सुट्यांसाठी पात्र असणाऱ्या या कर्मचाऱ्यांना त्यातही विशेषत: बँक कर्मचाऱ्यांना १०३ सुट्ट्यांचा लाभ घेता येणार आहे.

सरसकट सर्व शनिवार रविवारच्या सुट्टया धरून वर्षभरात सरकारी कर्मचाऱ्यांच्या सुट्ट्यांचा आकडा १०४ (शनिवार/रविवार) आणि २५ सरकारी सुट्ट्या यांची बेरीज केली असता तब्बबल १२९ सुट्ट्यांसाठी राज्य सरकारी कर्मचारी पात्र आहेत.

**महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात कोणत्या सार्वजनिक सुट्ट्यांची नोंद?**

२६ जानेवारी २०२५/ रविवार - प्रजासत्ताक दिन, १९ फेब्रुवारी २०२५/बुधवार - छत्रपती शिवाजी महाराज जयंती, २६ फेब्रुवारी २०२५/ बुधवार - महाशिवरात्री, १४ मार्च २०२५/ शुक्रवार- होळी, ३० मार्च २०२५/ रविवार- गुढीपाडवा, ३१ मार्च २०२५/ सोमवार- रमझान ईद, ६ एप्रिल २०२५/रविवार- रामनवमी, १० एप्रिल २०२५/ गुरुवार- महावीर जन्मकल्याणक, १४ एप्रिल २०२५/सोमवार- डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, १८ एप्रिल २०२५/ शुक्रवार- गुड फ्रायडे, १ मे २०२५/ गुरुवार- महाराष्ट्र दिन, १२ मे २०२५/ सोमवार- बुद्ध पौर्णिमा, ७ जून २०२५/ शनिवार- बकरी ईद, ६ जुलै २०२५/ रविवार- मोहरम, १५ ऑगस्ट २०२५/ शुक्रवार- स्वातंत्र्य दिन, १५ ऑगस्ट २०२५/ शुक्रवार- पारसी नववर्ष, २७ ऑगस्ट २०२५/ बुधवार- गणेश चतुर्थी, ५ सप्टेंबर २०२५/ शुक्रवार- ईद ए मिलाद, २ ऑक्टोबर २०२५/ गुरुवार- महात्मा गांधी जयंती, २ ऑक्टोबर २०२५/गुरुवार- दसरा, २१ ऑक्टोबर २०२५/ बुधवार- दिवाळी, ५ नोव्हेंबर २०२५/ बुधवार- गुरुनानक जयंती, २५ डिसेंबर २०२५/ गुरुवार- नाताळ,

वरील सुट्ट्यांव्यतिरिक्त वार्षिक लेखे पूर्ण करण्यासाठी राज्यातील बँकांना (शासकीय कर्मचारी वगळता) १ एप्रिल २०२५ रोजी सुट्टी लागू असेल. याशिवाय राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांना यंदा २३ ऑक्टोबर २०२५ रोजी भाऊबीजेच्या दिवशी विशेष सुट्टीसुद्धा लागू असेल.

## बाबासाहेब आंबेडकर व संविधानाचा अवमान करणाऱ्यांना कठोर शासन करा : नाना पटोले

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. १२ डिसेंबर : परभणीत भारतीय राज्यघटनेची विटंबना करण्याची घटना अत्यंत निषेधार्ह आहे. डॉ.बाबासाहेब आंबडेकर व संविधानाला मानणा-या कोट्यवधी लोकांचा घोर अपमान आहे. संविधानाची विटंबना करणा-यांच्या मुसक्या आवळून त्यांना कठोर शासन करा, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे

परभणीतील घटनेवर प्रतिक्रीया देताना ते म्हणाले की, या घटनेचा काँग्रेस पक्ष तीव्र शब्दात निषेध करत आहे. छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले आंबेडकरांच्या विचाराच्या महाराष्ट्रात संविधानाची विटंबना करणाचा प्रकार चिंतानजक व महाराष्ट्राची मान शरमेने खाली घालण्यास लावणारा आहे. परभणीत आगडोंब उसळत असताना मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री मात्र मलईदार खाती व मंत्रीपदे वाटून घेण्यात व्यस्त आहेत. या सरकारला राज्याचे काही देणेघेणे नाही.

संविधान न मानणाऱ्या विचाराचे लोक सत्तेत आहेत त्यामुळे असे प्रकार होत आहेत. असे सांगून ते म्हणाले,परभणी पोलीसांनी आंबेडकरी अनुयायांना अमानुष मारहाण केली, अश्रुधुरांच्या नळकांड्या फोडल्या, संचारबंदी लावली, इंटरनेट, एसटी सेवा बंद केली. पोलीस व प्रशासन परभणीतील परिस्थिती व्यवस्थित हाताळू शकले नाहीत. आंबेडकरी अनुयायांना केलेल्या मारहणाची चौकशी करून जिल्हा पोलीस अधिक्षक यांना तात्काळ निलंबत करावे अशी मागणी नाना पटोले यांनी केली आहे. या घटनेचा नागपूरच्या अधिवेशनात सरकारला जाब विचारू पण अशा घटना महाराष्ट्रात होणार नाहीत, याची खबरदारी घ्यावी. नागरिकांनी लोकशाही मार्गाने या घटनेचा निषेध करावा ,असे आवाहनही त्यांनी केले .

## एनआयएचे अमरावती, भिवंडीत छापे

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.१२ डिसेंबर: राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) राज्यातील भिवंडी आणि अमरावती या दोन शहरांत छापा टाकून दोघा तरुणाला ताब्यात घेतले आहे. पाकिस्तानी संघटनेच्या संपर्कात असल्याच्या संशयावरून त्यांना ताब्यात घेण्यात आले असल्याचे सूत्रांकडून सांगण्यात आले

भिवंडीतील खोणी खाडीपार ग्रामपंचायत परिसरात एनआयएकडून ही कारवाई झाली. भिवंडीत वर्षभरात झालेली ही तिसरी कारवाई आहे. तर अमरावतीच्या छाया नगरात एनआयएची टीम बुधवारी रात्री पोहचली. त्यांनी एका ३५ वर्षीय तरुणाला ताब्यात घेतले . अमरावती शहरातील राजापेठ पोलीस स्टेशनमध्ये या युवकाची सध्या चौकशी सुरू आहे. तो पाकच्या एका संघटनेच्या संपर्कात असल्याचा एनआयएला संशय आहे.

भिवंडीत यापूर्वी एनआयएने छापे टाकले होते. मागील वर्षी डिसेंबर महिन्यातच भिवंडीच्या पडघा गावात एनआयएने मोठी कारवाई करून ७ जणांना ताब्यात घेतले होते.

## गुंतवणूकदारांना राज्यात आकर्षित करण्यासाठी कंट्री डेस्क या विशेष कक्ष स्थापणार

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. १२ डिसेंबर : देश विदेशातील गुंतवणूकदारांना महाराष्ट्रात गुंतवणुकीकरिता आकर्षित करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार राज्य शासनमार्फत आता विविध उपक्रम हाती घेण्यात येत आहेत.

देशी-विदेशी गुंतवणुकीसाठी गुंतवणूकदारांच्या प्रस्तावांसाठी त्यांना सल्ला व मदत देण्यासाठी कंट्री डेस्क या विशेष कक्षाची स्थापना करण्यात येणार आहे. त्याचबरोबर नवीन गुंतवणूकीसाठी जागतिक व प्रादेशिक गुंतवणूक व्यापारासह सुसंगत धोरण तयार करण्यावर भर दिला जाणार आहे. महाराष्ट्रात प्राधान्याने गुंतवणूक व्हावी ,यासाठी संभाव्य गुंतवणूकदारांसोबत संवाद प्रस्थापित करण्यात येत आहे. याद्वारे गुंतवणुकीच्या दृष्टीने सातत्याने सहकार्य देण्यात येईल. आजपर्यंत झालेल्या सामंजस्य करारांची अंमलबजावणी जलद गतीने करण्यात येईल. त्याचबरोबर महाराष्ट्रातील गुंतवणूक संधींबाबत जागरूकता निर्माण करण्यात येणार आहे.

याअंतर्गत बहुपक्षीय संस्थांशी आणि विकास बँकांशी सहकार्य वाढवणे, दूतावास व व्यापार संघटनांशी समन्वय वाढवणे, महाराष्ट्रातील मराठी प्रवासी समुदायाला गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन देणे आणि इलेक्ट्रॉनिक्स, कापड, ऑटोमोबाईल आणि औषधनिर्मिती अशा विविध क्षेत्रांना विशेष प्राधान्य देण्यात येणार आहे.या नव्या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ , मैत्री व उद्योग संचालनालय सक्रिय भूमिका बजावणार आहे.

गुंतवणुकीसाठी सरकारचे हे प्रयत्न

- गुंतवणूकदारांना त्यांच्या प्रस्तावांमध्ये मदत करण्यासाठी कंट्री डेस्क विशेष कक्ष - जागतिक आणि प्रादेशिक ट्रेंडशी सुसंगत नवीन गुंतवणूक धोरण - शासन आणि प्रमुख औद्योगिक संस्थांमध्ये समन्वय वाढवणे - संभाव्य गुंतवणूकदारांशी संवाद - गुंतवणुकीच्या प्रक्रियेत गुंतवणूकदारांना सतत आवश्यक सहाय्य देणे - सामंजस्य करारांचा पाठपुरावा करणे आणि अंमलबजावणीची गती सुधारणे - राज्यातील गुंतवणुकीच्या संधींबद्दल जागरूकता निर्माण करणे - बहुपक्षीय संस्था आणि विकास बँकांसोबत काम करणे - दूतावास आणि व्यापारी संघटनांसोबत समन्वय वाढवणे - देशविदेशातील महाराष्ट्रीयन उद्योजक यांना महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यासाठी प्रोत्साहित करणे - इलेक्ट्रॉनिक्स, टेक्सटाईल, ऑटोमोबाईल्स, फार्मास्युटिकल्स यांसारख्या महत्वाच्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणे



## रिअल कबड्डी लीगने दुबईत ऐतिहासिक प्रदर्शनीय सामन्याचे आयोजन केले

मुंबई – रिअल कबड्डी लीग ला भारतातील अनेक राज्यांतील प्रतिभावान खेळाडूंचा समावेश असलेला पहिला आंतरराष्ट्रीय प्रदर्शन सामना जाहीर करताना अभिमान वाटतो. १५ डिसेंबर रोजी दुबईतील अल अहली स्पोर्ट्स क्लबमध्ये होणारा हा कार्यक्रम संध्याकाळी ६ वाजता सुरू होईल. दोन गतिमान संघ, इंडियन वॉरियर्स आणि गल्फ ग्लॅडिएटर्स, भारताच्या कबड्डी या स्वदेशी खेळातील जीवंतपणा आणि कौशल्य दाखवून स्पर्धा करतील. या ऐतिहासिक स्पर्धेला दुबई स्पोर्ट्स कौन्सिलचे समर्थन आहे. लविश चौधरी, सह-संस्थापक, रिअल कबड्डी लीग , आपला उत्साह सामायिक करताना म्हणाले, रिअल कबड्डी लीग चा उद्देश नेहमीच तरुण, कच्च्या आणि ग्रामीण अनपेक्षित प्रतिभेला प्रोत्साहन देणे आणि त्यांना चमकण्यासाठी एक व्यासपीठ देणे हे आहे. आरकेएलचे संस्थापक शुभम चौधरी म्हणाले, आखाती देशांमध्ये कबड्डी खेळाच्या प्रवेशासाठी हा प्रदर्शनीय सामना आधारभूत मैदान आहे आणि मला विश्वास आहे की लोकांना तो आवडेल.

## ई-कॉमर्ससाठी तयार असलेले कार्यक्षम कार्यबळ निर्माण होईल

छत्रपती संभाजीनगरी : फ्लिपकार्ट या देशांतर्गत ई-कॉमर्स भारतीय कंपनीने ई-कॉमर्सच्या पुरवठा साखळी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी आणि प्रमाणित करण्यासाठी एक आद्य उपक्रम म्हणून 'सप्लाय चेन ऑपरेशन्स कॅडमी' (एससीओए) या संस्थेची स्थापना केली आहे. अत्यंत वेगाने वाढणाऱ्या ई-कॉमर्स क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी आणि स्थानिक पुरवठा साखळी परिसंस्था मजबूत करण्यात मदत करण्यासाठी एससीओए चांगल्या सेवेपासून वंचित असलेल्या स्थानिक भागांमधील तरुणांना मोफत व उद्योगाभिमुख प्रशिक्षण देत आहे. 'एससीओए'ने २०२४ मध्ये तीन हजारांपेक्षाही अधिक उमेदवारांना प्रशिक्षण दिले आहे. त्यामध्ये २० टक्के महिलांचा समावेश आहे. यावरून फ्लिपकार्टची विविधतेप्रति आणि सर्वसमावेशकतेप्रति असलेली बांधिलकी स्पष्ट होते. या उपक्रमातील सहभागींना फ्लिपकार्टच्या सुविधा आणि ऑनलाइन वर्ग सत्रांमध्ये ४५ दिवसांमध्ये प्रत्यक्ष अनुभवाच्या माध्यमातून प्रत्यक्ष काम करताना आवश्यक असलेली कौशल्ये प्राप्त करता येतात.

## लॉरिझ्म नुडसेन इलेक्ट्रिकल अँड ऑटोमेशन हे मुंबई इंडियन्सचे नवीन प्रमुख भागीदार आहेत

छत्रपती संभाजीनगरी – लॉरिझ्म नुडसेन इलेक्ट्रिकल आणि ऑटोमेशन, भारतीय इलेक्ट्रिकल आणि ऑटोमेशन उद्योगातील एक प्रमुख कंपनी आणि भारतातील श्नाइडर इलेक्ट्रिक समूहाचा एक घटक, यांनी आज सर्वात मोठ्या आणि सर्वात मौल्यवान क्रिकेट फ्रँचायझींपैकी एक मुंबई इंडियन्ससोबत 'मुख्य भागीदार' म्हणून धोरणात्मक भागीदारीची घोषणा केली. या ऐतिहासिक भागीदारीचा एक भाग म्हणून, २०२५ च्या मोसमापासून सुरू होणाऱ्या क्रिकेट हंगामात मुंबई इंडियन्सच्या अधिकृत जर्सी आणि प्रशिक्षण पोशाखाच्या समोरच्या बाजूस वानखेडे आणि संघाच्या ५० दशलक्ष जागतिक चाहत्यांपर्यंत पोहोचणारा, लॉरिझ्म नुडसेन लोगो ठळकपणे दिसेल.

## भारत समुद्री विरासत सम्मेलननासह जागतिक सागरी वारसा जतन करण्यासाठी पुढाकार घेतला

नवी दिल्ली – बंदरे, जहाज व जलमार्ग मंत्रालय (चेझडच) द्वारे यशोभूमी, द्वारका, नवी दिल्ली येथे आयोजित बहुप्रतिक्षित भारत समुद्री विरासत सम्मेलन २०२४ च्या उद्घाटन दिवसाची आज एका विशेष सत्राने सुरुवात झाली. माननीय उपाध्यक्ष श्री जगदीप धनखर यांनी संबोधित केले ज्यांनी भावी पिढ्यांसाठी भारताचा सागरी वारसा जतन करण्याच्या महत्त्वावर भर दिला. या परिषदेत जगभरातील प्रमुख मंत्री, प्रमुख वक्ते, सागरी तज्ज्ञ आणि विचारवंत सहभागी झाले होते, भारताचा समृद्ध सागरी वारसा, जगभरातील सांस्कृतिक आणि आर्थिक देवाणघेवाण घडवण्यात त्याची महत्त्वाची भूमिका आणि शाश्वत सागरी नवकल्पना यावर भर देण्यात आला होता. सागरी महासत्ता म्हणून त्याचा उदय झाला.

## आंतरराष्ट्रीय फर्निचर आणि सजावटीच्या उत्पादनांवर ७०% पर्यंत सूट

नवी मुंबई – रॉयलओक फर्निचर या भारतातील आघाडीच्या फर्निचर ब्रँडने, प्रीमियम आंतरराष्ट्रीय फर्निचर आणि घराच्या सजावटीच्या वस्तूंच्या विस्तृत श्रेणीवर ७०% पर्यंत सवलत देत वर्षअखेरीच्या विक्रीची घोषणा केली आहे. ही अविश्वसनीय ऑफर संपूर्ण सुट्टीच्या हंगामात जानेवारी २०२५ पर्यंत वैध आहे, जी ग्राहकांना अप्रतिम किमतीत त्यांची घरे वाढवण्याची उत्तम संधी प्रदान करते. रॉयलॉक इयर-एंड सेलमध्ये त्याच्या अमेरिकन, इटालियन, मलेशियन आणि एम्परर कलेक्शनमधील सर्व उत्पादनांवर सवलत असेल ज्यामध्ये लिव्हिंग रूम सेट, बेडरूम फर्निचर, डायनिंग टेबल, ऑफिस फर्निचर, आउटडोअर फर्निचर, होम डेकोर उत्पादने आणि बरेच काही समाविष्ट आहे. ग्राहक समकालीन डिझाईन्स, क्लासिक पीस किंवा आलिशान टचसह त्यांचे घर अपग्रेड करू पाहत असले तरीही, प्रत्येक चव आणि बजेटसाठी काहीतरी आहे.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरने नवीन कॅमरी हायब्रिड इलेक्ट्रिक व्हेइकल सादर केली

बंगळुरू, ११ डिसेंबर २०२४ – टोयोटा किर्लोस्कर मोटरने आज ऑल-न्यू कॅमरी हायब्रिड इलेक्ट्रिक व्हेईकलचे अनावरण केले, जे सेडान टू द कोर म्हणून डिझाइन करण्यात आले आहे. कार्बन-न्यूट्रल उद्दिष्टे साध्य करण्याच्या दिशेने वचनबद्धतेचा पुनरुच्चार करत, ऑल-न्यू कॅमरी हायब्रिड इलेक्ट्रिक व्हेईकल प्रगत ५व्या पिढीच्या हायब्रिड तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे, ज्यामुळे इंधन कार्यक्षमता आणि कार्यप्रदर्शनात लक्षणीय सुधारणा झाली आहे. या नव्या मॉडेलमध्ये उत्कृष्ट सुरक्षा वैशिष्ट्ये, उन्नत बाह्य आणि आतील डिझाइन, आणि अतिशय सुरळीत तंत्रज्ञान एकत्रिकरणासह अनोखी विशेषता असून ते ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करते. ऑल-न्यू कॅमरी हायब्रिड इलेक्ट्रिक व्हेईकल हे केवळ एक कार नाही – हे परिष्कृत स्टाइल आणि विशेषतेचे प्रतीक आहे.

## 'सा रे ग म प' च्या सेटवर सिमरत कौरने सांगितल्या नाना पाटेकरच्या खेळकर खोड्यांबद्दल

झी टीव्हीवरील 'सा रे ग म प' हा लोकप्रिय गायन रिॲलिटी शो आपल्या गुणी स्पर्धकांसह प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे आणि त्यांना प्रेरणाही देत आहे. हा प्रतिष्ठित मंच प्रगल्भ होऊन भावी गायकांच्या कारकिर्दीला आकार देणारा एक प्रतिष्ठित 'लाँचपॅड' बनला आहे, त्यांना मेंटॉरशिप प्रदान केली जात आहे आणि त्यांना अगदी असमांतर प्रसिद्धीही प्राप्त होत आहे. ह्या शोमधील स्पर्धा शिगेला पोहोचली असून अख्खा देश थक्क होऊन आपल्या आवडत्या स्पर्धकासाठी चीअर करत आहे आणि त्यांना केवळ गायकापासून कसलेल्या कलाकारांमध्ये परावर्तित होताना पाहत आहे. ह्या शोमधील सन्माननीय मेंटॉर्स सचिन-जिगर, सचेत परंपरा आणि गुरू रंधावा हे त्यांचे कौशल्याने संवर्धन करत आहेत.

## ग्वाल्हेरमध्ये साजरा केला मालिकेचा पहिला वर्धापन दिन

गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये सुरू झालेली एण्ड टीव्हीवरील मालिका 'अटल'ने भारतातील सर्वात प्रख्यात नेत्यांपैकी एक स्वर्गीय श्री. अटल बिहारी वाजपेयी यांच्या सुरूवातीच्या काळाला उत्तमरित्या सादर करत प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. मालिकेचा पहिला वर्धापन दिन साजरा करत मुख्य कलाकार यंग अटलची भूमिका साकारणारा आयुध भानुशाली आणि कृष्णा देवी वाजपेयीची भूमिका साकारणाऱ्या नेहा जोशी यांनी दिग्गज नेत्याचे जन्मस्थान ग्वाल्हेरला भेट दिली. एण्ड टीव्हीच्या या उल्लेखनीय उपक्रमामधून प्रेक्षकांशी संलग्न राहण्याची चॅनेलची कटिबद्धता दिसून येते. या उपक्रमामधून चॅनेलचा हिंदी भाषिक बाजारपेठांमधील आपले स्थान दृढ करण्यावरील फोकस निदर्शनास येतो, ज्यामधून महानगर शहरांपलीकडील प्रेक्षकांशी संलग्न होणाऱ्या कथानकांची आणि अशा प्रख्यात व्यक्तिमत्त्वांच्या वारसाला सन्मानित करण्याची खात्री मिळते.

# सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी नाविन्यपूर्ण व्यवसायांचा अंगिकार आवश्यक– पंकजकुमार बन्सल

छत्रपती संभाजीनगर,दि.१२ – केंद्रशासनाच्या 'सहकारातून समृद्धी' या महत्त्वाकांक्षी योजनेनुसार सहकार चळवळ बळकट करण्यासाठी आधुनिकीकरण व नाविन्यपूर्ण व्यवसायांचा अंगिकार करणे आवश्यक आहे. त्याकरीता जिल्ह्यातील सहकारी संस्थांचे अद्यावतीकरण करावे,असे निर्देश सहकार विभागाचे केंद्रीय सहसचिव पंकजकुमार बन्सल यांनी आज दिले.

केंद्रीय सहसचिवांच्या प्रमुख उपस्थितीत आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेण्यात आली. बैठकीस एन.सी.डी.सी.चे अधिकारी विनित नारायण, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, विभागीय सह निबंधक शर्द जरे, नाबार्डचे क्षेत्रिय व्यवस्थापक सुरेश पटवेकर, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था डॉ. मुकेश बारहाते, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक मंगेश केदार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, सहा. आयुक्त अन्न व औषध प्रशासन शा. ना. साळे, जिल्हा दुग्ध व्यवसाय अधिकारी मनिषा हराळ मोरे, वीज वितरण कंपनीचे संदीप दरवडे, जिल्हा मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी मधुरिमा जाधव, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अजय मोटे तसेच अन्य विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सहकार विभागांतर्गत येणाऱ्या केंद्रीय योजनांचा आढावा घेण्यात आला. जिल्ह्यात नवीन विविध कार्यकारी सेवा सोसायट्या स्थापन करणे, विविध कार्यकारी सेवा संस्थांनी नाविन्यपूर्ण व्यवसाय सुरु करणे. डेअरी, मत्स्य व्यवसाय, जनऔषधी केंद्र, धान्य गोदामे, खते-बि-बियाणे, पेट्रोल पंप इ. गोदाम बांधकामांसाठी प्रस्ताव तयार करणे, आपले सेवा केंद्र सारखे सेवा केंद्र सुरु करणे. धान्य खरेदी केंद्र सुरु करता यावे यासाठी विविध तांत्रिक बाबींची पूर्तता करणे अशा विविध विषयांबाबत आढावा घेण्यात आला. तसेच जिल्ह्यात सहकारी संस्थांमार्फत करता येण्यासारख्या मत्स्य व्यवसाय, दूध संकलन केंद्र, दाळ प्रक्रिया व्यवसाय अशा विविध व्यवसायांच्या अनुषंगाने आढावा घेण्यात आला. तसेच सहकारी संस्थांचे संगणकिकरण करुन त्यांचे अद्यावतीकरण करण्याबाबतही आढावा घेण्यात आला.

## अंतर्गत तक्रार निवारण समितीची स्थापना करून माहिती; ऑनलाइन करण्याचे महिला व बालविकास विभागाचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.१२ : कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण अधिनियमाअंतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक शासकीय, निमशासकीय, खाजगी कार्यालयामध्ये ज्या आस्थापनेवर दहा किंवा दहापेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत आहेत, अशा प्रत्येक कार्यालयामध्ये अंतर्गत तक्रार निवारण समितीची स्थापना करून याबाबतची माहिती ऑनलाईन करावी,असे आवाहन महिला व बालविकास विभागाने केले आहे.

समितीमध्ये कार्यालयातील वरिष्ठ महिला अध्यक्ष, तसेच महिलांच्या प्रश्नांशी बांधीलकी असलेल्या किंवा ज्यांना सामाजिक कार्याचा अनुभव व कायद्याचे ज्ञान आहे, अशा कर्मचाऱ्यांमधून किमान दोन सदस्य, तसेच अशासकीय संघटना किंवा लैंगिक छळाशी संबंधित प्रश्नांशी परिचित असलेल्या व्यक्ती यामधील एक सदस्य असावा, समितीमध्ये किमान ५० टक्के सदस्य महिला राहतील व समितीचा कार्यकाल हा तीन वर्षाचा राहील.

शासनस्तरावर अंतर्गत तक्रार समितीची माहिती ऑनलाईन अपडेट करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यासाठी प्रत्येक कार्यालयाने अंतर्गत तक्रार समिती स्थापन केल्याची माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, कार्यालय पत्ता:- प्लॉट नंबर-९ श्री. जाधव, यांची इमारत खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे प्रत्यक्ष किंवा ई-मेल आयडी वळीीं\ुशपलूरहे.लो वर तात्काळ सादर करावी. ज्या कार्यालयामध्ये/ आस्थापनेवर दहापेक्षा कमी कर्मचारी कार्यरत आहेत त्यांनी स्थानिक तक्रार समिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे आपली तक्रार नोंदवावी, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी आर.एन. चिमंद्रे यांनी केले आहे.

# बांग्लादेशात हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराविरोधात जनआक्रोश मोर्चा तहसिलवर धडकला

**तभा वृत्तसेवा**
**माहूर दि.१० डिसेंबर**



भारताचा शेजारील देश असलेल्या बांग्लादेशात हिंदूंवर अत्याधिक अत्याचार होत आहेत. हिंदू धर्मिय नागरिक साधु,संत यांच्यावर अमानुष हल्ले केले जात आहेत.हिंदूंची मंदिरे,धार्मिक संस्थाने देखील लक्ष्य केली जात आहे.या अमानुष व क्रुर अत्याचारविरोधात माहूर तालूका सकल हिंदू समाजाच्यावतीने प.पू.चिंतामण भारती महाराज,बाळू महाराज काकाणी व गोपाल गुरे महाराज यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार दि.१० डिसेंबर रोजी सकाळी ११वाजता स्थानिक कपीलेश्वर मंदिर परीसरात जनआक्रोश सभेचे आयोजन करण्यात येऊन निषेध व्यक्त करण्यात आला.हिंदूंवरील हल्ल्याविरोधातील निषेध करत हे हल्ले रोखण्यासाठीचे लेखी निवेदन तहसील प्रशासनामार्फत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देण्यासाठी सदरील आक्रोश मोर्चा लोकशाही मार्गाने तहसील कार्यालयावर धडकला.

१० डिसेंबर या जागतिक मानवाधिकार दिवसाचे औचित्य साधून जागतिक मानवाधिकार आयोगाने दखल घ्यावी, तसेच हिंदुवरील हल्ले तात्काळ थांबवावेत या हेतूने सदर आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चात भाजपाचे तालुकाध्यक्ष कांतराव घोडेकर, नगरसेवक सागर महामुने,व्हिजेएनटी प्रदेश सचिव अनिल वाघमारे,हिमालय राऊत, सौरभ भोपी, कृष्णा बेलखोडे, विकास कपाटे, वसंत कपाटे, ड. दिनेश येऊतकर, हर्षदीप दीक्षित, श्याम काण्णव, संतोष पवार, विनोद सूर्यवंशी, विजय आमले, अपील बेलखोडे, पवन शर्मा, संतोष तामखाने, संजय बनसोडे,अथर्व बेलखोडे, मनीष काण्णव, आदित्य काण्णव, नितेश राठोड, ज्ञानेश्वर कल्लेवाड, निळकंठ मस्के, राजू दराडे, सागर राठोड, देविदास पवार, मनीष राठोड, अजय पवार, रोहित वाघमारे, शोभा महामुने, पद्मा गिऱ्हे, रंजना पाटील यांचेसह असंख्य हिंदू बंधु भगिनींनी स्वयंस्फूर्तीने सहभाग घेतला.भारत माता की जय!, वंदे मातरम् ! या उद्घोषणेसह बांग्लादेशाचा निषेधघोषणांनी अख्खे माहूर शहर दणाणून गेले होते.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना यासंदर्भातील पाठविण्यात येणारे निवेदन तहसीलदार डॉ. राजकुमार राठोड यांनी स्वीकारले. यावेळी प्रभारी पो.नि.शिवप्रकाश मुळे यांनी आपल्या पोलिस कर्मचाऱ्यांच्या फौजफाट्यासह चोख बंदोबस्त ठेवला होता.

# नवजीवन हॉस्पीटल येथे आयोजित रक्तदान शिबिरात २६ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**मुक्रमाबाद,दि. ११ डिसेंबर**



मुक्रमाबाद येथील डॉ. सुधाकर रेड्डी किनीकर यांच्या दवाखान्यातील कर्मचारी गणेश व्यंकटराव होकर्णे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून राधाई ब्लड बँक उदगीर तर्फे रक्तदान शिबिर आयोजित केले. या शिबिरात एकूण २६ रक्तदात्यांनी आपले रक्तदान करून एक सत्कार्य व गौरवास्पद कामगिरी केली त्या सर्व रक्तदात्यांचे राधाई ब्लड बँक उदगीर तर्फे खूप आभार व अभिनंदन करण्यात आले. या रक्तदान शिबिरास डॉक्टर असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. अनिल पंदीलवार, डॉ.पी एम पाटील ,डॉ.सुधाकर रेड्डी, डॉ. व्यंकटेश भाटापुरकर, डॉ. लिंगराज गंदीगुडे, डॉ.अमोल येमेकर ,डॉ.गणेश राचलवार, डॉ. तुकाराम हळदेकर व ग्रा.प. सदस्य बालाजी पसरगे , हेमंत खंकरे ,राहुल इंदुरे व पत्रकार अशोक लोणीकर , संजय राचलवार या सर्वांनी रक्तदात्यांचे आभार मानले. आपल्या कर्मचाऱ्याच्या वाढदिवसा निमित्ताने घेतलेल्या रक्तदान शिबिराचे डॉक्टर सुधाकर रेड्डी यांचे मुक्रमाबाद परिसरातुन कौतुक होत आहे.



**बंजारा समाजाचे धर्मगुरू व विधानसभेचे आमदार डॉ बाबूसिंग महाराज मुखेड येथे आले असताना आमदार डॉ. तुषार राठोड यांचे स्विय सहाय्यक सुधीर चव्हाण यांनी रेस्टहाऊस येथे त्यांचे शाल व पुष्पहार घालून स्वागत केले यावेळी माधव राठोड राजू राठोड अशोक चव्हाण राजेश गजलवाड करण रोडगे श्रीनिवास राठोड देविदास राठोड पंकज जाधव विकास चव्हाण किरण चव्हाण सचिन चव्हाण सदानंद देवकते अमोल चव्हाण संदीप काळे व सर्व बंजारा समाज बांधव उपस्थित होते. (छायाचित्रकार गणेश आंबेकर मुखेड)**

## कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र:दि.२० पर्यंत सुरु राहणार शोध मोहिम

छत्रपती संभाजीनगर,दि.१२ – सन २०२७ पर्यंत शुन्य कुष्ठरुग्ण प्रसार हे ध्येय्य साध्य करण्यासाठी समाजातील व्यक्तिंची प्रत्यक्ष शारिरीक तपासणी करुन कुष्ठरुग्ण शोध मोहिम दि.१६ ते २० डिसेंबर या कालावधीत होणार आहे. या कालावधीत नागरिकांनी आपल्या घरी येणाऱ्या आरोग्य सेवकांना तपासणी करु द्यावी व योग्य ती माहिती द्यावी,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे.

कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) शोध मोहीम २०२४-२५ सुरु होत असून त्याच्या नियोजनासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात (दि.१० रोजी) बैठक घेण्यात आली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी हे अध्यक्षस्थानी उपस्थित होते.मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर, जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ.दयानंद मोतीपवळे, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) डॉ.शिवकुमार हालकुडे, मनपा आरोग्य अधिकारी डॉ.पारस मंडलेचा, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.वैशाली डकले पाटील तसेच सर्व वैद्यकीय अधीक्षक व सर्व तालुका आरोग्य अधिकारी हजर होते.

बैठकीत माहिती देण्यात आली की, शास्वत विकास ध्येयाच्या अंतर्गत केंद्र शासनाने शुन्य कुष्ठरुग्ण प्रसार हे उददीष्ठ निश्चित केले आहे. त्यासाठी समाजातील नविन कुष्ठरुग्ण शोधुन त्यांना बहुविध औषधोपचाराखाली आणणे आवश्यक आहे. दि. १६ ते २० या कालावधीत जिल्ह्यात विटभट्टी कामगार,खाण कामगार,स्थलांतरीत व्यक्ती, बांधकाम मजूर, आश्रमशाळा, वस्तीगृहात राहणारे विद्यार्थी तसेच कारागृहातील कैदी यांची प्रत्यक्ष शारीरीक तपासणी करण्यात येणार आहे. आशा कार्यकर्ती व पुरुष स्वयंसेवक यांचे मदतीने प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्यात येणार आहे. नागरिकांनी फिक्कट लालसर बधीर चट्टा. तेलकट गुळगुळीत चमकदार त्वचा, कानाच्या जाड पाळ्या, दुखऱ्या मज्जातंतु, हातापायाला मुंग्या येणे व अशक्तपणा येणे इ. लक्षणे दिसल्यास शासकीय रुग्णालयात तपासणी करुन घ्यावी,असे आवाहन करण्यात आले.

# मुदखेड येथे कैंतय्या स्वामी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ११ डिसेंबर**



मुदखेड शहरात बुरुड समाजाचे दैवत कैतय्या स्वामी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे. शहरातील कालेजी मंदिर रोडवर एका चौकाला कैतय्या स्वामी यांचे नाव देऊन चौकाचा अनावरण सर्व राजकीय पक्षांच्या उपस्थितीत करण्यात आले आहे.

महात्मा बसवेश्वर चौकात कैतय्या स्वामी यांच्या प्रतिमेचं पूजन बुरुड समाजाचे जिल्हा अध्यक्ष मोहन पटकूटवार यांच्या हस्ते पुष्पहार घालून करण्यात आले आहे. बुरुड समाजाचे आराध्य दैवत कैतया स्वामी यांच्या जीवन चारित्र्यावर जिल्हाध्यक्ष मोहन पटकूटवार, तालुका अध्यक्ष शंकरराव पटकूटवार, सौ.पदमावती पटकूटवार, प्रविण गायकवाड, माधव कदम, कैलास गोडसे, राजू टेकले, शंकर राठी, ईश्वर पिन्नलवार, गंगाधर डांगे, हेमंत चरलेवार, निलेश गुडमलवार यांनी विचार मांडले. कु. श्रुती मारुती गुरुमलवार या चिमुकलीने येथे या स्वामी यांच्या जीवनावर कविता सादर केली.

या कार्यक्रमाप्रसंगी साईनाथ गुडमलवार,साई नागेश्वर, रामसिंग चव्हाण, ऋषिकेश पारवेकर, बाबा चंद्रे, अमोल आबादार, संजय सोनटक्के, रावसाहेब चौदंते, किशोर पारवेकर,इम्रान सेठ मच्छीवाले,मुजिब पठाण, गिरीश कोत्तावार, सचिन चंद्रे, विनोद चंद्रे, गजानन कमळे,कानोबा बिस्मिले, आकाश सोनटक्के, ईश्वर पिन्नलवार, संजय कोलते,धम्मदाता कांबळे, संतोष सावंत, प्रभाकर पांचाळ, अंकुश मामीडवार, पिन्टू बोडके,राजु टेकले,शरद कवळे, संजय चव्हाण , चादू बोकेफोड, शैलेश बोडके,शिवा तोटेवाड,आब्बू गुडमलवार, गणेश गुडमलवार, विठ्ठल गुडमलवार, शंकरराव गुडमलवार, रामराव गूडमलवार,बालाजी गुडमलवार, राजेश पेंढारकर , पिंटू येरपलवाड, संतोष गुडमलवार, यांची प्रमुख उपस्थिती होती. केतया स्वामी यांची जयंती यशस्वी करण्यासाठी बुरुड समाजाचे युवा कार्यकर्ते मारोती गुडमलवार,राजु गुडमलवार, निलेश गुडमलवार, अनिल गुडमलवार, शैलेश गुडमलवार, व्यंकटेश गुडमलवार, मनोज गुडमलवार, आकाश गुडमलवार, विक्रांत पेंढारकर, अंकुश गुडमलवार यांच्यासह आदींनी परिश्रम घेतले आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय कोलते यांनी केले तर आभार प्रदर्शन गणेश गुडमलवार यांनी मांडले.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत वरवंडी तांडा नं २

## जिल्ह्यातून प्रथम क्रमांक ११ लाखाचे पारितोषिक



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १२ मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत पैठण तालुक्यातील वरवंडी तांडा नं २ शाळेचा छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातून प्रथम क्रमांक. शाळेला मिळणार तब्बल ११ लाखाचे पारितोषिक.

शाळेचे मुख्याध्यापक .सुभाष भानुसे, शिक्षक आसराजी सोंडगे,भाऊसाहेब कोथिंबीरे, मनीषा पेठे, उज्वला क्षीरसागर, सुभाष माणके, गजेंद्र बारी, भरत काळे व सर्व ग्रामस्थ, सर्व विद्यार्थी, सर्व पालक या सर्वांच्या योगदानामुळे हे शक्य झाले.या यशाबद्दल शिक्षणाधिकारी जयश्रीताई चव्हाण, उपशिक्षणाधिकारी नीता श्रीमाळ मॅडम,गिता तांदळे मॅडम, गटशिक्षणाधिकारी श्रीराम केदार, शिक्षण विस्तार अधिकार मुश्ताक शेख,केंद्रप्रमुख सुदाम चंद्रटिके, संजीव बोचरे यांनी विशेष अभिनंदन केले.

## श्री साईनाथ रुग्णालयात महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेतून मोफत उपचार सुविधेस सुरुवात



शिडी, दि.१२ – श्री साईबाबा संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालय येथे महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेतून मोफत उपचार सुविधेची सुरुवात करण्यात आली. श्री साईबाबा संस्थानेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब कोळेकर यांच्या हस्ते रूग्णांची नोंदणी करून मदत केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी प्रभारी वैद्यकीय संचालक डॉ.प्रीतम वडगावे, प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ.मैथिली पितांबरे, जनसंपर्क अधिकारी सुरेश टोलमारे, प्रभारी अधिसेविका नजमा सय्यद ई. डी. पी. मॅनेजर अनिल शिंदे, साईप्रसाद जोरी यांचेसह आरोग्य मित्र तसेच रुग्णालयातील डॉक्टर्स, नर्सिंग स्टाफ व इतर कर्मचारी उपस्थित होते. श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल येथे महात्मा फुले जन आरोग्य योजना २०१३ पासून सुरु करण्यात आलेली आहे. या योजनेच्या मार्फत हृदय, मेंदुच्या तसेच इतर विविध आजाराचे उपचार मोफत केले जातात. त्याच धर्तीवर श्री साईनाथ रुग्णालयातही महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून पात्र रुग्णांवर मोफत उपचार दिले जाणार आहे. श्री साईबाबा हॉस्पिटल हे महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेच्या अमंलबजावणीच्या बाबतीत राज्यात प्रथम क्रमांकावर असून श्री साईनाथ रुग्णालयसुद्धा त्याच धर्तीवर राज्यात योजनेच्या बाबतीत अग्रगण्य बनवावे, अशी अपेक्षा श्री.कोळेकर यांनी याप्रसंगी व्यक्त केली.

## क्षयमुक्त अभियान:CY-TB चाचणीस आजपासून प्रारंभ; सर्व सार्वजनिक आरोग्य संस्थांमध्ये होणार मोफत चाचणी

छत्रपती संभाजीनगर,दि.१२ – भारत सरकारच्या क्षयरोग मुक्त अभियानातील केंद्रीय क्षयरोग विभागामार्फत सुप्त अवस्थेतील क्षयरोग संसर्गाच्या पूर्व निदानासाठी सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया यांच्या मार्फत उध-ढइ चाचणी जिल्ह्यात सुरु करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत आज उध-ढइ चाचणी करण्याची प्रातिनिधिक सुरुवात आज करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात उपसंचालक डॉ.कांचन वानेरे, सहाय्यक संचालक (वैद्यकीय) आरोग्य सेवा डॉ. रामटेके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.वैशाली डकले पाटील, जागतिक आरोग्य संघटना सल्लागार डॉ. कौस्तुभ दासगुप्ता, वैद्यकीय अधिकारी डॉ. विलास विखे पाटील व जिल्हा क्षयरोग केंद्र कार्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

क्षयरोगाचे जिवाणू शरीरात सक्रिय होण्यापुर्वी सुप्त अवस्थेतील क्षयरोगाचे लवकर निदान केल्यास पुढील क्षयरोगाचा प्रतिबंध करता येतो. अतिजोखीमग्रस्त व क्षयरुग्णांच्या सहवासातील नागरिकांची तपासणी करणे गरजेचे आहे.सर्व सार्वजनिक आरोग्य संस्थेमध्ये ही चाचणी मोफत आहे. सुप्त अवस्थेतील क्षयरोगाचे जिवाणु हे सक्रिय अवस्थेत रुपांतरीत होण्यापुर्वी ही तपासणी करण्यात येते. ही तपासणी दूषित आढळुन आल्यास अशा रुग्णांना क्षयरोग प्रतिबंधात्मक उपचार हे सार्वजनिक आरोग्य संस्थेमार्फत देण्यात येते. त्यामुळे नवीन क्षयरोग निदान होण्याचे प्रमाणात घट होईल. जिल्ह्यातील क्षयरुग्णांच्या संपर्कातील व अतिजोखमीच्या गटातील व्यक्तिंनी ही तपासणी करुन घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागामार्फत करण्यात आले आहे. ही चाचणी जिल्ह्यातील सर्व ग्रामीण, उपजिल्हा व जिल्हा रुग्णालयात तसेच सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र व उपक्रेंद्र येथे तपासणी मोफत स्वरुपात उपलब्ध आहे,असेही कळविण्यात आले आहे.

## मुख्याधिकारी विकास मीना तालुक्याच्या दौऱ्यावर घेतला कामांचा आढावा



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१२ डिसेंबर :- तालुक्यातील विविध विकास कामांचा आढावा घेण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्याधिकारी विकास मीना कन्नड तालुक्यात दि.१२ रोजी आले होते,

तालुक्यातील जलजीवन मिशन,मग्राहेयो, दलित वस्ती सुधार योजना,हतनुर आरोग्य केंद्र,आदी विकास कामांचा आढावा त्यांनी घेतला यावेळी जल जीवन मिशनचे अपूर्ण कामे तत्काळ मार्गी लावण्याचे त्यांनी सूचना दिल्या तर दलित वस्ती सुधार योजनेवर भर देऊन तत्काळ मार्गी लावण्यात यावे अशी सूचना त्यांनी केली, यावेळी गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकने,गटशिक्षणाधिकारी नीता श्रीमाळ, उपकार्यकारी अभियंता डी.डी.कुलकर्णी,विजय कांबळे,तालुका आरोग्य अधिकारी योगेश सोळुंखे, कार्यालयीन अधिक्षक राजेंद्र चव्हाण,विस्तार अधिकारी संतोष दारकुंडे, संदीप चव्हाण, बी.आर.सी.कल्पेश राठोड,ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष योगेश धाडवले, सचिव साईनाथ जाधव आदींची उपस्थिती होती

## स्व.गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त केले अभिवादन



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१२ डिसेंबर – तालुक्यात विविध ठिकाणी स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले,

,हस्ता,मेहगाव येथील भगवान गड,शिवराई, वासडी आदी गावांत मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली शहरातील पिशोर नाका येथे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले यावेळी भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत देशाच्या राजकारणात स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचे किती महत्वाचे योगदान होते याची माहिती दिली,यावेळी राजकिय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह नागरिकांनी अभिवादन केले,यावेळी भाजपा जिल्हाअध्यक्ष संजय खंबायते, शहराध्यक्ष सुनील पवार,सामाजिक कार्यकर्ते सिद्धार्थ निकाळजे,संतोष पवार,श्रीराम घुगे,दिपक दाभाडे,योगेश अंभोरे,दिपक शिरसाठ,संदेश पवार,सतीश घनेघर,सोमनाथ दाभाडे,आदींची उपस्थिती होती

## पवन दिलीप जाधव यांचे निधन



तभा वृत्तसेवा

कन्नड :- शहरातील बालाजी नगर खांडसरी परिसरातील रहिवासी पवन दिलीप जाधव वय ३० वर्ष यांचे अल्पशा आजाराने दि.११ रोजी जिल्हा रुग्णालयात दुखत निधन झाले. पवन यांच्या पश्चात आई,वडील,पत्नी,एक मुलगी, एक भाऊ,बहीण,भाऊजी,असा परिवार आहे,दि.१२ रोजी ११ वाजेच्या सुमारास मक्रणपुर येथे शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्तांचे सर्वेक्षण होणार

### महानगरपालिकेत आढावा बैठक; प्रशासक यशवंत डांगे यांची माहिती

अहिल्यानगर – अहिल्यानगर शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व मालमत्तांचे महानगरपालिकेमार्फत सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. याद्वारे महानगरपालिका क्षेत्रातील सर्व जागा व मालमत्तांची, इमारतींची, घरांची मोजमापे घेऊन मूल्यांकन करण्यात येणार आहे. मार्च अखेरीपर्यंत हे काम पूर्ण करण्याचे आदेश महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी दिले आहेत. दरम्यान, गेल्या २० वर्षात शहरात सर्वेक्षण झालेले नाही. महापालिका अधिनियमानुसार दर पाच वर्षांनी सर्वेक्षण होऊन पुनर्मूल्यांकन करणे अपेक्षित आहे. आता हाती घेतलेल्या मालमत्तांच्या सर्वेक्षणामुळे व पुनर्मूल्यांकनामुळे शहरातील सर्व मालमत्तांना कर आकारणी होईल. मार्च महिन्यानंतर नव्या मोजमापांच्या नोंदीनुसार कर आकारणी केली जाणार आहे.





यातून महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल असा विश्वास प्रशासक डांगे यांनी व्यक्त केला.

प्रशासक तथा आयुक्त यशवंत डांगे यांनी गुरुवारी महानगरपालिकेत सर्वेक्षणाचा आढावा घेतला. अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील सर्व जमीन व इमारती यांचे सर्वेक्षण करून आवश्यक माहिती संकलीत करणे, मुल्यांकन व आवश्यक तांत्रिक सेवा संगणकीकरण करणे, विविध आज्ञावली विकसीत करून इतर कामे करणे, यासाठी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार महानगरपालिका प्रशासनाकडून मे. सी. ई. इन्फो सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड यांना कार्यारंभ देण्यात आला आहे. मालमत्तेची डिजिटल छायाचित्रे, जिओ टॅगींग, तसेच मालमत्तेच्या अंतर्गत मोजमापांसाठी, त्यांचे कारपेट व बिल्टअप क्षेत्र डीजीटल उपकरणाद्वारे मोजण्यात येणार आहे. महानगरपालिकेचे वसुली लिपिक व मे. सी. ई. इन्फो सिस्टीम लिमिटेड यांच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत हे काम केले जात आहे. त्यासाठी वसुली लिपिक व वसुली मदतनीस आदींची नियुक्ती करण्यात आली आहे.

मालमत्ताधारकांनी मालमत्ता सर्वेक्षणासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांची ओळख तपासून त्यांना सहकार्य करावे. त्यांना आवश्यक ती माहिती द्यावी. सर्वेक्षणाचे काम हे अहिल्यानगर महानगरपालिका विनामुल्य करत असून यासाठी कुठलेही शुल्क आकारण्यात येणार नसल्याचे महानगरपालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सर्वेक्षणामुळे सर्व मालमत्तांना कर आकारणी होईलच. मात्र, यामुळे मालमत्ताधारकांना आवश्यक असलेल्या मुलभुत सुविधांमध्ये सुधारणा करणे शक्य होणार आहे. या सर्व्हेक्षणाबाबत अथवा सर्वेक्षण कामास येणाऱ्या कर्मचारी, प्रतिनिधींबाबत कुठलीही तक्रार असल्यास राज्रपीशिवळषषाळश्र. लो व राल.ेशीळीठेपश्रसाळश्र. लो या ई–मेल आयडी वर तक्रार करावी. याबाबत सहाय्यक मूल्य निर्धारक कर संकलन अधिकारी विनायक गंगाधर जोशी यांच्याशी ९८२२०७६८६५ या मोबाईल क्रमांकावर संपर्क करता येईल, असेही आयुक्त यशवंत डांगे यांनी म्हटले आहे.

# इस्कॉन मधुबनमध्ये भगवद्गीता तुला दान उत्साहात

### गीता जयंतीनिमित्त आयोजन

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : बुधवारी, ११ डिसेंबर रोजी गीता जयंती निमित्त इस्कॉन मधुबनमध्ये भगवद्गीता तुला दान तथा भगवद्गीतेचे जीवनातील महत्त्व या विषयावरील डॉ. राम लक्ष्मण प्रभू यांचे विवेचन झाले.

इस्कॉन म्हणजेच आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघाचे संस्थापक आचार्य भक्ती वेदांत स्वामी श्रीलप्रभुपाद यांनी १९६७ साली भगवद्गीता जशी आहे तशी भाषांतरित टिप्पणी केलेली असून, आज ती जगात सर्वात जास्त प्रसिद्ध टीका आहे. आतापर्यंत संपूर्ण जगात ५५ कोटी भगवद्गीतेच्या प्रति वितरित करण्यात आलेल्या आहेत.

डॉ. राम लक्ष्मण प्रभू यांनी यानिमित्त भगवद्गीतेचे महत्त्व विशद करताना सांगितले की, जसे एखादी कंपनी एखाद्या प्रॉडक्ट सोबत त्याचा वापर करण्यासंबंधी मॅन्युअल देते, तसे भगवद्गीता हे जीवन कसे जगावे याचे मॅन्युअल



आहे. दुर्दैवाने आपल्या समाजामध्ये भगवद्गीता वाचन गांभीऱ्याने घेण्याबाबत निवृत्तीनंतर करण्याकडे कल आहे.पण, हे मॅन्युअल आपण जीवनामध्ये बालपणी, तरुणपणी वाचल्यावरच त्याचा जीवनात उपयोग होईल. जीवन कसे जगावचे हे मॅन्युअल जीवन संपता वेळेस वाचून फार उपयोग होणार नाही.

### गीता वितरण महिना

विविध मानसशास्त्र,अभ्यास याद्वारे हे समोर आले आहे की, भगवद्गीता जीवनावरील प्रत्येक अडचणीमध्ये आपल्याला मार्गदर्शन करू शकते. इस्कॉनद्वारे पूर्ण डिसेंबर हा भगवद्गीता वितरण महिना म्हणून जगभर साजरा केला व या पूर्ण डिसेंबरमध्ये शाळा, कॉलेजेस तसेच विविध कंपनी व सर्वसामान्य बाजारपेठ येथे भक्तांद्वारे अल्प दरामध्ये भगवद्गीतेचे वितरण केले जाते. इस्कॉन द्वारे ५९ भाषेमध्ये भगवद्गीता आज उपलब्ध आहे, ज्यामध्ये मराठी हिंदी गुजराती भाषांसुह तर अगदी इंग्रजी स्पॅनिश,जर्मन, चायनिज, जपानिस अशा भाषांमध्ये देखील भगवद्गीता वितरित केली जाते. इस्कॉनचे संस्थापक आचार्य श्रीलप्रभात यांनी यासाठी अथक प्रयत्न घेतले आहेत. यासंबंधी ज्यांना या भगवद्गीता वितरणामध्ये सहभागी व्हायचे असेल त्यांनी इस्कॉन मधुबन आदालत रोड येथे संपर्क करण्याबाबतही आवाहन करण्यात आले. भगवद्गीता वितरणामध्ये विविध सर्वदानामध्ये ग्रंथ दान हे सर्वश्रेष्ठ आहे कारण एक ग्रंथ एका व्यक्तीला कुटुंबाला नेहमीसाठी दिशादर्शक ठरू शकतो. उपक्रमापैकी एक उपक्रम आहे 'तुला दान' यामध्ये एखादी व्यक्त त्यांच्या वजनाइतके ग्रंथ दान करू शकते. इस्कॉन वर्षभरच भगवद्गीता व भारतीय वैदिक संस्कृती प्रचारासाठी जगभर कार्य करते. या विशेष भगवद्गीता वितरण उपक्रमामध्ये शुभ गोविंद खंडेलवाल, रणवीर झा, श्रीमती रेखा खैरनार, श्रीमती रचना मद्रवार, श्रीमती मोनिका ठाकूर, श्री खंडाळकर, हिरामण पाटील, डॉ. नीता भोंगाडे तथा विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी या भगवद्गीता वितरणामध्ये सहभागी आहेत.

## मुख्यमंत्री फडणवीस यांनी घेतली पंतप्रधान मोदी यांची सदिच्छा भेट

नवी दिल्ली, १२ डिसेंबर – महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची ७ लोक कल्याण मार्ग येथील पंतप्रधानांच्या शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतल्यानंतर, श्री. फडणवीस यांनी महाराष्ट्र सदन येथे प्रसार माध्यमांशी संवाद साधला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ मूर्ती पंतप्रधान मोदी यांना भेट दिल्याबाबतच्या भावना व्यक्त करत, मुख्यमंत्री यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नेतृत्वावर प्रकाश टाकत, पंतप्रधान श्री. मोदी यांनी शिवाजी महाराजांवर अपार श्रद्धा असल्याचे सांगितले. पंतप्रधान श्री.मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आपली निष्ठा आणि आदरभाव व्यक्त केल्याचीही माहिती त्यांनी यावेळी माध्यम प्रतिनिधींना दिली.

## विवेकानंद महाविद्यालयात शनिवारी पदवीदान सोहळा

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील पदवी व पदव्युत्तर वर्गांचे जे विद्यार्थी विवेकानंद महाविद्यालयातून उत्तीर्ण झाले आहेत, त्यांचा पदवीदान सोहळा शनिवारी, १४ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आले. विवेकानंद महाविद्यालयाच्या स्वामी विवेकानंद सभागृहात हा पदवीदान सोहळा पार पडणार आहे. विद्यापीठाच्या विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. डी. शिरसाट यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली जाणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादाराव शेंगुळे हे राहतील. महाविद्यालयाचे दोन्ही उपप्राचार्य डॉ. अरुणा पाटील व डॉ. टी. आर. पाटील यांची या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती राहणार आहे. सदर कार्यक्रमाला येऊन पदवी ग्रहण करण्याचे अवाहन डॉ. वसंत निरस यांनी केले आहे.

# चोरट्यांचा डाव फसला, चिप्स,कुरकुरे घेऊन पसार

### सिंचन विभागाचा परिसर बनला भुरट्या चोरट्यांचा अड्डा

तभा वृत्तसेवा

कन्नड :- शहरातील चाळीसगांव रोडवरील किराणा दुकानात चोरी करण्याच्या प्रयत्न फसला पण चोरट्यांनी, चिप्स, कुरकुरेचे पाकिटे मात्र लंपास केल्याची घटना दि.१२ रोजी उघडकीस आली आहे.

चाळीसगांव रोडवर सिंचन विभागाच्या कार्यालया लगत असलेल्या अनिल शिरसे यांच्या मालकीचे संतकृपा किराणा दुकानात दि.११ रोजी चोरट्यांनी चोरी करण्याच्या प्रयत्न केला,चोरट्यांनी मध्यरात्रीच्या सुमारास संत कृपा किराणा दुकानाच्या



फलकाजवळील पत्रा उचकटून आत प्रवेश करण्याच्या प्रयत्न केला पण अधिकची उंची असल्याने आणि पत्रा पूर्ण न उचकल्याने चोरट्यांना आत प्रवेश करता आला नाही,पण या भुरट्या चोरट्यांनी किराणा दुकानात असलेल्या चिप्स, कुरकुरे, आदींच्या माळीच्या माळी लंपास केल्या आणि विशेष म्हणजे या ते सर्व माळी पाठीमागील कार्यालयाच्या आवारात फस्त करून रिकाम्या पुड्या फेकून पसार झाले, या अगोदर सुध्दा याच ठिकाणी असलेल्या नेट कॅफेवर चोरीची घटना घडली आहे,कधी काळी याच आवारात उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालय होते परंतु सदर कार्यालय स्थलांतर झाल्याने याठिकाणी दारू पिणारे, बेगवेगळ्या नशा करणाऱ्यांचा जणू अड्डा झाला आहे,दोन ते तीन दिवसांपूर्वीच पाटबंधारे विभागाच्या कार्यालयाची खिडकीची काच फोडण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे याकडे संबंधित विभागाने लक्ष घालणे गरजेचे असून मध्यरात्री पर्यंत बसणाऱ्या युवकांचा बंदोबस्त करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे

## जागृत दत्त मंदिरामध्ये दीपोत्सव सोहळा उत्साहात; दिव्यांनी उजळला परिसर

छत्रपती संभाजीनगर : सिडको एन सातमधील जागृत दत्त मंदिरामध्ये गुरुवारी, १२ रोजी दीपोत्सव सोहळा पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

या मंदिरात दरवर्षी साजऱ्या होणाऱ्या दत्त जयंती सोहळ्यात दीपोत्सव हा भाविकांच्या आकर्षणाचा विषय असतो. सायंकाळी मंदिरासमोर असणाऱ्या मोकळ्या जागेत पणत्या लावून सहस्र दीपालंकार सेवा करण्यात आली. या वेळी मंदिरावरही आकर्षक रोषणाई करण्यात आली होती. डोळ्यांचे पारणे फिटेल, असा उत्सव यशस्वी करण्यासाठी जागृत दत्त मंदिराच्या कार्यकर्त्यांनी प्रयत्न केले. उद्धव जोशी वझूरकर आणि गणेश जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा अपूर्व उत्साहात पार पडला.

शुक्रवारी, १३ डिसेंबर रोजी सायंकाळी सहस्र पुष्पार्चन सेवेचे आयोजन करण्यात आले आहे. याप्रसंगी दत्तात्रयाची महाआरती होणार असून, त्यात सहभागी होणाऱ्या अकरा भाविकांना विशेष भेटवस्तू देण्यात येणार आहे. शनिवारी, १४ डिसेंबर रोजी दत्त महाभिषेक, रक्तदान शिबिर, सायंकाळी प्रज्ञाताई रामदासी यांचे दत्त जन्मोत्सवावर कीर्तन होणार आहे. रात्री पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, रविवारी, १५ डिसेंबर रोजी अनाथआश्रमातील मुलांसाठी महाप्रसाद, सोमवारी, १६ डिसेंबर रोजी दुपारी सार्वजनिक महाप्रसाद कार्यक्रम होणार असल्याचे संयोजकांच्या वतीन कळविण्यात आले आहे.

## शिक्षण विभाग अंतर्गत ५२ वे विज्ञान प्रदर्शन संपन्न

वाळूज महानगर (प्रतिनिधी): ५२ वे राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शन अनुषंगाने तणावणी इंग्लिश स्कुल,साजापूर या शाळेत पं स गंगापूर शिक्षण विभाग आयोजित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन विद्यार्थी सहभाग मोठ्या संख्येने उत्साहात सपन्न झाले.

या वेळी तालुका विज्ञान प्रदर्शन मुख्य उद्घाटक समाधान आराख, गटशिक्षणाधिकारी पं स गंगापूर प्रमुख उपस्थिती म्हणून अरविंद कापसे, विजय दुतोंडे, शिक्षण विस्तार अधिकारी पं स गंगापूर, केंद्रप्रमुख डी एम पवार आणि प्राचार्य, श्री प्रशांत आढागळे तणावणी इंग्लिश स्कुल,सजापूर आणि मुख्याध्यापक



लक्ष्मण हिवाळे हे उपस्थित होते.

विज्ञान प्रदर्शन सहभागी विद्यार्थी प्राथमिक विभाग इ ६ ते ८ एकूण –३० प्रयोग व माध्यमिक विभाग इ ९ ते १२ वी एकूण २७ प्रयोग होते आणि दिव्यांग विभाग मधून २ विद्यार्थीसह शिक्षक मधून २ सहभागी झाले एकूण ६५ विज्ञान प्रयोग #विज्ञान, गणित व पर्यावरण वर आधारित होते#

या साठी प्राथमिक २ व माध्यमिक मधून २ परीक्षक म्हणून नेमणूक करण्यात आलेले परीक्षक द्वारे निकाल जाहिर करण्यात आले. तालुका विज्ञान प्रदर्शन नियोजन व यशस्वी साठी समन्वयक रामकिसन पांचाळ, सहाय्यक समव्ययक मनोज भुताळे , मनीषा काळे, सुमती काळणे, गणेश गवांदे शिक्षण आदींनी परिश्रम घेतले.

# कोण म्हणतंय.. अवैध धंदे बंद आहेत! वाळूजला या सर्व काही मिळतेय

त.भा. दि. १२

वाळूज महानगर, (प्रतिनिधी) : गेल्या काही दिवसांपासून पोलिस आयुक्तांनी आपल्या हद्दीतील सर्व पोलिस ठाण्यांना अवैध धंदे बंद करण्याचे आदेश दिलेले आहेत, मात्र वरिष्ठांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत फक्त 'अर्थ'पूर्ण संबंधामुळे वाळूज परिसरात अवैध धंदे जोरात सुरू आहेत. याकडे वरिष्ठ कारवाई करतील का? असा प्रश्न त्रस्त नागरिक करीत आहेत.

पोलिस आयुक्त यांच्या हद्दीतील वाळूज पोलिस ठाण्याच्या हद्दीत सर्रासपणे अवैध



धंदे सुरू असून, याकडे पोलिस मात्र 'साहेबां'च्या आदेशाने दुर्लक्ष करीत असल्याने पान टपरीवरही देशी दारूची विक्री जोरात सुरू असल्याचे 'तरुण-भारत'च्या पाहणीत आढळून आले. याविषयी अधिक चौकशी केली असता, वाळूज पोलिस प्रत्येकाकडून दरमहा 'मलिदा' जमा करत असल्याचे समजते. त्यामुळे सर्रासपणे कुठेही दारू, गांजा मिळत असून वाळूज पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैधपणे नऊ ठिकाणी देशी दारू विक्री केली जाते. त्यापैकी कमळापूर रोडवरच सात अड्डे, साठेनगरमध्ये एक, बाजारतळावर एक आणि बजाज पार्किंग परिसरात गांजाची सर्रासपणे विक्री होत असल्याचे आढळून आले आहे.

पोलिस आयुक्तांनी कितीही गाजावाजा केला तरी हमेखोर पोलिसांमुळे वाळूज पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे बोकाळल्याचे दिसत आहे, या प्रकारामुळे सामान्य नागरिक त्रस्त असून, त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. पोलिस आयुक्तांनी स्थापन केलेले विशेष पथक काय करते? असा सवालही नागरिक उपस्थित करीत आहेत.

# कन्नड शहर पोलिसांनी हरवलेले आठ लाखाचे मोबाईल केले परत

### पोलिस अधिक्षकांच्या हस्ते केले तक्रारदारांच्या स्वाधीन

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.१२ डिसेंबर – कन्नड शहर पोलिसांनी तांत्रिक तपासात आघाडी घेत जिल्ह्यात नावलौकिक मिळवला असून गहाळ, हरवलेले मोबाइल परत मिळवून दिले आहे.

दि.१२ रोजी पोलिस अधिक्षक डॉ.विनयकुमार राठोड यांच्या हस्ते गहाळ, हरवलेले मोबाईल तक्रारदारांना परत देण्यात आले,कन्नड शहर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी पोलिस



कॉन्स्टेबल यांनी तांत्रिकदृष्ट्या तपास करत मध्य प्रदेश, कर्नाटक तसेच महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यातुन तब्बल आठ लाख रुपये किंमतीचे आतापर्यंत एकोणपन्नास मोबाइल हस्तगत केले,आणि ते सर्व मोबाईल मूळ मालकाला देण्यात आले,

यावेळी पोलिस अधिक्षक डॉ.विनयकुमार राठोड म्हणाले की नागरिकांना आपल्या मौल्यवान वस्तुंची काळजी घ्यावी गहाळ, हरवलेले मोबाईल हे गर्दीच्या ठिकाणावरून हरवलेले आहेत त्यामुळे आपण काळजी घ्यावी असे आवाहन त्यांनी केले आपला हरवलेला मोबाईल परत मिळाल्याने नागरिकांचे चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता आणि पोलिसांन प्रति आदर दिसून आला यावेळी कन्नड शहर पोलिस स्टेशन येथील अधिकारी,कर्मचारी,नागरिक उपस्थित होते

## प्रा. शा. धामोरी बुद्रुक येथे आनंदनगरी उत्साहात

वाळूज महानगर( प्रतिनिधी ): आज दिनांक १२ डिसेंबर रोजी प्राथमिक शाळा धामोरी बुद्रुक येथे आनंदनगरीचे आयोजन करण्यात आले होते. या आनंदनगरीचे उद्घाटन केंद्रप्रमुख विष्णू बोरडे व शालेय अध्यक्ष बंडू शेळके यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच ललिता कीर्तीशाही व उपसरपंच कृष्णा शेळके उपस्थित होते.

या आनंद नगरीत इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे व भाजीपाल्याचे स्टॉल लावले होते. अतिशय स्वादिष्ट व रुचकर पदार्थ ठेवल्यामुळे गावातील नागरिकांची स्टॉलवर एकच झुंबड उडाली होती.



या आनंदनगरीचे वैशिष्ट्य म्हणजे खास विद्यार्थ्यांसाठी शालेय प्रांगणात मिकी माऊस व जंपिंग जपाक हे खेळ अतिशय नाममात्र शुल्कावर उपलब्ध करून दिलेले होते. या खेळाचा सर्व विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला व खाद्यपदार्थांचाही मनमुराद स्वाद घेतला.

गावातील सर्व पालक व माता-भगिनी यांनी या उपक्रमात अतिशय उत्साहाने सक्रिय सहभाग नोंदवला त्यामुळे शालेय प्रांगणास यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक पुरुषोत्तम काळे, सारिका अग्रवाल, सोळंके, दीपा नागरगोजे, माधुरी निरफळ, अशोक शेळके, राधाकिसन शेळके व सर्व आदींनी परिश्रम घेतले.

## अग्रलेख...

# काँग्रेसची आणखी एक घोडचूक

कोणतीही व्यक्ती असो की संस्था, संघटना प्रत्येकालाच चर्चेत राहावेसे वाटते. कुठली तरी चांगली कामे, कृती आपल्याकडून व्हावी त्याकरिता आपली समाजाच चर्चा व्हावी, असे वाटण्यात काहीच गैर नाही. पण असे चर्चेत राहण्यासाठी काही सत्कृत्ये आपल्या हातून घडावी लागतात. देशभक्तीचे प्रकटीकरण करावे लागते, तेव्हा कुठे आपले नाव रोशन होते. काँग्रेस पक्षाचे मात्र तसे नाही. या पक्षाला आणि पक्षाच्या नेत्यांना कायम चर्चेत राहण्याची हौस तर आहे, पण त्यासाठी सत्कार्ये करण्याची मात्र कुणाची तयारी नाही. त्यामुळे हा पक्ष विघातक, वादग्रस्त कामे अथवा कृत्ये करून चर्चेत राहण्याचा प्रयत्न करतो. परिणामी त्याचे अनेक प्रयत्न वाया जातात आणि कौतुकाचे दोन चांगले शब्द कानी पडण्याऐवजी पक्षश्रेष्ठींवर शिव्यांच्या लाखोल्या ऐकण्याची वेळ येते. अशाने पक्षश्रेष्ठी तोंडघशी पडतात अन् अनेकदा काँग्रेस पक्षाची पाठ भाजून निघते. सनातनच्या मुद्यावर तर काँग्रेसला अनेकदा तोंडावर ठोसे बसलेले आहेत. नुकत्याच महाराष्ट्र आणि हरयाणा राज्यात झालेल्या निवडणुकीत 'एक है तो सेफ है' आणि 'बटेंगे तो कटेंगे' या नाऱ्यांनी काँग्रेसची वाट लावली, या पक्षाला पराभवाचा जबरदस्त झटका सहन करावा लागला. पण हिंदू समाजात फूट पाडण्याचे कट-कारस्थान अपयशी ठरूनही पक्ष त्यातून काही शिकलेला दिसत नाही. या निवडणुकीत त्यांच्या नेत्यांनी हिंदू देवी-देवतांची उडविलेली खिल्ली त्यांना प्रचंड महागात पडली. आता परत तसलेच कृत्य काँग्रेसच्या हातून शेजारच्या कर्नाटक प्रांतात घडले आहे. कर्नाटकमधील सिद्धरामय्या यांच्या नेतृत्वातील काँग्रेस सरकार आधीच अंतर्गत वादात हेलकावे खात असताना या सरकारने बेळगावच्या सुवर्ण सौधा विधानसभेत आदरपूर्वक लावण्यात आलेले स्वातंत्र्यवीर सावरकरांचे छायाचित्र हटवण्याचा निर्णय घेतला आहे. यावरून पुन्हा एकदा नव्या वादाला तोंड फुटले आहे. राज्यातील राजकारण चांगलेच तापले आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे कर्नाटकसाठी कोणतेही योगदान नाही असे सरकारला वाटत असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आलेला आहे. भारतीय जनता पक्षाचे तत्कालीन मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्या नेतृत्वातील सरकारने विधानसभेत सावरकरांचे हे छायाचित्र त्यांच्या गौरवार्थ लावले होते. ते हटविण्याची कुणकुण लागताच भारतीय जनता पक्षासह राज्यातील जनतेत संतापाची लाट उसळली आहे. कर्नाटकातील काँग्रेस नेत्यांनी जाहीरपणे या निर्णयाचे समर्थन केल्याने आगीत तेल टाकण्याचे काम झाले आहे. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत योगदान देणाऱ्या व्यक्तींची महती नाकारणे हा कृतघ्नपणाच असून, तो काँग्रेसच्या हातून घडला आहे. सावरकरांचे छायाचित्र सुवर्ण सौधा विधानसभेतून हटविण्याचा निर्णय साधासुधा नसून, अस्तित्वात नसलेल्या इतिहासाचे लेखन करण्याचा हा प्रकार आहे. सावरकरांची बदनामी, त्यांची निंदा-नालस्ती काँग्रेसकडून काही प्रथमच झालेली नाही. या निर्णयाद्वारे पक्षश्रेष्ठींना खूश करून करून अस्थिर सिद्धरामय्यांनी आपली खुर्ची अधिक बळकट केली आहे, असे बोलले जात आहे. अत्यंत निंदनीय आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा अपमान करणारा निर्णय, अशा शब्दात भारतीय जनता पार्टीने यावर तीव्र टीका केली आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी भारतमातेच्या स्वातंत्र्यासाठी भोगलेल्या यातनांकडे काँग्रेसने दुर्लक्ष केले आहे, त्यांचे बलिदान आणि त्यांचे विचार यांची अवेहलना करण्याचा काँग्रेसचा हा डाव आहे, असे मतही भाजपाने व्यक्त केले आहे. सावरकरांचे पणतू रणजित सावरकर यांनी काँग्रेसवर जोरदार हल्लाबोल केला आहे. काँग्रेसकडून यापेक्षा वेगळी अपेक्षा नव्हती. मात्र या निर्णयाची त्यांना मोठी किंमत चुकवावी लागेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

स्वातंत्र्य चळवळीतील सहभागाचा इतिहास असलेला काँग्रेस पक्ष नेहमीच राष्ट्रपुरुषांची निंदा-नालस्ती करण्यात आघाडीवर असतो, त्यामुळे कर्नाटकातील विधानसभेतून सावरकरांचे छायाचित्र हटविण्याच्या त्यांच्या कृतीत काहीच नावीन्य नाही. यापूर्वी काँग्रेसने राजस्थानमधील शालेय अभ्यासक्रमातील वीर सावरकरांच्या धड्यामधून 'वीर' शब्द काढून टाकला होता. त्यामुळे तेथे ते फक्त विनायक दामोदर सावरकर राहिले. सावरकरांच्या कार्याबद्दल आणि एकूणच इतिहासातील त्यांच्या स्थानाबद्दल दरवर्षी नव्याने चर्चा उपस्थित होत असते. २००४ साली अंदमान बेटांवरील स्वतंत्र ज्योती स्मारकावरील सावरकरांच्या कवितेच्या ओळी काँग्रेसचे वरिष्ठ नेते मणिशंकर अय्यर यांनी काढण्याचा निर्णय घेतला होता. त्यावर तत्कालीन विरोधी पक्षातील शिवसेना, भाजपाने प्रखर विरोधाची भूमिका घेतली होती. मणिशंकर अय्यर यांच्याविरोधात 'जोडे मारा' आंदोलनही मुंबईत करण्यात आले होते. सावरकरांची प्रतिमा संसदेत लावण्यावरही अनेक वाद निर्माण झाले होते. सावरकर यांच्याबाबतीत काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी केलेल्या विधानांमुळेही वाद निर्माण झाला होता. भारत जोडो यात्रेदरम्यान एका जाहीर सभेत राहुल बाबांनी 'मैं राहुल सावरकर नहीं, राहुल गांधी हूँ' असे म्हणत सावरकरांबद्दलच्या त्यांच्या हीन भावना प्रकट केल्या होत्या. काँग्रेचे नेते तर आजही त्यांनी भोगलेली काळ्या पाण्याची शिक्षा मान्य करण्यास तयार नाहीत. त्यांचे नेते मंडळी वारंवार 'माफीवीर' म्हणून त्यांची खिल्ली उडवीत असतात. सेल्युलर जेलमधून सुटण्यासाठी सावरकरांनी अनेकवार इंग्रज अधिकाऱ्यांची माफी मागितल्याचा दाखला काँग्रेसतर्फे दिला जातो. त्याची सत्यता पटवून घेण्यात त्यांनी एकदाही स्वारस्य दाखविलेले नाही.

मुळात काँग्रेसला गांधी घराण्यातील नेत्यांशिवाय पक्षातील इतर कुठल्याही नेत्यावर फुले उधळली जाणे अमान्य आहे. म्हणूनच काँग्रेसमध्ये नेहरू-गांधी परिवाराखेरीज दुसऱ्या कुठल्याही नेत्याला फारसा मान दिला जात नाही. काँग्रेसने त्यांच्या किती माजी अध्यक्षांना सन्मानित केले, त्यांचे विचार प्रसारित करण्यासाठी आंदोलने केली, त्यांचे पुतळे उभारण्यासाठी पुढाकार घेतला, या प्रश्नांची उत्तरे नकारार्थीच येतील. सरदार वल्लभभाई पटेल, ज्यांना सारा भारत देश लोहपुरुष म्हणून संबोधतो, त्यांचाही काँग्रेसने उचित सन्मान केलेला नाही. पण या गुजरातपुत्राचा अतिभव्य असा 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' उभारून भारतीय जनता पक्षाचे नेते नरेंद्र मोदी यांनी त्यांचा गौरव केला. बाळ गंगाधर टिळक, गोपाळकृष्ण गोखले अशा कितीतरी काँग्रेस नेत्यांची नावे घेता येतील, ज्यांना काँग्रेसने मोठे करायला हवे होते, त्यांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवायला हवे होते. पण त्याबाबत काँग्रेस मुळीच सजग राहिली नाही. काँग्रेसने संविधान बचावचा नारा देत डॉ. आंबेडकरांचे नाव रोशन करण्याचा प्रयत्न केला. पण प्रत्यक्षात त्यांनी दिलेल्या राज्यघटनेची वारंवार दुरुस्ती करण्यात काँग्रेस पक्षच आघाडीवर राहिलेला बघायला मिळाला. वीर सावरकर हे भारतीय इतिहासातील अलौकिक व्यक्तिमत्त्व होते. पूर्वापार चालत आलेल्या रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, अस्पृश्यता यांच्या विरोधात त्यांनी आवाज उठवला. आधुनिकीकरण, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सैनिकीकरणाचा पुरस्कार त्यांनी केला. समाज प्रबोधनासाठी सावरकरांनी नाटकं लिहिली, लावण्या लिहिल्या आणि पोवाडे-फटकेही लिहिली. अनेक विषयांच्या संस्कृत, मराठी, इंग्रजी ग्रंथांचे तसेच केसरी, काळ, पुणे वैभव अशा वृत्तपत्रांचे ते नियमित वाचन करीत असत. मंगल पांडे, नानासाहेब पेशवे, तात्या टोपे, राणाकुंवर सिंह, अझीमुल्ला खान, बहादूरशहा जफर अशा अनेकांनी १८५७ मध्ये जो लढा दिला ते 'शिपायांचे बंड' नव्हतं तर ते एक 'स्वातंत्र्यसमर' होते, असा निष्कर्ष स्वातंत्र्यवीरांनीच काढला आणि त्या उठावाचा साद्यंत इतिहासही लिहिला. तोच ग्रंथ पुढे ऐतिहासिक आणि क्रांतिकारकांची गीता ठरला. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या देशभक्तीचे किती दाखले द्यावे, म्हणजे काँग्रेस त्यांचे मोठेपण मान्य करेल, हे कळायला मार्ग नाही. आज पुन्हा एकदा काँग्रेसने सावरकरांचे छायाचित्र काढण्याच निर्णय घेऊन, त्यांचे मोठेपण अमान्य केले आहे. तथापि, भविष्यात काँग्रेसला ही खेळी महागात पडल्याशिवाय राहणार नाही. देवाची काठी दिसत नाही मात्र ती लागली की कुठे आपली चूक झाली ते कळते. तशाच प्रकारची काठी काँग्रेसच्या कपाळावर देवाने हाणावी, ही प्रार्थना!

## इतस्ततः

डॉ. विवेक राजे

# धर्मवीर डॉ. मुंजे शुद्धीकरण चळवळ

स्वातंत्र्यपूर्व काळात या देशाच्या स्वातंत्र्यासाठी, सैनिकीकरणासाठी हिंदू संघटन तसेच हिंदू धर्मातून बाहेर गेलेल्या लोकांना परत हिंदू धर्मात प्रवेश मिळावा म्हणून ज्या काही थोड्या नेत्यांनी प्रयत्न केले त्यात डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे हे अग्रणी नेते होते. इ. स. १९२१ च्या मोपला मुसलमानांच्या धार्मिक आक्रमणानंतर हिंदू समाज संघटित आणि बलवान व्हावा यासाठी डॉ. बाळकृष्ण मुंजे यांनी शुद्धीकरण म्हणजे 'घरवापसी' तसेच हिंदू संघटन करण्यावर भर द्यायला सुरुवात केली. मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्माचे हिंदू धर्मावर आणि हिंदू संस्कृतीवर आक्रमण होण्याला हिंदू समाजाची दुर्बल मानसिकता आणि विखुरलेपण कारणीभूत आहे. हिंदू समाजाने संघटितपणे बलवान होणे हाच या समस्येचा एकमेव उपाय आहे. त्यासाठी हिंदू समाजाचे कणखर संघटन झाले पाहिजे, असे डॉ. मुंजे नेहमीच हिंदू समाजाला सांगत असत. तसेच हे अस्पृश्यता निवारण केल्याशिवाय शक्य नाही, असेही ते आग्रही प्रतिपादन करीत. मुसलमानांचा द्वेष करण्याऐवजी त्यांना हिंदू धर्मात परत आणले पाहिजे. कारण मुळात जुलूम जबरदस्तीने ते परधर्मात गेलेले हिंदूच आहेत, असे ते सातत्याने सभांमध्ये आपल्या भाषणात सांगत असत.

मलबारातील मोपल्यांच्या धार्मिक आक्रमणानंतर काँग्रेसबरोबर केवळ राजकीय चळवळीत कार्य करीत राहण्यापेक्षा हिंदू महासभेसारख्या सांस्कृतिक आणि सामाजिक संघटनेत राहणे त्यांनी पसंत केले. हिंदू महासभेच्या कामाकडे पूर्ण लक्ष दिल्यामुळे डॉ. मुंजे यांना शुद्धीकरण आणि हिंदू संघटन या दोन्ही गोष्टींवर लक्ष केंद्रित करता आले. ख्रिश्चन प्रलोभनाने तर मुसलमान जबरदस्तीने धर्मांतरे घडवून आणतात म्हणून हिंदूंनीही शुद्धिकार्य घडवले पाहिजे, असा ते प्रचार करीत. शुद्धिकार्याची सुरुवात केल्यावर देशभरातून त्यांना हिंदू महासभा आणि शुद्धिसभांची निमंत्रणे येऊ लागली. त्यामुळे काँग्रेसचे पुढारी महंमद अल्ली यांनी शुद्धिकार्य करणाऱ्यांना जीवे मारले पाहिजे, असे वक्तव्य केले. या वक्तव्याची परिणती स्वामी श्रद्धानंद यांच्या खुनात झाली. डॉ. मुंजे यांना खुनाच्या धमकीची पत्रे नागपूरच्या मुसलमानांनी पाठवली. डॉ. मुंजे यांना वारंवार अशी खुनाच्या धमकीची पत्रे येत राहिली तरी त्यांनी शुद्धीकरण आणि हिंदू संघटनांचे कार्य आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यंत चालू ठेवले.

शुद्धीकरणाबाबत आपली भूमिका विशद करताना ते म्हणत की, स्वतःच्या योग्य हक्काकरिता झगडणे हे आमचे कर्तव्यच आहे. हिंदू धर्म हा कधीच आक्रमक धर्म प्रसार करणारा नव्हता. खुनाची धमकी दिल्यावरही त्यांचे शुद्धिकार्य धडाडीने चालूच राहिले. त्यामुळे मुसलमानांनी अनेक ठिकाणी आक्रमक पवित्रा घेत दंगे घडवून आणायला सुरुवात केली. या दंगलीसाठी सरकारने मुसलमानांची बाजू घेऊन हिंदूंना दोषी धरले. जुलै १९२६ मध्ये डॉ. मुंजे प्रचारासाठी कोलकात्याला जाणार होते. बंगालमध्ये हिंदू-मुस्लिम दंगे झाल्याने सरकारने डॉ. मुंजेंना कोलकात्यात येण्यास मनाई केली. मात्र, डॉ. मुंजे हा हुकूम मोडून कोलकात्याला गेले. कोलकाता रेल्वे स्टेशनवर मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला. त्यांच्या स्वागताला प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. रेल्वे स्टेशनवरच डॉ. मुंजे यांनी जनसमुदायासमोर मोठे भाषण केले. शासन आदेशाचे उल्लंघन करूनही पोलिसांनी त्यांना पकडले नाही. दोन दिवस कोलकात्यात मुक्काम ठोकून डॉ. मुंजे नागपूरला परतले.



डॉ. मुंजे यांच्या निर्भयपणे प्रचार करण्याच्या हातोटीमुळे त्यांना देशभरातून निमंत्रणे यायला लागली. गुजरातच्या दौऱ्यात ते सुरतला जाणार होते. सुरतच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटने त्यांना सुरत किंवा त्याच्या जवळपास जाहीर सभा घेण्यास मज्जाव केला; तो मोडून डॉ. मुंजे यांनी तेथे जाहीर सभेत भाषण केले. पुढे दिल्ली, दरभंगा, कोलकाता येथील हिंदू महासभेच्या अधिवेशनात शुद्धीकरण, संघटन आणि अस्पृश्यता निवारण याच विषयांवर त्यांनी भाषणे केली. त्यांच्या कार्यामुळे १५ ते १७ एप्रिल १९२७ ला पाटणा येथे झालेल्या अखिल भारतीय हिंदू महासभेच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली. पाटणा शहरात त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. त्यांनी पाटणा येथे आपल्या विस्तृत भाषणात त्या काळातील राजकीय, सामाजिक आणि धार्मिक प्रश्नांचा ऊहापोह केला.

विदर्भ प्रांताची दुसरी हिंदू धर्म परिषद १ व २ जून १९२८ रोजी डॉ. मुंजे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. मुंजे यांनी अस्पृश्यता निवारण आणि शुद्धीकरणावर भर दिला. या भाषणात डॉ. मुंजे यांनी धर्मांतरित अहिंदूंचेसुद्धा शुद्धीकरण करायला सुरुवात केली पाहिजे तसेच शुद्धीकरण ही हिंदूंची जुनीच प्रथा आहे, मध्यंतरी खंड पडल्याने आपल्याला ती नवीन वाटते, अशी आग्रही भूमिका मांडली. या परिषदेत गोवा प्रांतातील शुद्धीकरण चळवळीस पाठिंबा देणे, अहिंदूंचे हिंदूकरण करणे हे ठराव केले गेले तसेच या परिषदेच्या मांडवात पाच धर्मांतरितांना शुद्ध करून परत हिंदू धर्मात घेतले गेले.

इ. स. १९२८ मध्ये गोवा प्रांतात शुद्धीकरणाचे कार्य दडपण्याचा पोर्तुगीज सरकारने प्रयत्न सुरू केला. तेव्हा १९२८ मध्ये जबलपूर येथे भरलेल्या अखिल भारतीय हिंदू महासभेच्या अधिवेशनात ठराव होऊन डॉ. मुंजे आणि न. चिं. केळकर आदी लोकांचे गोव्यात शुद्धीकरण झालेल्या लोकांना मदत करण्यास पाठविले गेले. त्यावेळी डॉ. मुंजे आणि इतरांचा गोव्यात मानपत्र देऊन सत्कार केला गेला. त्यानंतर या शिष्टमंडळाने गोव्याच्या गव्हर्नर जनरलची भेट घेऊन काही अटींवर शुद्धीकरणाला कायदेशीर मान्यता घेतली. पुढे जेव्हा गोलमेज परिषदेनंतर डॉ. मुंजेंनी पोर्तुगालला भेट दिली, तेव्हा यांनी गोव्यातील शुद्धीकरणाच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा प्रयत्न केला.

इ. स. १९३३ मध्ये झालेल्या तिसऱ्या गोलमेज परिषदेला आमंत्रण नसतानाही विलायतेस जाऊन हिंदू महासभेची बाजू मांडायची, असे त्यांनी ठरवले. त्यानुसार डॉ. मुंजे, भाई परमानंद आणि इतरांच्या एका शिष्टमंडळाने इंग्लंडला जाण्याचे ठरवले. गोलमेज परिषदेच्या जॉईंट सिलेक्ट कमिटीपुढे डॉ. मुंजे यांनी १८ जुलै १९३३ ला भाषण केले. तेव्हा हिंदू-मुस्लिम प्रश्नात सरकार पक्षपाती असल्याने दोन समाजातील ऐक्य शक्य नाही, हे त्यांनी निर्भयतेने मांडले.

हिंदू महासभेने ७ आणि ८ ऑक्टोबर १९४४ ला दिल्लीत अखंड हिंदुस्थान परिषद घेतली होती. हिंदुस्थानच्या अखंडत्वाचा ठराव डॉ. मुंजे यांनी मांडला. या देशाला बलशाली हिंदू राष्ट्र करण्याचा ध्यास घेतलेल्या हिंदू तरुणांनी सैनिकी शिक्षणाची कास धरावी म्हणून स्वातंत्र्यपूर्व काळात भोसला मिलिटरी स्कूलची स्थापना करणाऱ्या, अस्पृशांना मंदिर प्रवेश मिळावा, अस्पृश्यता निवारणासाठी आणि परधर्मात गेलेल्या लोकांचे शुद्धीकरण करून त्यांना हिंदू धर्मात परत प्रवेश मिळावा म्हणून आयुष्यभर झटणाऱ्या डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे यांची आज म्हणजे १२ डिसेंबर रोजी १५२ वी जयंती आहे. शुद्धीकरण, घरवापसी, अस्पृश्यता निवारण आणि हिंदू समाज संघटनेचा आयुष्यभर ध्यास घेऊन झटणाऱ्या या देशभक्ताला शतशः प्रणाम!

९८८१२४२२२४

## वेध

विजय कुळकर्णी

# जातीयवाद मोडून झालेली विधानसभा निवडणूक!

महाराष्ट्र विधानसभा २०२४ ची निवडणूक झाली. निकाल जाहीर झाले. महायुतीला मतदारांनी पुन्हा सत्ता स्थापनेचा प्रचंड जनादेश दिला. ५ डिसेंबरला महायुती सरकारचा शपथविधी झाला. पण, महाविकास आघाडी अजूनही या निवडणुकीत झालेल्या पराभवाच्या महाधक्क्यातून बाहेर आलेली नाही. आपल्या पराभवाची नेमकी कोणती कारणे आहेत? आपण सहा महिन्यांपूर्वीच झालेल्या लोकसभा निवडणुकीत मिळविलेल्या यशानंतर विधानसभा निवडणुकीत एवढा मोठा पराभव कसा काय झाला? या प्रश्नाचे उत्तर त्यांना सापडत नाही किंवा ते शोधण्याचा प्रयत्नच करीत नसावेत. त्यामुळे महाविकास आघाडीचे नेते आता ईव्हीएमला दोष देत आहेत.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीने भाजपा भटजी शेठजीचा पक्ष आहे. हा पक्ष पुन्हा सत्तेत आल्यास आरक्षण संपवेल. देशाची घटना बदलविण्याचा यांचा अजेंडा आहे इत्यादी खोटे नॅरेटिव्ह मोठ्या प्रमाणात पसरविले होते. मराठा-मराठेतर वादाचेही भांडवल केले होते. त्याला काटशह देण्यात भाजपा आणि रालोआ कमी पडले. तसेच, मतदारांनी देखील भाजपाचे सरकार पुन्हा सत्तेत येणार आहेच, असा विश्वास बाळगून मतदानापेक्षा आपल्याकडील व आपल्या नातेवाईकांकडील लग्न समारंभ व इतर कामांना अधिक महत्त्व दिले होते. त्यामुळे मतदानाची टक्केवारी घसरली होती. त्यामुळेही भाजपा आणि रालोआला लोकसभेत फटका



बसला होता. मात्र, या अनुभवातून भाजपा आणि महायुतीने धडा शिकून विधानसभा निवडणुकीत या सर्व चुका सुधारण्यावर भर दिला. लोकसभेत झालेल्या व्होट जिहादला देखील काटशह देण्याची जोरदार तयारी करण्यात आली. मतदानाची टक्केवारी कशी वाढेल याकडे विशेष लक्ष देण्यात आले. त्यानुसार महायुतीतील सर्व पक्षांचे नेते आणि कार्यकर्ते कामाला लागले होते. सरकारचा कार्यकाळ संपण्यापूर्वी मुख्यमंत्री लाडकी बहीण, शेतकऱ्यांना कृषिपंपाचे वीज देयक माफ करणे, शेतकऱ्यांना पंतप्रधान किसान सन्मान निधी देणे, सर्वच जाती धर्मातील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ पोहोचविणे, यामुळे महायुती शासनाबद्दल जनतेच्या मनात सकारात्मक विचार निर्माण झाला होता. तसेच, वर्ष दीड वर्षात मनोज जरांगेंच्या नेतृत्वात पेटविण्यात आलेले मराठा आरक्षण आंदोलन निवडणूक काळात थंड करण्यात महायुतीला यश आले. विशेषतः मराठा आरक्षण आंदोलनामुळे मराठा व मराठेतर हा वाद निर्माण झाला होता. मात्र, निवडणूक प्रचारात भाजपा आणि देवेंद्र फडणवीस यांनी मराठा विरुद्ध ब्राह्मण, मराठा विरुद्ध मराठेतर हा वाद मोडून काढण्यात यश मिळविले. आपण कसे मराठ्यांना आरक्षण दिले व न्यायालयात टिकविले होते. मात्र महाविकास आघाडीला न्यायालयात ते कसे टिकविता आले नाही, हे मतदारांना पटवून देण्यात त्यांना यश आले. तसेच, शहरातच नव्हे तर, ग्रामीण भागात सर्व जाती धर्मातील मतदारांना कोणत्या ना कोणत्या शासकीय योजनेचा लाभ मिळाला आहे. अनेक आमदारांनी बुद्ध विहारांना कोट्यवधींचा निधी दिल्यामुळे आंबेडकरी जनतेच्या मनात असलेला भाजपाविषयीचा गैरसमज दूर झाला होता. त्यामुळे कधी नव्हे ते आंबेडकरी जनतेने देखील महायुतीच्या पारड्यात मते टाकल्याचे आता आंबेडकरी जनताच सांगत आहे. त्यामुळे या समाजाची मते महायुती, महाविकास आघाडी आणि वंचित बहुजन आघाडी, अशा तीन ठिकाणी विभागल्या गेली. त्याचाही फायदा महायुतीला झाला. तर, आमदार गोपीचंद पडळकर यांनी परवा मारकडवाडी येथील जाहीर सभेत बोलताना महाविकास आघाडीतील प्रस्थापितांना संपविण्यासाठी आता देवाभाऊ आला आहे. त्यामुळेच आम्हला आज ही पदे आणि आमदरकी मिळाल्याचे ठासून सांगितले. याचा अर्थ या निवडणुकीपर्यंत महाराष्ट्रातील प्रस्थापितांनी कशाप्रकारे समाजातील कमजोर घटकातील नेतृत्वाला दाबून ठेवले होते, ते लक्षात येते. पण, महायुती आणि देवाभाऊंनी त्या उपेक्षितांना सत्तेची फळे चाखायला दिली. त्याचा परिणाम म्हणून या निवडणुकीत गावगाड्यातील जातिपातीच्या राजकारणाला थारा न देता मतदारांनी विकासाला मतदान केले आणि राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार प्रचंड मताधिक्क्याने स्थापन केले.

८८०६००६१४९

## दिल्ली वार्तापत्र

श्यामकांत जहागीरदार

# अर्ध्यापेक्षा जास्त राज्यांत भाजपाचे मुख्यमंत्री

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतल्यामुळे देशभरात भाजपाच्या मुख्यमंत्र्यांची संख्या १४ झाली आहे. भाजपाच्या मित्रपक्षांचे म्हणजे रालोआतील घटक पक्षांचे मुख्यमंत्री पकडले तर ही संख्या २० होते. देशात २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेश आहेत. देशात आतापर्यंत २९ राज्ये आणि ७ केंद्रशासित प्रदेश होते, पण जम्मू-काश्मीरचा राज्याचा दर्जा काढून त्याला केंद्रशासित केल्यामुळे एक राज्य कमी झाले. यातील ३१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशात मुख्यमंत्री आहेत. ३१ मुख्यमंत्र्यांत भाजपासह रालोआच्या मुख्यमंत्र्यांची संख्या २० होते, म्हणजे देशातील दोन तृतीयांश राज्यांत मुख्यमंत्री भाजपा आणि मित्रपक्षांचे आहेत. फक्त राज्यांचा विचार केला तर देशातील अर्ध्या म्हणजे २८ पैकी १४ राज्यांत आता भाजपाचे मुख्यमंत्री आहेत.

गोवा, आसाम, ओडिशा, त्रिपुरा, हरयाणा, गुजरात, राजस्थान, मणिपूर, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड, उत्तराखंड, उत्तरप्रदेश आणि अरुणाचल प्रदेश अशा १४ राज्यांत भाजपाचे मुख्यमंत्री आहेत. बिहार, सिक्कीम, मेघालय, मिझोरम, नागालॅण्ड आणि आंध्र प्रदेशात भाजपाच्या मित्रपक्षांचे मुख्यमंत्री आहेत.

महाराष्ट्रात कोणाच्याही मंत्रिमंडळात आधी मंत्री न राहता फडणवीस हे थेट मुख्यमंत्री झाले, असे करत त्यांनी नरेंद्र मोदी यांची बरोबरी केली. मोदीही गुजरातचे थेट मुख्यमंत्री झाले. त्याआधी ते गुजरातमध्ये कोणाच्याही मंत्रिमंडळात मंत्री काय, साधे आमदारही नव्हते. गुजरातच्या मुख्यमंत्रिपदासारखे मोदी राष्ट्रीय राजकारणात आले आणि थेट पंतप्रधानच झाले. पंतप्रधान होण्याआधी मोदी कधी खासदारही झाले नव्हते. त्यामुळे त्यांनी केंद्रात मंत्री होण्याचा प्रश्नच नव्हता. नंतर मोदी यांच्यामुळे अनेक जणांना मंत्री न राहता थेट राज्याचे मुख्यमंत्रिपद भूषविण्याची संधी मिळाली.

देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी तिसऱ्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. २०१४ मध्ये फडणवीस पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले. २०१९ मध्ये त्यांनी दुसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली; पण यावेळी त्यांचा कार्यकाळ सर्वांत छोटा होता. मुख्यमंत्रिपदाचा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे फडणवीस हे महाराष्ट्राचे आतापर्यंतचे दुसरे मुख्यमंत्री होते.

गोव्यात डॉ. प्रमोद सावंत, आसाममध्ये हेमंता बिस्व सरमा, ओडिशात मोहनचरण मांझी, त्रिपुरात माणिक साहा, हरयाणात नायबसिंह सैनी, गुजरातमध्ये भूपेंद्र पटेल, राजस्थानात भजनलाल शर्मा, मणिपूरमध्ये बीरेनसिंह, महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस, मध्यप्रदेशात मोहन यादव, छत्तीसगडमध्ये विष्णुदेव साय, उत्तराखंडमध्ये पुष्करसिंह धामी, उत्तरप्रदेशात योगी आदित्यनाथ आणि अरुणाचल प्रदेशमध्ये पेमा खांडू भाजपाचे मुख्यमंत्री आहेत.

गेल्या अनेक वर्षांपासून बिजू जनता दलाच्या ताब्यात असलेले ओडिशा राज्य भाजपाने नुकतेच जिंकले आहे. नवीन पटनायक प्रदीर्घ काळापासून ओडिशाचे मुख्यमंत्री होते. राजस्थान आणि मध्यप्रदेशात भाजपाने नव्या चेहऱ्यांना मुख्यमंत्रिपदाची संधी दिली आहे. यामुळे राजस्थानात भजनलाल शर्मा आणि मध्यप्रदेशात मोहन यादव यांना मुख्यमंत्रिपदाची लॉटरी लागली, असे म्हणायला हरकत नाही. राज्यात मंत्रिपद न भूषवताच हे नेते थेट मुख्यमंत्री झाले. बिहारमध्ये भाजपाचा मित्रपक्ष असलेल्या जदयूचे नितीशकुमार, आंध्र प्रदेशात तेलगू देसमचे चंद्राबाबू नायडू, सिक्कीममध्ये सिक्कीम क्रांतिकारी मोर्चाचे प्रेमसिंग तमांग, मेघालयात नॅशनल पीपल्स पार्टीचे कॉनरॉड संगमा, मिझोरममध्ये झोराम पीपल्स मुव्हमेंटचे पी. यु. लालडुहोमा आणि नागालॅण्डमध्ये नॅशनलिस्ट डेमोक्रटिक प्रोग्रसिव्ह पार्टीचे नियुफियु रियु हे नेते मुख्यमंत्री आहेत.

देशातील फक्त तीन राज्यांत सध्या काँग्रेसचे मुख्यमंत्री आहेत, कर्नाटकात सिद्धरामय्या, तेलंगणात ए. रेवंत रेड्डी आणि हिमाचल प्रदेशमध्ये सुखविंदसिंग सुक्खू हे काँग्रेसचे मुख्यमंत्री आहेत. दिल्ली आणि पंजाब या दोन राज्यांत आम आदमी पक्षाचे म्हणजे आपचे मुख्यमंत्री आहेत. दिल्लीत आपच्या आतिशी तर पंजाबमध्ये भगवंत मान मुख्यमंत्री आहेत. पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसच्या ममता बॅनर्जी, तामिळनाडूत द्रमुकचे एम. के. स्टॅलिन आणि झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चाचे हेमंत सोरेन हे मुख्यमंत्री आहेत. जम्मू-काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्सचे उमर □अब्दुल्ला मुख्यमंत्रिपद सांभाळत आहेत. केरळमध्ये डाव्या आघाडीचे पिनाराई विजयन् तसेच पुद्दुचेरीत ऑल इंडिया एन. आर. काँग्रेसचे एन. रंगास्वामी मुख्यमंत्री आहेत.

देशात फक्त दोनच राज्यांत महिला मुख्यमंत्री आहेत, यात पश्चिम बंगालच्या ममता बॅनर्जी आणि दिल्लीच्या मार्लिना आतिशी यांचा समावेश आहे. देशातील सर्व विद्यमान मुख्यमंत्र्यांत ममता बॅनर्जी या सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिल्या आहेत. मुख्यमंत्रिपदाची १३ वर्षे त्यांनी पूर्ण केली आहेत. केरळचे ७९ वर्षीय पिनाराई विजयन् हे देशातील सर्वांत जास्त वयाचे मुख्यमंत्री आहेत. बिहारचे मुख्यमंत्री आणि जदयू नेते नितीशकुमार देशात सर्वाधिक वेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणारे एकमेव मुख्यमंत्री आहेत. नितीशकुमार यांनी सर्वाधिक म्हणजे नऊ वेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे.

ममता बॅनर्जी यांच्या खालोखाल नितीशकुमार मुख्यमंत्रिपदाच्या कारकीर्दीत दुसऱ्या स्थानावर आहेत. नितीशकुमार यांच्या मुख्यमंत्रिपदाची १० वर्षे पूर्ण होत आहेत. नितीशकुमार यांच्या मुख्यमंत्रिपदाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी बिहारमध्ये परस्परविरोधी विचाराच्या आघाड्यांचे मुख्यमंत्रिपद भूषविले आहे. तिसऱ्या स्थानावर केरळचे पी. विजयन् आठ वर्षांपेक्षा जास्त काळापासून मुख्यमंत्री आहेत. गोरखपूर पीठाचे महंत योगी आदित्यनाथ भगवे वस्त्रधारी देशातील एकमेव मुख्यमंत्री आहेत.

२०१४ च्या आधी हाताच्या बोटावर मोजता येतील एवढ्या मोजक्या राज्यात भाजपाची सरकारे होती. यात प्रामुख्याने गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेशाचा समावेश असायचा. आज भाजपाने जवळपास संपूर्ण देश पादाक्रांत केल्यासारखे दिसते. कधीकाळी देशातील बहुतांश राज्यात काँग्रेसचीच सरकारे होती. अपवाद फक्त तामिळनाडू आणि पश्चिम बंगालचा होता. तेव्हा तामिळनाडूत कधी द्रमुक तर कधी अण्णाद्रमुकचे सरकार असायचे तर पश्चिम बंगालमध्ये डाव्या पक्षांचे म्हणजे माकपचे. आज देशातील फक्त तीन राज्यांत काँग्रेसचे मुख्यमंत्री आहेत. म्हणजे काँग्रेस पक्षाची स्थिती तीन सवारीच्या ऑटोरिक्षासारखी झाली, असे म्हणायला हरकत नाही. तर, भाजपा २० आसनी टेम्पो ट्रॅव्हलरसारखा झाला आहे. भाजपाच्या दृष्टीने ही गौरवाची बाब म्हटली पाहिजे. भाजपावर मनापासून प्रेम करणाऱ्यांची कॉलर ताठ होण्याचा आणि मान अभिमानाने उंचावण्याचा हा क्षण आहे.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### किती काळजी आहे शासनास जनतेच्या प्राणाची?

मोटारवाहन कायदा १९८८, कलम १२८ व १२९ मध्ये समाविष्ट तरतुदीनुसार दुचाकी चालविणाऱ्यास व त्याच्या मागच्या सीटवर बसणाऱ्या व्यक्तीलाही सुरक्षे (?) च्या दृष्टीने हेल्मेट घालणे आवश्यक आहे, असा सक्तीचा आदेश नागपूरसह राज्यात पुन्हा देण्यात आला आहे. यासाठी '२०२३' च्या रस्ते अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या देण्यात आली. 'वा किती काळजी आहे म्हणावी सरकारला राज्यातील जनतेच्या जिवाची. नागपूरपासून काही किमी. दूर अंतरावर शाळेच्या विद्यार्थ्यांची सहल बस उलटली. त्यात एका कोवळ्या वयाच्या विद्यार्थिनीचा जीव गेला व ३० च्या वर विद्यार्थी जखमी झालेत. गोंदिया मार्गावर 'शिवशाही'ला भीषण अपघात होऊन त्यात १३ लोक दगावले. त्यापूर्वी दोन दिवस आधी यवतमाळ मार्गावरही अपघात झाला. समृद्धी महामार्गवर होणाऱ्या सततच्या अपघाताकडे शासनाचे किती लक्ष आहे? की आता या व इतरही माहामार्गवर अपघात होतात म्हणून बस प्रवाशांना, चारचाकीमध्ये बसणाऱ्यांनाही 'हेल्मेटसक्ती' करणार आहात? केवळ कायद्याचा धाक दाखवून शासन करता येत नाही, तर संबंधित कायद्याच्या अंमलबजावणीसाठी राज्याच्या जनतेचा प्रत्यक्ष सहभागही महत्त्वाचा असतो. दोन वर्षांपूर्वी समृद्धी महामार्गावर खाजगी बसच्या अपघातात २६ प्रवासी होरपळून मेले. त्यांचे शरीरही ओळखता आले नाही. यासाठी दोषी असणाऱ्यांचे काय झाले?

**गजेंद्र डोळके**/८०१०६०३७८९

### बांगलादेशला त्याची जागा दाखवून द्या

मागील काही महिन्यांत बांगलादेशात हिंदूंवरील हल्ल्यांच्या ३०० घटना घडल्या आहेत. यात काही नागरिकांना जीव गमवावा लागला आहे. हिंदूंच्या मंदिरांवर आणि घरांवर जाणीवपूर्वक हल्ले केले जात आहेत. हिंदूंनी बांगलादेश सोडून जावे असे जाहीरपणे इशारे दिले जात आहेत. या कट्टरपंथीय हल्लेखोरांना रोखण्यात तेथील डॉ. मोहम्मद युनूस यांचे सरकार अपयशी ठरत आहे किंबहुना या हल्लेखोरांना तेच पाठीशी घालत आहेत. बांगलादेशातील अल्पसंख्यक हिंदूंचे संरक्षण करणे हे तेथील सरकारचे कर्तव्यच आहे मात्र आपले कर्तव्य विसरून तेथील सरकार कट्टरपंथीयांना मोकळीक देत आहे. इतकेच नाही तर बांगलादेशात भारतविरोधी वातावरण निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न करत आहे. डॉ. मोहम्मद युनूस हे नोबेल पारितोषिक विजेते आहेत. त्यांच्याकडून न्याय आणि समानतेची अपेक्षा होती मात्र आता ती अपेक्षा फोल ठरली. बांगलादेश नॅशनलिस्ट पक्षाच्या नेत्याने आपल्या पत्नीची साडी जाळून भारतीय मालावर बहिष्कार घालण्याचे आवाहन केले. इतकेच नाही तर प्रसार माध्यमांवर देखील बंदी घालण्याचे आवाहन केले. भारताने देखील या प्रकरणात बघ्याची भूमिका सोडून एहसान फरामोश बांगलादेशला त्यांची जागा दाखवून द्यावी.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### शिक्षकांची कधी होणार अशैक्षणिक कामातून मुक्तता

शाळा आणि महाविद्यालयांमध्ये शासनाद्वारे विविध उपक्रम राबवले जातात, जे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असतात. सरकारी शाळांमध्ये दिले जाणारे मध्यान्ह भोजन, सर्व शिक्षा अभियान, डिजिटल शाळा अशा विविध शैक्षणिक उपक्रमांचा समावेश आहे. या उपक्रमांचा उद्देश गरीब आणि वंचित वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील करून त्यांना याचा जास्तीत जास्त लाभ मिळावा, असा शासनाचा हेतू आहे. परंतु, नाण्याची दुसरी बाजू लक्षात घेतल्यास असे दिसते की, याच शाळांमधील शिक्षकांवर या अतिरिक्त कामांचा मोठ्या प्रमाणात ताण येतो. निवडणुकांमध्ये मतदान अधिकारी किंवा पर्यवेक्षक म्हणून काम करणे, जनगणना आणि इतर सरकारी सर्वेक्षणांमध्ये सहभाग घेणे, मतदार ओळखपत्र तयार करण्यासाठी माहिती गोळा करणे, लोकसंख्येची माहिती गोळा करणे, पाळीव प्राणी जनगणना आणि इतर अशा कितीतरी अतिरिक्त कामांत शिक्षक गुंतलेले असतात. आता या यादीत अजून एका कामाची भर पडली आहे, ती म्हणजे विद्यार्थ्यांची अपार आयडी तयार करणे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा लिखित मागोवा घेण्यासाठी आणि त्यांची शैक्षणिक नोंद सुरक्षित ठेवण्यासाठी निश्चितच ही आयडी उपयुक्त आहे. मात्र, शिक्षकांकडून हे काम करून घेणे कितपत योग्य आहे, याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा. विशेषतः ग्रामीण भागातील शाळांचा विचार केला तर, तेथे तांत्रिक अडचणी आणि आवश्यक संसाधनांची कमतरता यांचा मोठ्या प्रमाणात सामना करावा लागतो. या अतिरिक्त जबाबदाऱ्यांमुळे शिक्षकांवर मानसिक आणि शारीरिक ताण येतो, ज्याचा त्यांच्या कार्यक्षमतेवर थेट परिणाम होतो. शिक्षकांचा बहुमूल्य वेळ अशा कामांमध्ये गेला तर विद्यार्थ्यांना शिकवणे आणि घडवणे या त्यांच्या मुख्य जबाबदाऱ्यांवर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे अशा कामांसाठी सहायक कर्मचाऱ्यांची नेमणूक केली पाहिजे. यामुळे अनेकांना रोजगार मिळेल आणि शिक्षकांना त्यांचे अध्यापन कार्य निर्विघ्नपणे पार पाडता येईल आणि विद्यार्थ्यांच्या खऱ्या अर्थाने शिक्षणाचा दर्जा सुधारेल.

**अरुण कराळे**/९०९६३२६२७२

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# स्व.संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ बीड जिल्हा बंद

## बंद पाळण्याचे आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ डिसेंबर**

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांचे अपहरण करून निघृण हत्या केल्याच्या निषेधार्थ शुक्रवारी (दि.१३) रोजी बीड जिल्हा बंदची हाक देण्यात आली आहे. या बंदमध्ये सहभागी होऊन व्यापारी, नागरिकांनी झालेल्या घटनेचा व जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तीचा निषेध व्यक्त करावा असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

सोमवारी (दि.९) रोजी केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच पती सामाजिक कार्यकर्ते स्व.संतोष देशमुख यांचे भरदुपारी अपहरण करण्यात आले आणि ३ तासांनंतर त्यांचा मृतदेह सापडला. अतिशय निघृणपणे त्यांची हत्या करण्यात आली आहे. अपहरण आणि खून यांसारखे गंभीर प्रकरण असताना प्रशासनाने या प्रकरणात योग्य भूमिका घेतली नाही. मारेकर्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न पोलीसांकडून झालेला असल्याचे दिसत आहे. जिल्ह्यातील वातावरण अतिशय दहशतीचे झाले असून यामागे काही विशिष्ट व्यक्तीविशेष आहेत. बीड जिल्ह्यात अक्षरशः बिहार सारखी परिस्थिती होत चालली आहे. गुन्हेगारी प्रवृत्ती फोफावत चालली आहे. या प्रवृत्तीला आळा घालणे ही बाब अत्यावश्यक झाली आहे. स्व.संतोष देशमुख व त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळाला पाहिजे. ही मागणी घेऊन व झालेल्या प्रकाराचा निषेध व्यक्त करण्यासाठी बीड जिल्ह्यातील व्यापारी व नागरिकांनी आजचा बंद पाळण्याचे आवाहन बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.



# अंबाजोगाई तालुक्यात महिलेचा संशयास्पद मृत्यू; नातेवाईकांचा घातपाताचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१२ डिसेंबर**

अंबाजोगाई – तालुक्यातील साकूड येथील रुक्मिणी ज्ञानोबा कराड (वय ४५) या महिलेचा आज गुरूवारी (दि.१२) सकाळी १० वाजता राहत्या घरी मृत्यू झाला. मात्र, त्या महिलेच्या नातेवाईकांनी मृत्यूबाबत संशय व्यक्त केल्याने या प्रकरणाची गुंतागुंत वाढली आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार रुक्मिणी कराड यांचा गुरुवारी सकाळी मृत्यू झाला. त्यांच्या कुटुंबियांनी पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार २२ नोव्हेंबर रोजी रात्री १२ वाजता रुक्मिणीबाई घराच्या गच्चीवर पाण्याचा टाकीत किती पाणी आहे हे पाहण्यासाठी गेल्या असता तोल जाऊन त्या खाली पडल्या. गंभीर जखमी झालेल्या रुक्मिणी यांच्यावर लातूर येथील रुग्णालयात उपचार करण्यात आले. काही दिवसांपूर्वी त्यांना रुग्णालयातून सुटी देण्यात आली. त्यानंतरही त्या घरी बहुतांशी वेळ झोपूनच होत्या. गुरुवारी सकाळी त्यांचा मृत्यू झाला. मात्र, काही नातेवाईकांनी त्यांच्या मृत्यूबाबत संशय व्यक्त केला आहे. रुक्मिणीबाईंना मारहाण झाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचा संशय नातेवाईकांना असल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली. दरम्यान, रुक्मिणीबाईंचा मृतदेह स्वाराती रुग्णालयात हलविण्यात आला असून शवविच्छेदन झाल्यानंतरच मृत्यूचे खरे कारण निष्पन्न होऊ शकणार आहे.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांविषयी सजग राहा

## घाटसावळी येथे बैठकीत तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे अधिकारी कर्मचारी यांना आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ डिसेंबर**

गुरुवार दिनांक १२ डिसेंबर रोजी घाटसावळी मंडळाची मंडळ स्तरीय बैठक बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली . प्रभारी जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठकीत प्रशासकीय योजना व प्रलंबित कामकाजांचा आढावा घेण्यात आला . या बैठकीला मंडळातील नागरिक , शेतकरी , मंडळ अधिकारी , तलाठी ( ग्राम महसूल अधिकारी ) , ग्रामसेवक , कृषी सहायक , बीएलओ , पोलीस पाटील , स्वस्त धान्य दुकानदार तसेच अंगणवाडी सेविका इत्यादी उपस्थित होते . सर्वप्रथम सरपंच, सर्व गावकरी व ग्रामपंचायत अधिकारी यांच्या वतीने चंद्रकांत शेळके यांचा यथोचित सत्कार करण्यात आला व त्यानंतर घाटसावळी मंडळाचे मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांच्यावतीने तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचा सत्कार करण्यात आला व त्यानंतर बैठकीस सुरुवात झाली. यावेळी घाटसावळी बाकरवाडीचे सरपंच बाबासाहेब पवार , सदस्य प्रकाश लांडे , नवनाथ चव्हाण

नागरीक अरुण लांडे , दादासाहेब लांडे , भारत फड , सिद्धार्थ खवतड , विनोद तांगडे , संकेत तांगडे , विलास कदम , सुंदर लांडे , ग्रामसेवक सचिन कदम , किरण सानप , भाऊसाहेब मिसाळ , बाबासाहेब घुमरे , पवळ , कृषी सहाय्यक श्रीमती कुलकर्णी , कमलाकर शिंदे , प्रविण अबूलगे , बी एल ओ सतिश लांडे , जोशी , श्रीमंत चव्हाण , अशोक चव्हाण , श्सुमित्रा आडसूळ, केसाळे सर , तांदळे सर ,सालपे सर , जोगदंड सर , सानप सर , स्वस्त धान्य दुकानदार शिवकुमार ढेपे , विष्णू गाडे , मदन लांडे , नवनाथ चव्हाण , विक्रम पोपळे , पोलिस पाटील कल्याण वरकड हजर होते . सुरुवातीलाच तहसीलदारांनी सांगितले तुमचे प्रश्न तुम्ही बिनधास्तपणे मांडा . आपण सगळ्यांचे प्रश्न जाणून घेऊ व त्यांना सक्षमपणे सोडवू.

# गोकुळ शिशुवाटिकेत गीता जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ डिसेंबर**

दीनदयाल शोध संस्थान संचलित गोकुळ शिशु वाटिकेत त गीता जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम दीप प्रज्वलन व कृष्णाची पूजन करण्यात आले. सौ क्रांती ताई पोरवाल यांनी कृष्णाचे भजन घेतले. त्यानंतर गीता जयंतीनिमित्त ध्रुव गट व प्रल्हाद गट यांची स्पर्धा घेण्यात आली. त्यामध्ये पंधरा मुलांनी सहभाग घेतला ध्रुव गटातून पहिला क्रमांक शिवम हाटवटे व आरोही तौर दुसरा क्रमांक अन्वि टेकाळे व विराज ढगे तसेच तृतीय क्रमांक साची पवार आला व प्रल्हाद गटातून जानवी गायकवाड हिचा पहिला क्रमांक आला. स्पर्धेनंतर लगेचच बक्षीस वितरण करण्यात आले स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून सौ स्वातीताई धारूरकर व वैष्णवी ताई भट या होत्या सौ स्वातीताई धारूरकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना गीतेचे महत्व सांगितले. व श्रीकृष्णाने अर्जुनाला आपली कर्तव्याची कशी पालन करायचे हे पण सांगितले आणि मुलांनी गीता का शिकावी हे पण सांगितले तसेच वैष्णवी ताई भट यांनी श्रीकृष्णावर एक अभिनय करून दाखवला. या कार्यक्रमासाठी का समिती सदस्य सुनंदाताई कुलकर्णी या पण उपस्थित होत्या. तसेच गोकुळ शिशुवाटिका प्रमुख सौ स्नेहलताई देशपांडे या उपस्थित होत्या. सूत्रसंचालन सौ मधुराताई गुळवेलकर आभार सौ.अश्विनीताई मुळे यांनी केले. या कार्यक्रमाचे मार्गदर्शन डॉ सीमाताई जोशी, अर्चनाताई तुंगार, सुनंदाताई कुलकर्णी व गंगाधरजी देशमुख सर यांचे लाभले.

# गोकुळ शिशुवाटिका शैक्षणिक सहल गोरक्षनाथ टेकडी येथे उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ डिसेंबर**

दीनदयाल शोध संस्थान संचलित, गोकुळ शिशुवाटिकेची सहल गोरक्षनाथ टेकडी येथे नेण्यात आली. प्रतिवर्षीप्रमाणे एक दिवसीय सहल खूप आनंदात संपन्न झाली सहभागी विद्यार्थी ६३ होते. सकाळी शाळेतून दहा वाजता सहल काढण्यात आली गोरक्षनाथ टेकडी येथे मुलांना त्रिमूर्ती दत्ताचे दर्शन करण्यात आले त्यानंतर गोकुळ शिशुवाटिका समिती सदस्य सुनंदाताई कुलकर्णी यांनी मुलांना सती अनुसया व गोरक्षनाथ टेकडी याचे महत्त्व व गोष्ट सांगितली. त्यानंतर गोरक्षवन मुलांना दाखवण्यात आले व तिथे भोजनाचा आनंद सर्वांनी घेतला. मुलांना खाऊ वाटप करण्यात आला. व तेथील सर्व प्राणी पक्षी यांची माहिती सांगण्यात आली. तसेच दीनदयाल शोध संस्थांच्या डॉ सीमाताई जोशी यांनी मुलांशी गप्पागोष्टी केल्या. सर्व मुलांनी गोरक्षवन येथील खेळण्या सिसो, घसरगुंडी, जम्पिंग, झोका याचा आनंद घेतला. या कार्यक्रमाचे सहल प्रमुख क्रांतीताई पोरवाल होत्या. तसेच ह्या कार्यक्रमासाठी गोकुळ शिशुवाटिका प्रमुख स्नेहलताई गोसावी उपस्थित होत्या. ध्रुव गटातील अन्वी टेकाळे हिचे पालक आजोबा श्री प्रमोद विठ्ठल जोशी यांनी सहलीला भेट दिली. या कार्यक्रमाचे मार्गदर्शन डॉ सौ सीमाताई जोशी, अर्चनाताई तुंगार, सुनंदाताई कुलकर्णी व गंगाधर जी देशमुख सर यांचे लाभले.

# रासायनिक सौंदर्य प्रसादने आरोग्यास हानिकारक–प्रा.डॉ सुहास गवळी

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१२ डिसेंबर**



सुंदर दिसण्यासाठी माहिती न घेता मोठ्याप्रमाणात विविध प्रकारची सौंदर्य प्रसादाने वापरली जातात परंतु यातील रासायनिक पदार्थ शरीरासाठी हानिकारक असून आयुर्वेदिक सौंदर्य प्रसादनाचा वापर करावा असे प्रतिपादन डॉ सुहास गवळी यांनी सुंदराराव सोळंके महाविद्यालयात बोलताना व्यक्त केले.

सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व रेड रेबन यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य प्रा.प्रकाश गवते होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ.सुहास गवळी होते. यावेळी शेख शहाबुद्दीन, सय्यद रईस, डॉ बिलास काळे, प्रा.ओ. एच. सारगे यांची प्रमुख उपस्थिती होती.सौंदर्य प्रसाधने प्रकार, निवड आणि उपयोग या विषयावर मार्गदर्शन करताना डॉक्टर सुहास गवळी म्हणाले की रासायनिक सौंदर्य प्रसादने शरीराला हानिकारक असून आपल्या शरीर रचनेप्रमाणे सौंदर्य प्रसाधनाची निवड करावी कारण प्रत्येकाच्या शरीर रचना व त्वचेची संवेदनशीलता ही भिन्न असते जर त्यातील एखादा घटक त्वचेला लागू पडत नसेल तर तो अपायकारक ठरेल.त्यासाठी आयुर्वेदिक सौंदर्य प्रसादाने वापरावीत.अध्यक्षीय समारोप करताना उपप्राचार्य प्रा. प्रकाश गवते यांनी नाही सौंदर्य प्रसादानाविषयी माहिती दिली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. उमेश राठोड यांनी केले.यावेळी प्राध्यापक, प्राध्यापका,विद्यार्थी विद्यार्थिनीयांची उपस्थिती होती.

# केज पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी अर्पिता ठुबे यांची धडाकेबाज सुरुवात

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१२ डिसेंबर**



केज पंचायत समितीला लाभलेल्या आयएएस अधिकारी तथा गटविकास अधिकारी अर्पिता ठुबे यांनी रुजू झाल्यापासूनच केज तालुक्यामध्ये कामाचा धडाका सुरू केला आहे आणि याचाच एक भाग म्हणून तालुक्यातील अनेक गावांना त्या भेटी देत असून त्या त्या ठिकाणच्या समस्या जाणून घेत आहेत. पंचायत समितीला मागच्या महिन्यामध्ये अर्पिता ठुबे आयएएस गटविकास अधिकारी म्हणून देशातील सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या यूपीएससीमध्ये दोन वेळेस उत्तीर्ण झालेल्या ह्या केजला गट विकास अधिकारी म्हणून लाभलेले आहेत सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण असलेल्या अर्पिता ठुबे यांना तालुक्यातील अनेक गावांना भेटी दिल्या असून त्या त्या ठिकाणी असलेल्या घरकुलांच्या नरेगाच्या आणि इतरही समस्या जाणून घ्या आणि त्या तात्काळ सोडवण्याचा प्रयत्न करत आहेत गुरुवार दिनांक १२ डिसेंबर रोजी त्यांनी सर्कलमधील सावळेश्वर, पैठण, ढाकेफळ, आनंदगाव, सारणी या गावांना भेट देत त्या ठिकाणी सुरू असलेल्या कामांना भेटी दिल्या यामध्ये घरकुल, दलीत वस्तीमधील काम,अंगणवाडी, जिल्हा परिषदेच्या शाळांना त्यांनी भेटी दिल्या यावेळी त्यांचे समवेत, पंचायत समिती चे ग्रामविकास अधिकारी काशीद, बांधकाम विभागाचे अभियंता हातागळे, नरेगाचे खाकरे यांचेसह सबंधित गावांचे सरपंच, उप सरपंच, ग्रामविकास अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# जास्तित जास्त विकास कामे करणारी पंचायत समिती म्हणुन गेवराई पं.स.ची ओळख व्हावी – आ. विजयसिंह पंडित

**पंचायत समितीच्या आढावा बैठकीने आ. पंडित यांच्या कामकाजाचा शुभारंभ**

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१२ डिसेंबर**

विधानसभेची निवडणुक संपली, राजकारण संपले आता विकास कामात राजकारण नको. सर्वसामान्यांची आर्थिक पिळवणुक नको, गरजवंत लोकांची कामे निट करा, प्रशासक काळातील मअधिकारी राजफ मधील अनागोंदी आता संपली पाहिजे. प्रलंबित कामे तात्काळ पुर्ण करा अशा सुचना आ. विजयसिंह पंडित यांनी करुन जास्तित जास्त विकासकामे करणारी पंचायत समिती म्हणुन गेवराई पंचायत समितीची ओळख व्हावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. गेवराई पंचायत समितीच्या कामकाजाचा आढावा घेतांना ते बोलत होते. यावेळी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्यासह तहसिलदार, गटविकास



अधिकारी, कर्मचारी, सरपंच, उपसरपंच व इतर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी मांडलेल्या तक्रारींचे त्याच ठिकाणी निराकरण केल्यामुळे आ. विजयसिंह पंडित यांच्या भुमिकेचे तालुक्यातील सरपंच व इतरांनी स्वागत केले.गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ. विजयसिंह पंडित यांनी गुरुवार दि. १२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वा. र.भ. अट्टल महाविद्यालयाच्या गोदावरी सभागृहात गेवराई पंचायत समितीच्या कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी व्यासपिठावर आ. विजयसिंह पंडित, जयभवानी कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित, तहसिलदार संदिप खोमने, गटविकास अधिकारी श्रीमती मिना कांबळे, नरेगाचे गटविकास अधिकारी अशोक राठोड, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, दैठणचे सरपंच प्रतापसिंह पंडित यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# पापनाथेश्वर माध्यमिक विद्यालयाचे प्रयोगाची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड

## तालुक्यातून सर्व प्रथम येण्याचा मान पापनाथेश्वर माध्यमिक विद्यायाच्या प्रयोगाला

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१२ डिसेंबर**



गटशिक्षण कार्यालय परळी वैजनाथ यांच्या वतीने संस्कार प्राथमिक शाळा परळी वैजनाथ येथे आयोजित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये श्रीनाथ मानव सेवा मंडळ संचलित पापनाथेश्वर माध्यमिक विद्यालय नाथरा च्या विज्ञान प्रयोगाने तालुक्यातून सर्वप्रथम येण्याचा मान मिळवला तसेच या प्रयोगाची जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवड करण्यात आली आहे.

सध्याच्या ऊर्जा संकटाला तोंड देण्यासाठी आणि पारंपरिक ऊर्जा स्त्रोताला एक ठोस पर्याय म्हणून कार्य करणारे सौर परावर्तक हे अतिशय लक्ष्यवेधी उपकरण शाळेतील इयत्ता दहावीचा विध्यार्थी विजय राजेश चव्हाण याने विज्ञान सहशिक्षक काळे सर यांच्या मार्गदर्शनातून साकार केले होते.हे उपकरण संपूर्ण प्रदर्शनामध्ये एवढे लक्ष्यवधी होते की,प्रदर्शनाचे उद्घाटक बीड जिल्ह्याचे मा. शिक्षणाधिकारी फुलारी सर यांनी या प्रयोगाची विशेष नोंद घेतली तसेच प्रमुख पाहुणे मा.गटविकास अधिकारी नागरगोजे सर आणि परळी चे मा.गटशिक्षणाधिकारी कनाके सर आदी मान्यवरांनीही या प्रयोगाची प्रशंसा केली. अशा या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ एकनाथ मुंडे साहेब तसेच मार्गदर्शक डॉ.संतोष मुंडे सर तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुलेखा मुंडे (कराड) मॅडम आणि शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभागी विध्यार्थी विजय चव्हाण व मार्गदर्शक शिक्षक नरेश काळे सर यांचे अभिनंदन केले व जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# मानवी हक्क दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ डिसेंबर**

मानवी हक्क संरक्षण कायदा १९९३ मधील कलम १२ अन्वये मानवी हक्काबाबत जनजागृती करणे हा राज्य मानवी हक्क आयोगाचा महत्त्वपूर्ण अविभाज्य भाग असून सदरील कायद्याअंतर्गत समाजातील तळागाळापर्यंत जनतेला मानवी हक्काचे ज्ञान व माहिती होण्यासाठी तसेच जनजागृती कार्यक्रमाचे प्रभावी आयोजन करण्यासंदर्भात शासन स्तरावर पत्राद्वारे कळविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे दि. १० डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता अपर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली मानवी हक्क दिन साजरा करण्यात आला असून या कार्यक्रमास जिल्हा न्यायालयाचे जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस अधिक्षक, समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त कारागृह अधिक्षक, नगर परिषदेचे मुख्याधिकारी, एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी उपस्थित होते.

# थेट लाभ योजनांसाठी लाभार्थ्यांना नोंदणीचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ डिसेंबर**

राज्य शासनाच्या श्रावन बाळ व संजय गांधी योजनेचे अनुदान वितरण हे माहे डिसेंबर २०२४ पासून डीबीटीद्वारे वितरित करण्यात येणार असून सदर वितरण करण्याकरिता संजय गांधी योजना व श्रावण बाळ सेवा योजनेचे लाभार्थी यांचे डीबीटी पोर्टलवर रजिस्ट्रेशन असणे आवश्यक आहे. बीड तालुक्यातील श्रावण बाळ व संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थी यांची डीबीटी पोर्टलवर रजिस्ट्रेशन व माहिती अद्यावत करणे बाकी असून सदरची डीबीटी झाली नाही तर संजय गांधी योजना व श्रावण बाळ योजनेचे अनुदान बंद होऊ शकते याची लाभार्थ्यांनी नोंद घ्यावी. सदर डीबीटी पोर्टलवर नोंदणी करण्यासाठी लाभार्थी यांचे खालील प्रमाणे कागदपत्र असणे आवश्यक आहे. डीबीटी करण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज, बँक पासबुक, आधार कार्ड, रेशन कार्ड, संजय गांधी योजनेचा लाभार्थी असल्यास दिव्यांगाचे प्रमाणपत्र, मृत्यू प्रमाणपत्र, आजाराबाबतचे प्रमाणपत्र, परितक्ता असल्याबाबतचा मान्य न्यायालयाचा पुरावा.https://docs.google.com/forms/d/IF-IpQlscxd6juxdvdhw2heg7d4gyzjaeedmdvf5kguexyr3hjp-rb-/viewform या संकेतस्थळावर स्वतः तलाठी यांच्यामार्फत तहसील कार्यालय विभाग येथे माहिती भरावी, असे तहसीलदार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

▶▶ दैनिक 'तरूण भारत'च्या बातमीला यश.. ▶▶

# औसा पालिका प्रशासनाकडून मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त

▶▶ एमआयएमच्या चार वर्षापासूनच्या मागणीला अखेर यश...



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१२ डिसेंबर -**
मोकाट कुत्र्यांनी औसा शहरातील शंभराहून नागरिकांना चावा घेतल्यानंतर चार दिवसापुर्वी तीन वर्षाच्या चिमुकलीला गंभीर जखमी केले होते. गेल्या चार वर्षापासूनच्या मागणीला या घडलेल्या गंभीर घटनेनंतर एमआयएमचे जेष्ठ नेते मुझ्झफरअली इनामदार यांनी टाळे ठोकण्याचा इशारा दिल्यामुळे पालिका प्रशासनाला जाग आली. बुधवार दि.११ रोजी सकाळी ११ वाजेपासून शहरातील मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यास सुरुवात करण्यात आली असून एमआयएमच्या मागणीला अखेर यश आले आहे.

शहरात मोकाट कुत्रे फिरुन ये जा करणाऱ्या नागरिकांना चावा घेत असल्याने एमआयएमच्या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी २०२१ मध्ये केली होती. यानंतर दरवर्षी तीन चार निवेदन देऊन मागणी करण्यात येत होती. तसेच शहरातील अनेक नागरिकांनी अनेकवेळा पालिका प्रशासन व आपआपल्या प्रभागातील लोकप्रतिनिधीकडे मागणी केली होती. पालिका प्रशासनाने शहरवासियांच्या या मागणीकडे कानाडोळा करीत दुर्लक्ष केले.यामुळे मोकाट कुत्र्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली.

याप्रमाणात शहरवासियांना चावा घेण्याचे, अंगावर येण्याचे प्रमाणही वाढले. यामुळे शहरात घबराहटीचे वातावरण पसरले होते. औषधाअभावी अनेकांनी लातूर येथील खाजगी रुग्णालयातून उपचार केले. तर शेकडो नागरिकांनी शहरातील ग्रामिण रुग्णालयातून उपचार करुन घेतले. गेल्या चार दिवसापुर्वी कुरेशी गल्लीतील तीन वर्षाच्या आयना सल्लाउद्दीन कुरेशी या लहान मुलीचा चावा घेऊन गंभीर जखमी केले. या मुलीवर लातूर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

या गंभीर घटनेनंतर एमआयएमने बंदोबस्त करण्याची मागणी करुन उपचाराचा खर्च नगरपालिकेने करावा, अशी मागणी नगरपालिका प्रशासनाकडे केली होती. नागरिक व एमआयएम यांच्या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याच्या मागणीला वेळोवेळी दै. तरुण भारत ने प्रसिध्दी दिली होती.

दि.९ डिसेंबर रोजी एमआयएमने नगरपालिका व राज्याचे मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली होती. या मागणी बातमी जखमी मुलीवरील उपचाराचा खर्च नगरपालिकेने करावा या मथळ्याखाली दै. तरुण भारते सोलापुरने दि.१० रोजी बातमी प्रकाशित केली होती. या बातमीची पालिका प्रशासनाने तात्काळ दखल घेत मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यास सुरुवात केली.

स्वच्छता निरीक्षक महेमुद शेख व पालिका कर्मचाऱ्यांनी यासाठी पुढाकार घेतला होता. आज दिवसभरात ५० मोकाट कुत्रे पकडले आहेत.

### मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणार : मुख्याधिकारी मंगेश शिंदे

शहरातील मोकाट कुत्र्यांना पकडून त्यांचे लवकरात लवकर निर्बिजीकरण करुन कायमस्वरुपी बंदोबस्त करण्यात येणार आहे. शहरातील संपुर्ण मोकाट कुत्र्यांवर शस्त्रक्रिया होईपर्यंत अभियान सुरु ठेवणार असल्याची माहिती नगरपालिकेचे मुख्याधिकारी मंगेश शिंदे यांनी दिली.

### एमआयएमकडून दै. 'तरुण भारत'चे आभार...

शहरातील नागरिकांनी व एमआयएमच्या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याच्या मागणीला वेळोवेळी प्रसिध्दी दिली. दै. तरुण भारतच्या सहकार्याबद्दल एमआयएमचे जेष्ठ नेते मुझ्झफरअली इनामदार यांनी यावेळी आभार व्यक्त केले.

## ▶▶ क्राईम वृत्त...

### देवणी ते लातूर देवर्जनमार्गे बससेवा सुरू करण्याची मागणी

**उदगीर, दि.१२ डिसेंबर -**
देवणी ते लातूर देवर्जन मार्गे बससेवा सुरू करण्याची मागणी या परिसरातील प्रवाशांनी व हत्तीबेट सदभक्तांनी केली आहे. देवणी ते लातूर देवर्जन, शिरूर अनंतपाळ-बोरी-बाभळगाव हत्तीबेट व आरीबेट ही दोन मोठी देवस्थाने आहेत. या दोन्ही ठिकाणी दर्शनासाठी रोज भाविक भक्तांची मोठी गर्दी असते. या दोन्ही ठिकाणी दर्शनासाठी जाण्यासाठी थेट बससेवा उपलब्ध नसल्यामुळे सदभक्तांची मोठी गैरसोय होत आहे. शिवाय देवणीहुन लातूरला जाण्यासाठी हा सर्वात जवळचा मार्ग असल्यामुळे या मार्गे बससेवा सुरू करण्याची मागणी आहे. दिवसभरातून किमान चार फेऱ्या देवणी ते लातूर सुरू करून या भागातील प्रवाशांची सोय करावी, अशी मागणी हत्तीबेट पंचक्रोशीतील भक्तांनी केली आहे.





### शास्त्री विद्यालयात नवव्या अध्यायाचे सामुदायिक पठण

**उदगीर, दि.१२ डिसेंबर -**
लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात भगवद्गीता जयंती निमित्त सर्व शिक्षक विद्यार्थी यांनी सामुदायिक रित्या भगवद्गीतेच्या नवव्या अध्यायाचे पठण केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शंकरराव लासुणे होते तर व्यासपीठावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक रविंद्रजी जाधव, संघ जिल्हा कार्यवाह रामचंद्र बिराजदार, बालाजी धमनसुरे, रामभाऊ मोतीपवळे, विक्रम हलकीकर, संतोषराव कुलकर्णी, विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले, उपमुख्याध्यापक अरुण पत्की, लक्ष्मीकांत नेलवाडकर, चिन्मय मिशनचे सदस्य अरुण सुरशेटवार, उमाकांत कोनाळे, लालासाहेब गुळभिले, भाग्यश्री लोखंडे, अंबिका जोशी, वर्षा जावरे, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट, माधव मठवाले उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व स्वागत परिचय विजयाराणी गोविंदवाड, प्रास्ताविक अनिता येलमटे तर आभार बालाजी पडलवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.



### उदयगिरीत आरोग्य तपासणी शिबिर

**उदगीर, दि.१२ डिसेंबर -**
येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, अंधश्रद्धा निर्मूलन समिती उदगीर व धन्वंतरी आयुर्वेदिक महाविद्यालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने देश का प्रकृती परीक्षण अभियानांतर्गत महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यासाठी बनवलेल्या विशेष एप्लीकेशनची माहिती देण्याविषयीच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष रामचंद्र तिरुके, सचिव म.ए. सोसायटी उदगीर हे होते. प्रमुख उपस्थिती अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कोषाध्यक्ष प्राचार्य विजयकुमार पाटील, बाबुराव माशाळकर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य राजकुमार मस्के यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.बी.एस. भुक्तरे यांनी केले तर प्रा.डॉ. बालाजी होकरणे यांनी मानले.



### जीवन प्रयाग फाऊंडेशनतर्फे सपना बिरादार यांचा सत्कार संपन्न

**उदगीर, दि.१२ डिसेंबर -**
जीवन प्रयाग फाऊंडेशन उदगीरच्या वतीने महाराष्ट्र शासन तर्फे घेण्यात येणाऱ्या (लेखापरीक्षक) मे महिन्यामध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल ६ डिसेंबर रोजी लागला आहे. यामध्ये शिवनगर कॉलनी, उदगीर येथील सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थिनी सपना सूर्यकांत बिरादार यांनी अत्यंत परिश्रमाने पहिल्याच प्रयत्नामध्ये यश मिळवली आहे. त्यामुळे त्यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला. यावेळी जीवन प्रयाग फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रभात सुर्यवंशी, प्रा. निलेश चवळे, सूर्यकांत बिरादार, संगीता बिरादार, नितीश शिरशे, क्षितिज जाधव उपस्थित होते.

## चाकूरच्या पीएमश्री केन्द्रीय विद्यालयाची सोलापूर विज्ञान केंद्राला भेट विविध विषयांची घेतली माहिती



**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.१२ डिसेंबर -**
चाकूर येथील पीएम श्री. केन्द्रीय विद्यालय येथील विद्यार्थ्यांनी सोलापूर विज्ञान केंद्राला भेट दिली आणि तेथील विविध विषयांची माहिती घेतली.पिएम श्री. अंतर्गत विविध कार्यक्रम केंद्र सरकारच्या आदेशानुसार वर्षभरात विविध शैक्षणिक उपक्रम राबवले जातात. त्याचाच एक भाग म्हणून सोलापूर येथील विज्ञान केंद्राला भेट देण्यात आली. या शैक्षणिक उपक्रमात वर्ग सहावी ते दहावी वर्गातील विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

पीएम श्री. केंद्रीय विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सोलापुर विज्ञान केंद्र येथे भेट देऊन विविध वैज्ञानिक क्रांतीचा अभ्यास केला त्यात टेक्सटाइल मधे धागा निर्मिती, कापड़ निर्मिती, कापड छपाई, तारा मंडळ गुफा, दिशा, तारे, चंद्रमा, मस्ती विज्ञान केंद्रामधे ग्रेविटेशन, पंडोलीम, तूस्नामी, लाईट, थ्रीडी मूवी शोमध्ये विविध प्राणी अभ्यास आणी विज्ञान पार्क मधे लैटिट्यूड आणि लोंगीटूड आवाज प्रसार अश्या विविध अभ्यासपूरक संकल्पनांचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला.

या सर्व शैक्षणिक उपक्रमाचे नियोजन विद्यालयाचे प्राचार्य हरीश कटारिया, पन्नालाल इंगोले यांनी केले. यावेळी विद्यालय शिक्षक सतीश फुलारी, संतोष नरहरे, सोनू शर्मा, रितिक माली, मोहित कुमार, प्रदीप यादव, नईम शेख,रितु मैडम, राजेश्वरी इंगले, राजेश्वरी जाधव, चारुशीला, पुजा विद्यार्थीसोबत राहून सर्व नियोजन यशस्वी केले. या उपक्रमाबद्दल पालक वर्गातून विद्यालयाचे व सर्व शिक्षकांचे कौतुक केले जात आहे.

## पिक संरक्षणसाठी आता प्लास्टिक पाईपची गन; गण खरेदीकडे शेतकऱ्यांचा कल

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१२ डिसेंबर -**
अहमदपूर तालुक्यातील झाडे, झुडपे, पडीक जमिनीचे क्षेत्र आणि डोंगर दऱ्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे या भागात वन्यप्राण्यांची संख्या ही जास्त आहे. त्या मुळे शेतकऱ्यांना वन्यप्राण्याच्या पिकांचे संरक्षण करणे फार गरजेचे आहे. याच कारणासाठी येथील बाजारपेठेत अगदी २०० रुपये किंमतीमध्ये वन्य प्राण्यांना पळवून लावण्यासाठी, हुसकावण्यासाठी प्लास्टिकच्या पाईपापासून बनवलेली प्लास्टिक गन ही विक्रीसाठी उपलब्ध झाली आहे. आणि याचा आवाजही शांत वातावरणात किमान अर्धा किलोमीटर जातो, त्यामुळे शेतकरी ही गन खरेदी करत असल्याचे पहावयास मिळत आहे.



तालुक्यात हरीन, डुकरांचे कळप मोठ्या प्रमाणात खरीप व रब्बी पिकांचे नुकसान, नासाडी करत आहेत. त्यांना पकडणे हे कायद्यानुसार गुन्हा आहे त्यामुळे अशा प्राण्यांना शेतातून फक्त पळवून लावणे हाच पर्याय शेतकऱ्यासमोर आहे. मात्र रात्री बे रात्री शेतकऱ्यांना ओरडून हुसकावणे, स्वतः त्या ठिकाणी उपस्थित राहून फटाक्याचे आवाज करणे हा उपाय सर्रास वापरला जातो. काही काही शेतकरी रात्रभर लाऊड स्पीकर लावून ठेवत आहेत. तसेच फटाके फोडणे हा अत्यंत महागडा उपाय आहे, हे सर्वसामान्य शेतकऱ्यांना परवडत नाही आणि ऊसासारख्या पिकासाठी फार जिकिरीचे आहे. असे शेतकरी सांगत आहेत. परंतु आता हा शेतकऱ्यांचा त्रास या प्लास्टिक गण पासून कमी होईल असेही बोलले जाते. वन्य प्राण्यांच्या संरक्षणासाठी बाजारात विक्रीसाठी आलेली गण ही प्लास्टिकच्या पाईपा पासून बनवलेली असून त्यामध्ये खालच्या बाजूने प्रेशर देण्यासाठी एक पाईप दिलेला आहे. व गन मध्ये काही प्रमाणात कार्पेट (बोरॅक्स रॉक) हा वेल्डिंगला वापरला जाणारा पदार्थ पाईपला असलेल्या छिद्राद्वारे टाकतात. तसेच गनमध्ये कार्पेट व थोडेसे क्वचित पाणी टाकून हाताने दाबून प्रेशर दिले जाते, त्यामुळे इथेनॉल गॅस तयार होतो. व त्याचा जोरदार आवाज होतो. त्यामुळे वन्य प्राणी पळ काढतात. या गनच्या आवाजामुळे स्वतःच्या शेताचे तर संरक्षण होतेच त्याचबरोबर शेजाऱ्यांच्या शेतीचेही संरक्षण होते.

रात्री बे रात्री शेतात सर्वत्र न जाता, एकाच ठिकाणावरून प्लास्टिक गन वापरून आपण शेत पिकाचे संरक्षण करू शकतो. ही गण बाजारात दोनशे रुपये उपलब्ध असून यासाठी लागणारे रॉ मटेरियल म्हणजे कार्पेट (वेल्डिंग मटेरियल) हे सुद्धा खूप स्वस्त आहे. त्यामुळे अगदी कमी खर्चात शेतकऱ्यांना पिक संरक्षण करता येते.

## हिंदूवरील अत्याचाराचा बांगलादेशी झेंडा जाळुन निषेध




**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१२ डिसेंबर -**
बांगलादेशातील हिंदु अल्पसंख्यांकवर होत असलेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ अहमदपुर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे बागलादेशी झेंडा जाळुन निषेध नोंदवीला.

बांगलादेश येथिल हिंदु धर्म स्थळे, हिंदू समाजावर होणारे अत्याचार, मंदिरे, बुद्ध विहार, गुरुदवारा, वरील होणारे हल्ले व येथील संत महंतानवर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्थ अहमदपुर येथे दि.१० डिसेंबर रोजी अहमदपुर शहरातील सर्व हिंदू बांधवांच्या वतीने बांगलादेशी झेंडा जाळुन तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

त्या निवेदनावर ॲड. स्वप्नील होत्ते, पाडुरंग लोकरे, संजय मुसळे, ज्ञानेश्वर कोटगिरे, अमर पाटील, बाळासाहेब गुट्टे, किरण भालके, नरेश यादव, ज्ञानोबा भताने, बाळासाहेब शेळके, रोकडोबा भुसावळे, शैलेश ठाकुर, महादेव येरमुळे, मधूकर धडे, ॲड सोमनाथ फुले, नितीन काळे तसेच आणेक हिंदु बांधव उपस्थित होते.

## खंडोबा यात्रेनिमित्त होंडाळ्यात भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१२ डिसेंबर -**
होंडाळा येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी चंपाषष्ठी निमित्ताने खंडोबा यात्रेचे आयोजन केले होते. या यात्रेनिमित्त विविध धार्मिक यात प्रामुख्याने वाघ्या मुरळी वारुचा कार्यक्रमाने खंडोबा देवाची मिरवणूक (पालखी) सोहळा साजरा केला जातो. या सोहळ्यास पंचक्रोशीतील तसेच महाराष्ट्रातील पालखी सोहळ्यात तसेच यात्रा महोत्सवात सहभागी होवून येळकोट येळकोट जय मल्हार असा जयजयकार करीत भक्तीभावाने बेल भंडाऱ्याची उधळण करतात. रातभर वाघ्या मुरळीचा कार्यक्रम होतो वाघ्या मुरळी रात्रभर देवाचे गाणी व खंडोबा देवाची कथा सांगितली जाते.





या यात्रेसाठी बाहेर गावाहून येणाऱ्या वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था केली जाते.तसेच येणाऱ्या भाविकांची संख्या पाहता या गावात बसेसची व्यवस्था नसल्यामुळे अनेक भक्तगणांना पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या हिप्परगा येथून चालत यावे लागते. त्यामुळे महामंडळाच्या माध्यमातून होंडाळा या गावासाठी दिवसातुन दोन वेळा बसची व्यवस्था करण्यात यावी अशी मागणी येथील नागरिकांतून होते आहे. या यात्रेत विविध दुकाने थाटली जातात. तसेच मोठी आर्थिक उलाढाल होते.

या यात्रेस येणाऱ्या भाविकांची महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या माध्यमातून होंडाळा या गावासाठी दिवसातुन दोन वेळा बसची नितांत गरज आहे. ती व्यवस्था संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित सुरू करून सहकार्य करावे, अशी मागणी होंडाळा येथील नागरिक करीत आहेत.

## होंडाळा येथे खंडोबा यात्रेत जंगी कुस्त्यांचा थरारा; अनेक जिल्ह्यातील कुस्तीपटूंचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**शि. अनंतपाळ, दि.१२ डिसेंबर-**
येथुन जवळच असलेल्या होंडाळा येथील खंडोबा देवाच्या यात्रेच्या निमित्ताने जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते. या यात्रेनिमित्त कुस्त्यांचे आयोजन समस्त गावकरी करतात. पहिली कुस्ती ५० रुपये ते शेवटची कुस्ती ५ हजार रुपयांची झाली.

या कुस्तीच्या मैदानात अनेक गावचे पैलवान उतरले होते. यात परभणी, नांदेड, लातूर, हिंगोली, बीड, धाराशिव, संभाजीनगर, सातारा, सांगली या जिल्ह्यासह कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा राज्यातील पैलवान उतरले होते.

अनेक पैलवान जिंकून आपल्या गुरुला नमण करून आनंदोत्सव साजरा करत होते. तर तुरळकच पैलवानांना बोरोबरीत कुस्ती सोडण्याचा निर्णय पंचांनी घेतल्यामुळे प्रेक्षकांच्या नाराजीच्या प्रतिक्रिया ऐकायला मिळत होत्या. पै.कै.रोहीदास कांगणे यांच्या रामानुज कुस्ती आखाडा माळाकोळी जिल्हा नांदेड येथील एकाच आखाड्यातील दोन पैलवानांनी कुस्ती खेळुन जिंकली. यात पै. कृष्णा गुट्टे यांनी १५०० रुपयांची कुस्ती खेळुन जिंकली तर पै. दिप रोहीदास कांगणे यांनी बेळगाव येथील पाशा शेख याला चितपट करून ५ हजार रुपयांची शेवटची कुस्ती जिंकली. त्यामुळे होंडाळा नगरीचे प्रथम नागरिक सरपंच उमाकांत येंडे, उपसरपंच संदीप सुर्यवंशी, दिगांबर सोनटक्के, कल्याण सुर्यवंशी, गोलंदाज सोनकांबळे, बाबुराव फसमल्ले, शिवा महाराज सांगवीकर, प्रकाश खंडगावे, नामदेव गुडमे यांनी यथोचित सन्मान देवून पै. दिप कांगणे याचा सत्कार करण्यात आला. यांच्या सहकार्याला रामराव कोंडामंले, संजय थोटे, भगवान सोनटक्के, बसवेश्वर पाटील, प्रकाश ईबितदार, बालाजी कोंडामंगले, भाजपा शाखा अध्यक्ष रमाकांत चाकोरे, भानुदास सोनटक्के, माधव साखरे, शंकर गुडमे, सचिन सोनटक्के, बालाजी वारे, आकाश सुर्यवंशी, नितीन चाकोरे, कैलास चाकोरे, गजानन सोनटक्के, नागेश सोनटक्के, उमेश सूर्यवंशी, शिवहार सोनटक्के, भिमाशंकर ईबितदार, बाबुराव वारे, नागोराव भालेराव, उध्दव भालेराव, इत्यादी कुस्ती प्रेमींनी परिश्रम घेवून कुस्त्यांचे आयोजन केले होते.



**जाहिर प्रगटन**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार**
**चाकूर, यांचे कार्यालय**
**(दंडणीय - विभाग)**

**जा.क्र.२०२४/एमएजी/कावि** दि. १८/१२/२०२४
**अर्जदार :- श्री. शेख फयाज उम्मान**
**विरूध्द**
**गैरअर्जदार : मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर**
**अर्ज कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी कायदा.**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात श्री/श्रीमती लेख फयाज उम्मान रा. चाकुर, ता. चाकुर, जि. लातुर यांनी १३ (३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार यांचा मुत्तमा **कु. शेख विलाल पायाजगाव जन्म दि. १६/०६/१९९५** झाला असुन मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर, ता. चाकुर, जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने तीच्या जन्म तारखेची नोंदणी मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकुर, ता. चाकुर, जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यानी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोनाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.

**दि. १२/१२/ २०२४**
**पुढील तारीख १५/०१/२०२५**

**आदेशावरून /-**
**तालुका दंडाधिकारी तथा तहसीलदार,**
**तहसील कार्यालय, चाकुर**

# शेतकऱ्यांच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहचण्यासाठी प्रयत्न करा : ॲड. हेलोंडे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १२ डिसेंबर**

शेतकरी जगाचा पोशिंदा आहे आहे. तो जगलाच पाहिजे त्यासाठी प्रत्येक शेतकऱ्यांना सन्मानाची वागणूक दिली पाहिजे. शेतकऱ्यांसाठी विविध कल्याणकारी योजना शासन राबवत आहे. या योजना शेतकऱ्यापर्यंत पोहचण्यासाठी आपण प्राधान्याने प्रयत्न करा. आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला आपलं कुटुंब समजून त्यांच्या पर्यंत जावून आवश्यक मदत करून त्यांना आधार द्या, असे प्रतिपादन कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ड निलेश हेलोंडे पाटील यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात गुरुवारी त्यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत ते बोलत होते.

बैठकीस जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, उपवनसंरक्षक केशव वाबळे,उपजिल्हाधिकारी रोहयो ललितकुमार वऱ्हाडे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी डी. आर. कळसाईत, कौशल्य विकास विभागाच्या सहायक आयुक्त रेणुका तम्मलवार, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी डी. एस. इंगळे, शिक्षणाधिकारी सविता बिरगे, रेशीम विकास अधिकारी पि. बी. नरवाडे, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. प्रविणकुमार घुले, जिल्हा आरोग्य अधिकारी संगिता देशमुख यांच्यासह जिल्ह्यातील विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबल्या पाहिजेत. या आत्महत्येत तरुण शेतकऱ्यांचा समावेश आहे. यासाठी सर्वांनी मिळवून प्रयत्न करण्याची गरज आहे. शेतकऱ्यांचे नैराश्य कमी करून त्यांच्या आत्महत्या आपल्याला रोखता येतात. यासाठी ग्रामीण भागात पोवाडा, नाटक, किर्तनासारख्या अनेक उपक्रम राबविले पाहिजेत. सामाजिक बांधिलकीतून संतगाडगेबाबांनी केलेल्या कार्याची आठवण ड निलेश हेलोंडे पाटील यांनी यावेळी करून दिली.

शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी मराठवाड्यात चारा लागवडीबाबत वाढ होणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्यात प्रयत्न करून मोफत चारा वाटपाचा उपक्रम हाती घ्यावा. जैविक नैसर्गिक खते निर्माण करण्याची प्रयोगशाळा सुरू झाल्यास शेतकऱ्यांचा होणारा उत्पादन खर्च कमी होईल. यासाठी शेतीच्या बांधावर जाऊन त्याचे प्रयोजन करावे. सुशिक्षित तरुण शेतकऱ्यांचा यात मोठा सहभाग वाढवावा, अशी सूचना त्यांनी केली.पिक विमा उतरवितांना शेतकऱ्यांना मदत लागते. यासाठी पिक विमा कंपनीच्या प्रतिनिधींचे नाव, संपर्क क्रमांक प्रत्येक गावात दर्शनी भागात प्रसिद्ध केली पाहिजेत, असे सांगून त्यांनी हदगाव तालुक्यातील एका प्रतिनिधींला संपर्क होतो का याची प्रत्यक्ष तपासणी केली व माहिती घेतली.

शेतमालाचे किमान आधारभूत मूल्य कृषि उत्पन्न बाजार समितीत दर्शनी भागावर दिसणे आवश्यक आहे. यासाठी मोठे फलक करून लावावेत. शेतमाल तारण योजनेचा लाभही शेतकऱ्यांना मिळाला पाहिजे. ही योजना चांगली असून यातून शेतकऱ्यांना मोठी मदत होते. जिल्ह्यातील शेतकऱ्यांची संख्या लक्षात घेऊन सोयाबीन केंद्र वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी सूचना त्यांनी केली. शेतकऱ्यांच्या विविध योजनांचा आढावा घेऊन ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मुलांनाही त्या समजल्या पाहिजेत यासाठी विविध माध्यमाचा उपयोग करून त्यांच्या पर्यंत त्या योजना गेल्या पाहिजेत यासाठी प्रयत्न करावेत. ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाची सोय, स्पर्धा परीक्षा वाचनालय व शाळेत पटांगणाची सुविधा असणे आवश्यक आहे. शाळेच्या मैदानी खेळातून लहान मुलांचा शारीरिक विकास चांगला होतो. क्रीडा कार्यालयाच्या विविध योजनेतून ग्रामीण शेतकऱ्यांच्या मुलांसाठी अनेक उपक्रम राबवावेत.आपल्याला निसर्गावर प्रेम करता आले पाहिजे. निसर्ग समजल्याशिवाय निसर्ग वाचवता येत नाही. लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची गोडी निर्माण करून टेलीस्कोप उपकरणाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळांतर्गत कंपन्यांच्या सीएसआर निधीतून शेतकऱ्यांसाठी विविध योजना व उपक्रम राबविण्यात येतात. याची माहिती घेऊन शेतकऱ्यांना पुरक यंत्रसामुग्री वाटपासाठी प्रयत्न करून शेतकरी कुटुंबाला मदत करावी. क्याकटसच्या उत्पादनाचा खर्च कमी येतो, पाणी कमी लागते यासह विविध फळ प्रक्रियेवर भर देवून कृषि विभागाने कौशल्य विकास विभाग व पशुसंवर्धन विभागाच्या मदतीने तरुणाला रोजगार उपलब्ध होतील यासाठी प्रयत्न करावेत. कौशल्य विकास विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या रोजगार मेळाव्याची त्यांनी माहिती घेतली. बँकांनी खरीप हंगामात कर्ज वाटपातून शेतकऱ्यांना मदत करावी असे सांगून वन्य प्राण्यापासून शेतकऱ्यांचे नुकसान व मोबदला अनुदान वाटपाची माहिती त्यांनी घेतली. जनावरांना धोका होऊ नये म्हणून शेतकरी रात्री थंडीत जनावरांची काळजी घेतो. जंगलात फळांची झाडे लावल्यास वन्यप्राणी गावात येणार नाहीत. त्यासाठी जंगलातील फळझाडांचे अधिक प्रमाण वाढवावे. वनविभागाच्यावतीने विविध योजना राबविल्या जातात त्या शेतकऱ्यांना माहिती करून द्याव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.

**शेतकऱ्यांसाठी दामिनी प**

विज पडून मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांसह जनावरांचे मोठे नुकसान होते. शेतकऱ्यांनी आपल्या मोबाईलमध्ये दामिनी प वापरावा. या पमुळे ४ तास आगोदरच विज पडणार असल्याची माहिती आपल्याला मिळते. त्यामुळे पशुधनाचे व शेतकऱ्यांचे नुकसान होत नाही. यासाठी शेतकऱ्यांने जागरूक राहिले पाहिजे, असे आवाहन ड निलेश हेलोंडे पाटील यांनी केले. कृषि विभागाच्या विविध योजना शेतकऱ्यांपर्यंत ग्रामस्तरावर सविस्तर पुस्तक स्वरुपात पोहचल्या पाहिजेत. यासाठी कृषि विषयक विविध योजनेच्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन त्यांच्या हस्ते यावेळी करण्यात आले. नांदेड जिल्हा रेशीम क्षेत्रात आघाडीवर असून शेतकरी पारंपारिक पिकासोबतच हळद, केळी, स्ट्रॉबेरी फळ घेण्याकडे कल वाढवत असल्याची माहिती जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिली. विषय सुचीनुसार सादरीकरणाद्वारे जिल्ह्यात शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रम व योजनांची माहिती दिली. शेवटी निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी आभार मानले.

## संक्षिप्त वृत्त



### संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती मुदखेड येथे मोठ्या उत्साहात

**मुदखेड**-शहरात दि. ८ डिसेंबर रोजी संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती सर्व धर्मातील राजकीय पक्षांचे नेते तसेच प्रमुख पदाधिकारी व तालुक्यातील नागरिक यांच्या उपस्थितीत संताजी जगनाडे महाराज यांच्या जयघोषात साजरी करण्यात आली. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी तेली समाजाच्या वतीने संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे. या जयंतीला जिल्हाध्यक्ष बी आर कदम, कार्याध्यक्ष बालाजी चव्हाण, तिरुपती पाटील कोंडेकर, भगवानराव मनूरकर, माधवराव पवळे, तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, शहराध्यक्ष कैलास गोडसे, राम कुलूपवार, गंगाधर पगीरवार, बजरंग पिन्नलवार, मोहम्मद गौस,नागेश शिवाजी पिन्नलवार, महेश पिन्नलवार, करीम खान, मुजिब पठाण, संदीपकुमार देशमुख, माधव हामंद, साहेबराव गोरखवाड, ईश्वर पिन्नलवार, सुरेश सूर्यवंशी, आकाश सोनटक्के, संजय बोकेफोड, दादाराव पाटील, बळवंत पाटील, सूर्यकांत चौदंते, अविनाश चौदंते, यशवंत रानखांबे, अब्दुल रजाक, भगवान पवार, राजेश पवार, रमेश बोडके, अविनाश हटकर, बालाजी गुळेवाड, प्रशांत पाटील, शिवाजी वडजे, युसूफ भाई, अश्फाक मौली, मोईन फुलवाले अनिल कल्याणे आदी उपस्थित होते.

### परभणी येथे घडलेल्या संविधान प्रतिकृतीच्या अवमानाबद्दल मुखेडात तीव्र निदर्शने



**मुखेड**-महाराष्ट्रातील परभणी येथे दि.१० डिसेंबर २०२४ रोजी शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात असलेल्या भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची समाजकंठकाकडून झालेल्या तोडफोड व विटंबनेच्या निषेधार्थ मुखेड येथे सर्वपक्षीय संविधान प्रेमी नागरिकांकडून परभणी येथील घटनेचा जाहीर निषेध म्हणून निदर्शने करण्यात आली व तहसीलदार व पोलीस निरीक्षक मुखेड यांना निवेदन देण्यात आले. सध्या देशात आणि राज्यात धर्मांध व जातीयवादी विद्वेषाचा प्रचार व प्रसार करुन कायदा सुव्यवस्था बिघडवण्याचे काम होत आहे व सरकार कडुन अश्या घटनांना आळा घालण्यासाठी आवश्यक प्रयत्न होताना दिसुन येत नाहीत उलटपक्षी अश्या दोषींना पाठबळ देण्याचे काम होत असताना दिसत आहेत यामुळे संविधान विरोधी शक्तींची हिंमत वाढत आहे. संविधानाचा अवमान खपवून घेतला जाणार नाही, दोषींना व माथे भडकवण्याचे काम करणा-यांवर कडक शासन करा तसेच घटनेतील मुख्य आरोपी व त्याच्या पाठीराख्यांना त्वरित अटक करून संविधानिक मार्गाने आंदोलन करणाऱ्या संविधानवादी आंदोलकांवरील गुन्हे माघार घेण्याची मागणी करण्यात आली. मुखेड तालुक्यातील संविधानवादी जनतेकडून तहसीलदार व पोलीस निरीक्षक मुखेड यांना निवेदन देवून व काळ्या फिती लावून तीव्र निदर्शने करण्यात आले. या निवेदनावर के. एच.हसनाळकर, ड.संजय भारदे, गंगाधर सोंडारे ,भारत सोनकांबळे, संतोष बनसोडे, पवन कांबळे , केतन भेदेकर ,आकाश कांबळे, परमेश्वर सोनकांबळे, अशोक नाईक, कुलदीप कोत्तापल्ले,संदीप कांबळे बावलगावकर, आशीष भारदे,विजय लोहबंदे,अविनाश कांबळे, बंटी कांबळे, गंगाधर कांबळे, मनोज ढवळे, सचिन गायकवाड, पत्रकार मेहताब शेख, बबलू मुल्ला, रियाज शेख, आसद बल्खी, एस.के.बबलू ,विठ्ठल सोनकांबळे, अजय कांबळे, इत्यादींचा यावेळी उपस्थित होते. यावेळे सूत्रसंचालन पत्रकार भारत सोनकांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन कॉम्रेड अंकुश माचेवाड यांनी केले.या निषेध कार्यक्रमास मुखेड पोलिसांनी चोख बंदोबस्त तैनात केला होता.

### स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांची जयंती निमित्त अभिवादन

**इस्लापूर**-भाजपाचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांची आज जयंती असून त्यानिमित्त इस्लापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले यावेळी विधानसभा जिल्हा संयोजक गोविंद अंकुरवाड यांनी गोपीनाथ मुंडे यांच्या चरीत्रावर बोलतांना म्हणाले की नाथ्रात जन्म झालेल्या गोपीनाथ मुंडे यांचा राजकीय प्रवास बराच खडतर होता. जिल्हा परिषद सदस्य ते केंद्रीय मंत्री असा राजकीय प्रवास त्यांनी केला. राजकारणाचा कुठलाही वारसा नसताना राजकारणात शिखर गाठणारा नेता म्हणून त्यांची ओळख आहे. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून गोपीनाथ मुंडेंनी राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. खेडोपाडी जात सर्वांना एकत्र करत भाजपची मोट बांधण्याचे काम प्रमोद महाजन यांच्यासोबत मिळून केले. नंतर रवि कसबे यांनी मुंडे साहेब यांच्या जिवन चरीत्रावर उजाळा दिला यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष बालाजी आलेवार, भाजपा जिल्हा सचिव काशिनाथ शिंदे, देविदास पळसपुरे, सुर्यकांत बोधनकर, भाजपा युवा मोर्चा जिल्हा महामंत्री विकास माहूरकर, जिल्हा सचिव संदीप पाटील, शंकर मुंडे, शेख लतीफ, बालाजी धुरपडे,शिवाजी बोरकर,राज सोळंके,अतूल कोंकेवाड, प्रविण माहूरकर, गजानन कदम,ओम कदम व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# परभणी येथील घटनेच्या निषेधार्थ मुदखेड बंद

## आंबेडकरी अनुयायांच्या वतीने तहसीलदारांना निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १२ डिसेंबर**

परभणी शहरातील भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारका समोरील भारतीय संविधानाची प्रतिकृती असलेल्या पुतळ्याची विटंबना केल्याप्रकरणी दि.१२ डिसेंबर २०२४ मुदखेड शहरातील आंबेडकरी अनुयायांच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला व तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले.

तसेच या घटनेच्या निषेधार्थ मुदखेड शहरातील व्यापाऱ्यांनी बाजारपेठ शंभर टक्के बंद ठेवून या घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला.त्याच प्रमाणे परभणी येथे भारतीय संविधानाची विटंबना करणाऱ्या व षडयंत्र रचणाऱ्या विरुद्ध चौकशी होऊन संबंधिताविरुद्ध तातडीने कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी. मुदखेड शहर व तालुक्यातील तमाम आंबेडकरी जनतेच्या वतीने तीव्र शब्दात जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला या घटनेमुळे आंबेडकरी जनतेमध्ये मोठा रोष निर्माण झालेला असुन तमाम भारतीयांची अस्मिता असलेल्या संविधानाच्या प्रतिकृती पुतळ्याची विटंबना करणाऱ्या इसमास तातडीने अटक करून त्यास कठोर शासन करण्यात यावे व यासाठी षडयंत्र रचनाऱ्याचा देखील शोध घेऊन त्यांच्या विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात यावे असे निवेदनात नमुद करण्यात आले. यावेळी उपस्थित असलेले भेंन्ते गगन बोधी यांच्या सह आंबेडकरी अनुयायी यांची उपस्थिती होती.

# परभणी घटनेच्या निषेधार्थ उमरी शहर कडकडी बंदचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. १२ डिसेंबर**



महाराष्ट्रात राज्यात कधी हिंदू - मुस्लीम तर कधी संविधान घटनेचा अवमान होत असल्याने दंगलग्रस्त लोकांचा जातीय तेड निर्माण होत असल्याने अराज्यता माजत असल्याने सध्या च्या सरकार यांना लोकशाही जपण्यासाठी तिव्र पाऊले उचलण्याची गरज भासली आहे पण त्या परभणीच्या घटनेत भारतीय संविधान प्रतिधात्मक प्रतिचा अवमान केल्या प्रकरणी महाराष्ट्रात तीव्र पडसाद उमटले असुन उमरी शहर ही उदया दि १३ डिसेंबर २०२४ रोजी कडकडीत बंद ठेवण्याचा निर्णय आबेंडकर चळवळी सह विविध सामाजिक संघटेकडून जाहिर अव्हाण करण्यात आले आहे.

परवाच बांग्लादेश मध्ये हिंदू समाजावर आन्याय अत्याचा झाला त्या निषेधार्थ आंदोलन मोर्चा उमरी शहर बंद करण्यात आले. त्यांना ही उमरीकर प्रत्येक सामाजिक , धार्मिक संघटना ही शहर बंद करून भरपूर प्रतिसाद दिला आहे . अशा घटना कुठेही घडू नये पण त्यांना सामाजिक न्याय व्यवस्था व राजकीय नेते ( कार्यकर्ते ) जबाबदार असल्याने त्या सामाजिक तेड करणाऱ्या लोकांना राजकीय वृदहस्त आशीर्वाद असल्याने प्रत्येक समाजात पुर्वीपेक्षा ही जातीय दंगल घडत आहेत आहेत. त्या अनुषंगाने परभणी येथे दि १० डिसेंबर २०२४ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या जवळ पुतळा फोडण्याचा प्रयत्न करून संविधान प्रतिधात्मक कॉफी प्रत घेवुन हे येड्या गबाळ्याचे काम नसून हे षडयंत्र रचून दंगलग्रस्त रचलेला डाव आहे या मागील मास्टर माईन्ट कोण ? या मागील शोध घेवून अरोपी यास देशद्रोहीचा गुन्हा दाखल करून , देशाच्या संविधानाची ( भारतीय घटनेचा ) अवमान केल्या प्रकरणी अरोपी सह त्यांच्या दंगल घडवणाऱ्या मास्टर माईन्डला फाशी देण्याची मागणी करण्याचे उमरी आंबेडकर चळवळी सह इतर सामाजिक संघटना ही आक्रमक होवून उमरी शहर बंद करण्याचे अव्हाण करून व्यापारी , दुकानदार , हॉटेल ,पानपट्टी , इतर लघू उदोग व्यापारी यांनी या संविधान बचाव व भारतीय संविधानाचा अवमान करणाऱ्या मोर्चास सहभाग नोंदवून सहकार्य करावे असे अव्हाण करण्यात आले आहे .

यावेळी उमरी आंबेडकर चळवळीचे नेते गंगाधर सवई , नगर सेवक ईश्वर सवई ,सामाजिक संघटना , डी जी तुपसाखरे , वंचितचे करुणाताई खंडेलोट , माजी नगरसेवक प्र सोनू वाघमारे, राजेश सवई , माजी उपराध्यक्ष अनिल सोनकांबळे , इंजि रोहित देवकसवाड , माहिती अधिकाराध्यक्ष संदिप गोवंदे , भिमअर्मी अविनाश भोसीकर , अरुण भद्रे ,सचिन खंडेलोटे , बॉडी बिल्डर रॉकी देवकसवाड , प्रविण खंडेलोटे , शेख अकबर , स्वराज्अंदोल कार्यकर्ते जेष्ट संतोष वाघमारे , गंगाधर गंगासागरे ' जेष्टनेते आनंदा पवार संदिप लांडगे या सह असंख्य कार्यकत्याचा निवेदनावर सहया असून ते पुर्व सुचना म्हणून १२ डिसेंबर रोजीच उमरी व्यापारी दुकानदार यांना विनंती करीत तहसीलदार उमरी व पोलिस निरीक्षक यांना निवेदन देवून चौक बंदोबस्त ठेवून निषेध मार्चात सहकार्य करावे अशा पोलिस प्रशासनासह उमरी वाशीयांना अव्हान सुचना दिल्या असल्याने उदा दि १३ डिसेंबर रोजी उमरी शहर कडकडीत बंद होणार आहे यांची जनतेनी काळजी घ्यावी अशी विनंती करण्यात आली आहे .

# नळ योजनेच्या कामांची चौकशी करा

## पाईपलाईनसाठी चांगले रस्ते खोदले जलजीवनच्या कामाला गुणवत्ता नाही!

**तभा वृत्तसेवा**
**निवघा,दि. १२ डिसेंबर**

निवघा बाजार मागील दोन वर्षांपासून अत्यंत संथगतीने सुरू असलेल्या जल जिवन मिशनअंतर्गतच्या पाणी पुरवठा योजनेची कामे ठेकेदारांच्या मनमानीपणे व थातूरमातूर पद्धतीने उरकण्यात येत असल्याची गावोगावी ओरड सुरू आहे. दर्जाहीन पद्धतीचे कामे उरकून जनतेच्या माथी मारले जात आहे. पाईपलाईन करण्यासाठी गावागावातील नव्याने बनविलेले रस्ते खोदून रस्त्याची वाट लावली आहे. शिरड येथील जलजीवन मिशनच्या त्या दर्जाहीन कामाची गुणवत्ता तपासून चौकशी करण्याची गरज आहे. संबंधितांनी याकडे वेळीच लक्ष द्यावे, अशी मागणी पुढे आली आहे. शिरड भागात जलजीवन मिशनअंतर्गत चालू असलेली पाणीपुरवठा योजनेची कामे कासव गतीने मागील दोन वर्षांपासून सुरू आहे जलजीवन मिशनचे काम आणि अतिशय निकृष्ट दर्जाचे होत आहेत. अनेक गावात झालेली कामे अर्धवट अवस्थेतच आहेत.

गाव पुढाऱ्यांना हाताशी धरून पाईपलाईनची खोली कोठे इतभर तर कोठे एक फूटापेक्षा जास्त नसल्याची ओरड आहे. गावातील अंतर्गत रस्त्याची चाळणी झाली आहे. मजबुतीकरण व सिमेंट काँक्रीट रस्त्यामुळे गावाची शोभा वाढली होती. परंतु पाणी पुरवठा योजनेमुळे संपूर्ण रस्त्याची वाट लागली आहे. किमान दोन वर्षांपासून चालू असलेल्या जलजिवन मिशनच्च्या पाणी पुरवठा योजनेच्या पाण्याचा अजून थेंब कोणाच्याच घस्यात उतरला नाही. थातूरमातूर कामे उरकून घेतल्याने ही योजना लाईफ टाईम टिकेल, असे दिसत नाही. शासनाची झोळी रिकामी करून गुत्तेदारांची झोळी भरण्याचा सध्या तरी प्रकार चालू आहे. असे असतांनाही शासनाचा एकही अधिकारी किंवा कर्मचारी त्या कामाला भेट देत नाही. यामागचे 'गुढ' कायम असून कोठे तरी पाणी मुरते. दर्जाहीन कामात पुलाखालून बरेच पाणी वाहून जात आहे. अर्थातच गुणनियंत्रण विभागाकडून त्या कामाचा दर्जा तपासून कामाची चौकशी करून ठेकादाराला काळ्या यादीत टाकावे, अशी मागणी पुढे आली आहे.



**उमरी-हिंदू समाजावर बांग्लादेशात होत असलेल्या अन्याय अत्याचार विरुद्ध उमरी शहर बंद करून निषेध मोर्चा तहसील कार्यायाल वळवून येथे तहसीलदार यांना निवेदन देवून शासनास मागण्या कळवावे म्हणून हिंदू संघटनेचा अक्रोश मोर्चा भव्य निघाला आहे . यावेळी शहरातील / तालुक्यातील हिंदू संघटना मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.**

**जाहिर प्रगटन**

नोंदीचा प्रकारःखरेदी-फेरफाराचा दि.५/१२/२४

लिहून देणार:खा.जकियोद्दीन खा.आली रा.भोकर(खाता क्रमांक१४२)यांचे गट/सर्व्हे क्रमांक ५९४लागवडीयोग्य क्षेत्र ०.८९५७हे.आर.चौ.मी.पैकी लागवडीयोग्य क्षेत्र ०.००९७हे.आर.चौ.मी.आणी पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.हे त्यांनी

लिहून घेणारःसय्यद मूजिब सय्यद रज्जाक (खाता क्रमांक९६२०)गट/सर्व्हे क्रमांक५९४ लागवडीयोग्य क्षेत्र ०.००९७ हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.यांना दूय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचे कडील खरेदी दस्त क्रमांक ८८७दि.८/७/२००९ प्रमाणे रक्कम रुपये ४००००घेवून खरेदी दिली.सबब खरेदी घेणाऱ्यांचे नाव गाव नमूना नं.७/१२वर दाखल केले.समंती देणारे खातेदारः अहेमदीबेगम शे.शब्बीर(खाता क्रमांकः०)दस्त क्र.८३दि.२५/१/२००५ प्रमाणे रक्कम रुपये ४००००उक्त फेरफाराच्या नोंदी संबधी तूम्हास सूचना देत आहे व ही सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत नोंदीसंबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी किंवा लेखी पाठविण्यास तूम्हास फर्मावित आहे.तलाठी भोकर यांचेकडे पंधरा दिवसाच्या मूदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे. असे ग्रहित धरले जाईल कृपया याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित/-
तलाठी साझा भोकर
ता.भोकर जी.नांदेड.

**जाहीर प्रगटन**

नोंदीचा प्रकारःखरेदी माहिती मिळालेचा दि.१०/१२/२४ फेरफाराचा दि.११/१२/२४

लिहून देणारःअरुणा ज्ञानोबा मोरे,कूसूम अजित पवार,माधवराव भूजंगराव किन्हाळकर,लता प्रतापराव जाधव,सतीश भूजंगराव किन्हाळकर रा.भोकर(खाता क्र.४७४)यांचे गट/सर्व्हे क्र.४८९ लागवडीयोग्य क्षेत्र०.८३५६हे. आर.चौ.मी.पैकी लागवडीयोग्य क्षेत्र०.०१३९हे.आर.चौ.मी. आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.हे त्यांनी

लिहून घेणारःरामराव दत्तात्रय भिसे(खाता क्र.९६६८) गट/सर्व्हे क्र.४८९लागवडीयोग्य क्षेत्र०.०१३९ हे.आर. चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र०.००००हे.आर.चौ.मी.यांना दूय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्र.१०८४दि.२१/०६/२००२प्रमाणे रक्कम रुयये ६०००० घेवून खरेदी दिली.सबब खरेदी घेणाऱ्यांचे नाव गाव नमूना नं७/१२वर दाखल केले,उक्त फेरफाराच्या नोंदी संबधी तूम्हास सूचना देत आहे व ही सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत उक्त नोंदीसंबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी किंवा लेखी पाठविण्यास फर्मावित आहे.तलाठी भोकर यांचेकडे उक्त पंधरा दिवसाच्या मूदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे.असे ग्रहित धरले जाईल कृपया याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित
तलाठी साझा भोकर
ता.भोकर जी.नांदेड.

**जाहिर प्रगटन**

नोंदीचा प्रकारःखरेदी- फेरफाराचा दि.३/१२/२४

लिहून देणार:शे.खमरु अमिनशाहा रा.भोकर दत्तात्रय धोंडीबा रा.भोकर(खाता क्रमांक ८०१)यांचे गट/ सर्वे क्रमांक २७ लागवडीयोग्य क्षेत्र ०१५०६ हे.आर. चौ.मी. पैकी लागवडी योग्य क्षेत्र ०.०१११हे.आर.चौ.मी. आणि पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौ.मी.हे त्यांनी

लिहून घेणार:उत्तम दिगंबर भडंगे(खाता क्रमांक ९६१२)गट/ सर्वे क्रमांक २७ लागवडी योग्य क्षेत्र ०.०१११ आणी पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर. चौ.मी.यांना दूय्यम निबंधक भोकर यांचेकडील खरेदीदस्त क्रमांक १६०दि.०७/०२/१९९७ प्रमाणे रक्कम रुपये २५००० घेवून खरेदी दिली सबब खरेदी घेणाऱ्याचे नाव गाव नमूना ७/१२ वर दाखल केले.

उक्त फेरफाराच्या नोंदी संबधी तूम्हास सूचना देत आहे व ही सूचना मिळाल्यापासून १५ दिवसाच्या आत उक्त नोंदी संबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी किंवा लेखी पाठविण्यास तूम्हास फर्मावित आहे.ग्राम महसूल अधिकारी भोकर यांच्याकडे उक्त १५ दिवसाच्या मूदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे असे ग्रहित धरले जाईल.कृपया याची नोंद घ्यावी.

स्वाक्षरित
तलाठी साझा भोकर
ता.भोकर जी.नांदेड.

**नगरपरिषद अर्धापूर जि.नांदेड**

**(जाहीर निविदा सुचना क्र.१)**

**जी.क्र. अनप/विद्यूत/४०७३/२०२४ दि. १२/१२/२०२४**

अर्धापूर नगरपरिषद मार्फत अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्र विकास कार्यक्रम २०२३-२०२४ अंतर्गत अर्धापूर येथील कब्रस्थानमध्ये मिनी हायमास पोल बसविणेच्या कामाची निविदा मागविण्यात येत आहेत. करिता इच्छुक अधिकृत विद्युत कंत्राटदारांनी दि.१३/१२/२०२४ ते दि. २०/१२/२०२४ या कालावधी दरम्यान नगरपरिषद कार्यालयातून कोरी निविदा खरेदी करून दि. २०/१२/२०२४ सायं ५.०० वाजेपर्यंत दाखल करून आपला सहभाग नोंदवावा व निविदासंबधीत काही अडचण असल्यास नगरपरिषद कार्यालयामधील विद्युत विभागाशी संपर्क साधावा.

**मुख्याधिकारी,**
**नगरपरिषद अर्धापूर**

# जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टी ने बाधित खरीप पिकांच्या नुकसान भरपाई पोटी ४१२ कोटी रुपये अनुदान

## आ.बबनराव लोणीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

वंचित, पीडित, विस्थापित, कष्टकरी, शेतमजूर, शेतकरी वर्गाला त्यांचे न्याय व हक्क मिळवून देण्याकरिता गेल्या ४० वर्षापासून अविरत संघर्ष करणारे लोकप्रिय लोकप्रतिनिधी म्हणून राज्यभरात ओळख असलेले महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री, परतूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नाला यश आले आहे. जालना जिल्ह्यातील २ लाख ८२ हजार ५३८ शेतकऱ्यांचे खरीप हंगाम २०२४ मध्ये अतिवृष्टी, गारपीट वादळ वारा आणि पुरामुळे २ लाख ५५ हजार ५१९ हेक्टर क्षेत्र बाधित झाले होते. खरीप पिका सह फळबागांच्या नुकसानी पोटी जालना जिल्ह्यातील नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आमदार लोणीकर यांच्या आग्रही मागणी नुसार जालना जिल्ह्यातील अतिवृष्टीने नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांसाठी सुमारे ४१२ कोटी रुपये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी मंजूर केले आहे. या मूळे जालना जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना दिलासा मिळाला आहे. ०१ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या अतिवृष्टीने आलेल्या पुरामुळे, सततधार झालेल्या पावसासह वादळ वारा आणी गारपीटीने मंठा व परतूर तालुक्यातील झालेल्या नुकसानीची पाहणी भरपावसात माजी मंत्री तत्कालीन आमदार बबनराव लोणीकर यांनी पोळा सणाच्या दिवसी गावा गावात जाऊन केली होती. यावेळी अतिवृष्टीने बाधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिले होते. याबाबतीत माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी तहसील कार्यालय मंठा व तहसील कार्यालय परतूर येथे आढावा बैठक घेऊन मंठा परतूर व जालना तालुक्यातील गावा गावातील नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांची व पडझड झालेल्या नुकसानग्रस्त घरांची तातडीने पंचनामा करून जिल्हाधिकारी कार्यालयास अहवाल पाठविण्याच्या सूचना दिल्या होत्या. यानंतर तातडीने लगेचच आमदार लोणीकर यांनी जिल्हाधिकारी जालना यांच्या दालनात आढावा बैठक घेऊन जालना जिल्ह्यातील अतिवृष्टीने बाधित खरीप हंगामातील पिका सह फळबागा च्या नुकसानीची पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अर्थसाह्य उपलब्ध करून देण्यात करिता तातडीने विभागीय आयुक्त यांच्याकडे अहवाल पाठविण्याच्या सूचना दिल्या होत्या. माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे जून ते ऑक्टोबर, २०२४ या महिन्यात अतिवृष्टी/पूर यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी विभागीय आयुक्त यांचेकडून निधी मागणीचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले होते. या अनुषंगाने तातडीने उद्दढ पोर्टलव्दारे शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात निधी वितरीत करण्यात यावा. सदरील अनुदान निधीतून कुठल्याही प्रकारच्या कर्जाची वसुली करण्यात येऊ नये असे आदेश शासन निर्णयान्वये पारित झाले आहे. सदरील अनुदान प्रति शेतकरी तीन हेक्टर पर्यंत मर्यादित असल्याची देखील शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले असल्यामुळे जालना जिल्ह्यातील शेतकरी बांधवांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले असून गावागावातील शेतकरी बांधव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणी आमदार बबनराव लोणीकर यांच्यासह महायुती सरकारचे आभार मानत आहेत.

## संक्षिप्त

### राष्ट्रीय क्रीडा सप्ताहाचे जीवनराव पारे विद्यालयात उदघाटन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत कार्यरत जालना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्यावतीने क्रीडा सप्ताहाच्या कार्यक्रमांचे उद्घाटन गुरुवार दि.१२ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १० वाजता चंदनझिरा येथील जीवनराव पारे विद्यालयात मान्यवरांच्या हस्ते हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करुन झाले.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे व प्रा. हेमंत वर्मा, क्रीडा अधिकारी आरती चिल्लारे, रेखा परदेशी उपस्थित होते. यावेळी क्रीडा मार्गदर्शक सिद्धार्थ कदम, आशिष जोगदंड, सुभाष पारे, माधव भद्रे आदींचा पुष्पगुच्छ व सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी क्रीडा सप्ताह साजरा करण्यामागील शासनाचा उद्देश स्पष्ट केला. विद्यार्थ्यांनी खेळाच्या प्रशिक्षणासाठी जिल्हा क्रीडा संकुलाच्या प्रशिक्षण केंद्रावर जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे. नवीन पिढीने मोबाईलच्या गेममध्ये न खेळता मैदानी खेळ खेळावेत असा सुरही उमटला. हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांच्या कार्यावर प्रेरणादायी व्याख्यान प्रा. हेमंत वर्मा यांनी दिले. शाळेचे मुख्याध्यापक सुभाष पारे, माधव भद्रे, हरिचंद ढगे, अमरसिंह पावरा, राहूल गायके आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय खांडीभराड यांनी केले. तसेच शाळेतील विद्यार्थीनी कोमल सोनवणे, दुर्गा धोत्रे यांनी मनोगत व्यक्त केले. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.


### सैन्य दलातील अधिकारी पदाच्या पुर्व प्रशिक्षणाची संधी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

भारतीय सैन्यदल, नौदल आणि वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्विस सिलेक्शन बोर्ड या परीक्षेची मोफत पुर्व तयारी करुन घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक येथे महाराष्ट्र शासनाकडून एसएसबी कोर्स क्र. ६० आयोजित करण्यात येणार आहे. तरी जालना जिल्ह्यातील इच्छूक युवक-युवतींनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जालना येथे गुरुवार दि. २६ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत मुलाखतीस हजर रहावे. संपुर्ण प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थ्यांना नि:शुल्क प्रशिक्षण, निवास व भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे. अधिक माहितीसाठी दुरध्वनी क्र. ०२५३-२४५१०३२ किंवा व्हॉट्सअप क्र. ९१५६०७३३०६ वर संपर्क करावा, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### संबंधीत आरोपी विरूध्द देशद्रोहाचा गुन्हा नोंदवा- सुभाष दांडेकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



परभणी शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याशेजारील भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीचा अवमान व संविधान विरोधी घोषणाबाजी या कृतीचा जाहीर निषेध करत संबंधीत आरोपीविरूध्द देशद्रोहाचा गुन्हा नोंदवावा अशी मागणी भीम आर्मीचे जिल्हाप्रमुख सुभाष दांडेकर यांनी केली आहे. परभणी शहरात मंगळवार १० डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालय ते बस स्टँड रोड येथील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे. त्या ठिकाणी असलेल्या भारतीय संविधानाच्या संदेशक प्रतिकृतीची एका समाज कंटकाने विटबंना केली. सदर घटनेचा जालना शहरात भीम आर्मीच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला. भारतीय संविधानाच्या ७५ व्या अमृत महोत्सवाच्या सुरुवातीस अशा पद्धतीने विकृत व अवमानकारक कृत्य होत असेल तर आपण स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात खर्या स्वातंत्र्यात आहोत काय? हा खरा प्रश्न उभा राहतो. असे दांडेकर म्हणाले. सदर घडलेल्या घटनेची मुळ पार्श्वभूमी तपासून सक्षम यंत्रणे कडून चौकशी होऊन दोषींवर कठोरात कठोर कारवाई करावी अशा आशयाची मागणी करण्यात आली.यावेळी भीम आर्मीचे ॲड. सुभाष सरोदे, वामन दादा दांडगे, एम. यु. पठाण, शांतीलाल दाभाडे, आसाराम पगारे, विठ्ठल कासारे, अंबादास शेजुळ, राजु आढाव यांच्यासह भीम आर्मीचे पदाधिकारी, उपस्थित होते.

## संविधान प्रतिकृतीची विटंबना करणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करा

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**



परभणी येथे नुकतेच महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेसमोरील संविधानाच्या प्रतिकृतीची एका मनुवादी विचारसरणीच्या समाजकंटकाने विटंबना केली आहे. त्याच्यासह त्याच्या पाठीशी असलेल्या मास्टरमाईन्डचा तात्काळ शोध घेऊन त्याच्यावर कार्यवाही करावी तसेच प्रतिकृतीची विटंबना झाल्यानंतर घटनेचा निषेध करणाऱ्या भीमसैनिकांवर जो पोलीस बळाचा वापर करून कोम्बिंग ऑपरेशन करण्यात येऊन अटकसत्र सुरु आहे ते त्वरित थांबविण्यात यावे अशा मागणीचे निवेदन वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष विशाल मिसाळ यांच्या नेतृत्वाखाली भोकरदन उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना दिले आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,परभणी येथे एका माथेफिरू मनुवादी समाज कंटकाने नुकतेच महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेसमोरील संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना केली आहे, सदरील व्यक्ती व त्याच्या पाठीशी असणाऱ्याचा शोध घेऊन त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करावी. तसेच घटनेनंतर शांततेत सुरु असलेल्या बंदला परभणी येथील स्थानिक प्रशासनाने हिंसक वळण लावत दलित वस्तीतील तरुण तसेच वयोवृद्ध नागरिकांना कोम्बिंग ऑपरेशन अंतर्गत धरपकड करत आहेत.ते त्वरित थांबवावे व अटक केलेल्यांची तात्काळ सुटका करावी अशी मागणीही शेवटी निवेदनात केली आहे.

निवेदनावर वंचितचे तालुका महासचिव मंगेश पगारे,उपाध्यक्ष विजय सावंत यांच्यासह राजपाल पारखे,नितीन जोगदंडे,सुरेश बनकर,सचिन पारखे, कमलकिशोर जोगदंडे,विजय पगारे,नितीन म्हस्के,अमोल साळवे,ज्ञानेश्वर शेजूळ,रोहित घोरपडे, पप्पू गायकवाड, अक्षय गायकवाड, राहुल रगडे, सुमित जाधव, अमोल पगारे, आशिष साळवे, स्वप्नील दाभाडे आदींची नावे आहेत.

## लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**तळणी/प्रतिनिधी**



तळणी मंठा तालुक्यातील तळणी येथे लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची ७५ वी जयंती साजरी करण्यात आली होती यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजपा तालुका अध्यक्ष सतीश राव निर्वळ तळणी गावचे सरपंच गौतम सदावर्ते उपसरपंच विश्वनाथ दादा चंदेल माजी पंचायत समिती सदस्य दत्तराव कांगने मंठा ग्रामीण बँकचे संचालक अध्यक्ष नितीन भैया सरकटे राष्ट्रवादी कॉंग्रेस युवक जिल्हा जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली सरकटे शिवसेना उपतालुकाप्रमुख ज्ञानेश्वर माऊली सरकटे शिवसेना युवा तालुका उपप्रमुख आवेश पठाण तंटामुक्ती अध्यक्ष रितेश भैया चंदेल गणेश राव कापकर दत्तराव लाड इतर मान्यवर उपस्थित होते लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलित करून अभिवादन करण्यात आले व आले यावेळी नितीन सरकटे यांनी मुंडे साहेबांच्या जीवनपटावर मनोगत व्यक्त केले मुंढे साहेबांनी भारतीय जनता पार्टीला खेड्यापाड्यात पोहाचण्याचे कार्य केले त्याच लावलेल्या रोपांचा आज वटवृक्ष झाला आहे. कठीण काळात पक्षाचे विचार हे शेवटच्या माणसान र्यन्त पोहणचवण्या साठी अथक परी श्रम केले त्यांच्या कडे असलेले सघंटन कौशल्य व वक्तृत्व या गुणामुळे त्याची मोठी ओळख होती अनेक कार्यकर्त्याना कठीण परिस्थीतीत साथ देणारे मुढे साहेब यानी आज अनेक कार्यकर्त्याची फौज निर्माण केल्याचे यावेळी नितीन सरकटे यांनी प्रतिपादीत केले यावेळी आयोजकांनी मान्यवराचे आभार मानले तळणी बस स्टॅन्ड परिसरात आज यां जयंती निमित्य मुंढे साहेबांची प्रतिमा ठेवल्याने अनेकांना यावेळी त्यांना अभिवादनं करता आले यशस्वीरीत्या कार्यक्रम पार पाडण्यासाठी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी प्रतिष्ठान तळणी यांच्या वतीने आयोजन करण्यात आले होते यावेळी केशवराव येऊल महादेव खुळे महादेव भारस्कर सुभाषराव लाड राम येऊल कैलास येऊल विलास मुळे सुरेश खुळे भागवत वराडे अक्षय लाड किशोर मुर्तडकर विष्णू भारस्कर सुनील लाड पंढरीनाथ कोरकणे चंद्रकांत लाड गजानन कुडकन सर्व समाज बांधव व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते

## शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी विनोद उत्तम लोखंडे तर उपाध्यक्षपदी विजय शंकर भोरकडे

**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पारद बुद्रुक येथील शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी विनोद उत्तम लोखंडे तर उपाध्यक्षपदी विजय शंकर भोरकडेयांची निवड करण्यात आली.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पारध बुद्रुक येथे शाळा व्यवस्थापन समिती निवड करण्यासाठी पालक सभा घेण्यात आली .यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष संदीप पांडुरंग क्षीरसागर उपाध्यक्ष गजानन लोखंडे ,सदस्य संदीप देशमुख , अशोक सुरडकर यांच्या उपस्थितीत सभा घेण्यात आली. सदर सभेत वर्गनिहाय व जातनिहाय आरक्षण जाहीर करण्यात आले व समिती पुढील प्रमाणे गठित करण्यात आली यामध्ये अध्यक्ष विनोद उत्तम लोखंडे ,उपाध्यक्ष विजय शंकर भोरकडे,तर सदस्यपदी सौ अर्चना योगेश अल्हाट, विश्वासराव शामराव लोखंडे जीवन बाबुराव सुरडकर, सुमनबाई गौतम बोर्डे ,तुळशीराम यमुनाजी भोरकडे, श्रद्धा कुलदीप मोकाशे , रेखा विठ्ठल लोखंडे,यांची निवड करण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री डी एस गावंडे यांनी केले तर प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री सोनुणेसर यांनी केले .यावेळी नवनियुक्तअध्यक्षांनी शाळेची गुणवत्ता सुधारणार व भौतिक सुविधा मिळवण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे जाहीर केले यावेळी सर्व पालक शिक्षक उपस्थित होते कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री सुधाकर सावळे यांनी केले . या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाचे नेते परमेश्वर पाटील लोखंडे, गणेश शिवराम लोखंडे, पंचायत समिती सदस्य गणेश लोखंडे, शिवा पाटील लोखंडे, पारध येतील युवकांनी शालेय व्यवस्थापन समिती ला सुरंग लावला यामधी अमोल जहगीरदार, सागर देशमुख,चेतन, पवन लोखंडे, सुरेश आल्हाट, दिपक श्रीसागार, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती कुटुंबरे मॅडम जाधव मॅडम तडवी मॅडम ,अल्हाट सर ,लक्कस सर ,इवरकर सर यांनी परिश्रम घेतले.

## लोकनेते माजी केंद्रीय मंत्री स्व.गोपीनाथ मुंडे साहेब यांना जयंती निमित्त अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी जिल्हा जालना कार्यालयात लोकनेते संघर्षयात्री माजी केंद्रीय मंत्री स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेबांना जयंती निमित्त आज (दि.१२) रोजी विनम्र अभिवादन करण्यात आले होते.

यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, महानगर जिल्हाध्यक्ष सतीष जाधव, प्रदेश सदस्य विजय कामड, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सोपान पेंढारकर, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, प्रसिद्धीप्रमुख बाबासाहेब कोलते, नगरसेवक ज्ञानेश्वर ढोबळे, शशीकांत घुगे, सुनील पवार, मंडळ प्रभारी अमोल कारंजेकर, मंडळाध्यक्ष सुभाष सले, आनंद झारकंडे, रामलाल जाधव, मंडळ प्रभारी प्रमोद गंडाळ, महानगर उपाध्यक्ष सुहास मुंडे, अल्पसंख्याक मोर्चा महानगराध्यक्ष सय्यद इम्रान अली, ओबीसी मोर्चा महानगराध्यक्ष डोंगरसिंग साबळे, विकास कदम, कामगार आघाडी संयोजक माणिक फड, सदस्य जगदीश येणगुपटला, उमेश पेंढारकर, राजाराम जाधव, गणेश वाघमारे, महेश मुळे, सुदर्शन काळे, रोहित नलावडे, संजय माधवाले, अकबर परसूवाले, अनिल यशवंते, निलेश गवळी, शाम उगले यांच्यासह (स्वीय सहायक गोवर्धन कोल्हे, राजेश जोशी) व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## जालना तालुक्यातील पाष्टा येथे लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे राहुल लोणीकरांच्या हस्ते अनावरण

# लोणीकर परिवारासह अनेकांना लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांचा राजकीय वारसा -राहुल लोणीकर यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या रूपाने संपूर्ण महाराष्ट्राला कणखर आणि भारतीय जनता पक्षाला नवसंजीवनी देणारा नेता लाभला होता मुंडे साहेबांच्या विचाराने व मुंडे साहेबांच्या कार्य कुशल देणे राज्यभरात भारतीय जनता पक्ष वाढीस लागला आज भारतीय जनता पक्षाला मिळालेले चांगले दिवस ही स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांची कृपा आहे आमच्या लोणीकर परिवारासह अनेकांना लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांचा राजकीय वारसा लाभलेला असून मुंडे साहेबांमुळेच आम्ही आज राजकीय क्षेत्रात स्वतःचं नाव कमवू शकलो असे प्रतिपादन भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांनी आज केले

जालना तालुक्यातील पाष्टा येथे मुंडे साहेबांच्या जयंती निमित्त लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे यांच्या पूर्णकृती पुतळ्याचे अनावरण भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव श्री राहुल लोणीकर यांच्या हस्ते आज करण्यात आले यांप्रसंगी श्री लोणीकर बोलत होते पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, आजची भारतीय जनता पार्टी स्वर्गीय लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या तालमीत तयार झालेली असून वाण्याबाबदाचा पक्ष म्हणून हिणवणाऱ्या लोकांना स्वर्गीय मुंडे साहेबांनी भारतीय जनता पक्ष हा सर्वसामान्य माणसांचा पक्ष असल्याचे सिद्ध करून दाखवले अनेक लोक स्वर्गीय मुंडे साहेब आणि त्यांचा वारसा जपणाऱ्या संघर्ष कन्या पंकजाताई मुंडे यांच्या बद्दल काही लोक वेगळी प्रेम दाखवून समाजाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात एकीकडे स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब आणि पंकजाताई मुंडे यांनी चालवलेला वसा आणि वारसा असणाऱ्या भारतीय जनता पक्षाच्या विरोधात भूमिका घेणारे लोक मुंडे साहेबांचे आम्ही एकच होऊ शकत नाहीत अशा लोकांनी लोणीकर कुटुंबाच मुंडे कुटुंबीयांसंदर्भातील प्रेम किती आहे याची पावती देण्याची गरज नाही असेही मुंडे कुटुंबीयांवर वेगळी प्रेम दाखवणाऱ्या लोकांना राहुल लोणीकर यांनी ठणकावून सांगितले. यावेळी युवा मोर्चाचे जालना जिल्हा सरचिटणीस विकास पालवे भाजपा महिला आघाडीच्या प्रदेश सचिव जिजाबाई जाधव भाजपा किसान मोर्चाचे जालना जिल्हा अध्यक्ष माऊली शेजुळ पंचायत समिती सदस्य दत्तराव कांगणे भाजपा ओबीसी मोर्चा मंठा तालुकाध्यक्ष रामकिसन बोडके व विक्रम उफाड दिलीप जोशी गणेश मोरे दिलीप पवार आसाराम खरात रामेश्वर काकडे प्रकाश महाराज इलग विनोद राठोड अरुण सदावर्ते सरपंच स्वरूप सानप प्रभाकर गाढवे गजानन महाजन जयंत किनगावकर नंदकुमार घोडे कृष्णा केंद्रे संतोष काळे ज्ञानेश्वर घुगे विजय मुंडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती

## पक्षाघात आणि मेंदू रक्त वाहिनी विकार अत्याधुनिक उपचारावर - राष्ट्रीय परिषदेतून होणार जागृती

छ. संभाजीनगर

पक्षाघात , मेंदू आणि रक्त वाहिनी संबंधित विकारांचे निदान, उपचार किंवा व्यवस्थापनासाठी केलेल्या लहानातील लहान ते अत्याधुनिक वैद्यकीय उपाययोजना यासंदर्भातील ज्ञान निवासी डॉक्टर ते याविषयातील तज्ञ डॉक्टरांपर्यंत पोचवण्यासाठी, या ज्ञानाचा उपयोग सर्वसामान्य रुग्णांना व्हावा यासाठी पक्षाघात आणि मेंदू विकार उपचारावर विषयावर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती संयोजन समितीचे सचिव डॉ. शिवाजी पोले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मागील वर्षी मराठवाडा एन्डोव्हॅस्क्युलर समिट (चरीरींहुरवर एपर्वेरीलींश्री डींाळीं २०२३ (चएड ९ींं ) आणि इंडियन सोसायटी ऑफ व्हेस्क्युलर अँड इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजि (खडतखठ २०२४) छ. संभाजीनगर (आयएसव्हीईआर) च्या वतीने रक्तवाहिन्यांच्या आजारांवरील आधुनिक उपचार पद्धतींवर परिषद घेण्यात आली होती. या परिषदेला मोठा प्रतिसाद मिळाला. याचाच पुढचा टप्पा म्हणजे येत्या १४ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित केलेली स्ट्रोक अँड न्युरो इंटरव्हेंशन २.० अर्थात पक्षाघात आणि मेंदू विकार उपचार या विषयावर परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. एमजीएम मेडिकल कॉलेजचा इंटर्वव्हेन्शल रेडिओलॉजी विभाग, असोसिएशन ऑफ न्युरोलॉजी, न्यूरोसर्जरी तसेच फिजिशियन असोसिएशन, बालरोगतज्ञ संघटना यांच्या संयुक्तविद्यमाने या परिषदेचे आयोजन करण्यात



आले आहे. आयएसव्हीईआर ने परिषदेला अनुमोदन दिले आहे.

तंत्रज्ञानाच्या मदतीने सर्वोत्तम उपचार हे ब्रीद घेऊन आयोजित करण्यात आलेल्या परिषदेत वेगवेगळ्या वैद्यकीय शाखेतील ज्ञान, कौशल्ये किंवा तज्ञ एकत्र येऊन पक्षाघात आणि मेंदू विकारावरील तत्काळ आणि आधुनिक उपचार या उद्दिष्टासाठी एकत्र येत आहेत असे डॉ. शिवाजी पोले म्हणाले. राज्यस्तरावरील तज्ञ डॉक्टर परिषदेत मार्गदर्शन करणार आहेत. इंटरव्हेंशनल न्युरोरॅडिओलॉजी किंवा एंडोव्हॅस्कुलर न्यूरोसर्जरी या नव्या वैद्यकीय शाखेला ज्यांनी पूर्णतः स्वताला समर्पित केले आहे असे ज्येष्ठ न्यूरोसर्जन डॉ. अनिल कारापूरकर,मुंबई , यांचे मेंदूच्या रक्तवाहिन्याचे आजार आणि त्यावरील आधुनिक उपचार यावर मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी लहान मुलांमधील मेंदू विकार आणि पक्षाघात यावर विशेष चर्चासत्र होणार आहे. मुंबईच्या केईम हॉस्पिटलमधील तज्ञ डॉ. रश्मी सराफ याविषयावर मार्गदर्शन करणार आहेत. यांच्यासह डॉ. शिवाजी पोले, डॉ. दहिफळे, डॉ. राहुल चौधरी, डॉ. आनंद सोनी डॉ. कांजाळकर, डॉ. इस्तीयाक सिद्धिकी, डॉ. वरगंटीवार, डॉ. प्रफुल्ल पानसे मार्गदर्शन करणार आहेत. महात्मा गांधी विद्यापीठाचे कुलपती डॉ. अंकुशराव कदम, एमजीएम ट्रस्टचे उपाध्यक्ष डॉ .पी.एम. जाधव, डॉ. शिवाजी सुक्रे, डॉ. राजेंद्र बोरा, डॉ. प्रवीण सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत सकाळी अकरा वाजता एमजीएमच्या द्योतन सभागृहात परिषदेचे उद्घाटन होणार आहे. परिषदेसाठी संयोजन समितीचे सचिव डॉ. शिवाजी पोले यांच्यासह सर्वच सदस्य प्रयत्न करत आहेत.

कार्यशाळा, शोधनिबंध आणि पोस्टर प्रदर्शन

परिषदेचा उद्देश वैद्यकीय शाखेच्या विद्यार्थ्यापासून ते विविध शाखेच्या तज्ञ डॉक्टरांना एका व्यासपीठावर आणणे असल्याने प्रत्येकासाठी काहीना काही देण्याचा प्रयत्न आहे. कार्यशाळेच्या माध्यमातून निवासी डॉक्टरसाठी एंडोव्हॅस्कुलर क्षेत्रातील प्राथमिक ज्ञान आणि साधने यावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. त्याबरोबरच ३० केसेसच्या माध्यमातून प्रत्यक्ष उपचारासबंधित मार्गदर्शन तसेच पोस्टर प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. संशोधन , शिक्षण आणि वैद्यकीय सेवा ही तीन उद्दिष्ट्ये या परिषदेचे आहेत असे डॉ. पोले यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. पत्रकार परिषदेला डॉ. शिवाजी पोले , डॉ. आनंद सोनी , डॉ. राहुल चौधरी, डॉ. इस्तियाक शेख, डॉ. राघवन यांची उपस्थिती होती.

## 'सूर मिले, गम भुले' मैफलीने जिंकली रसिकांची मने

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : शहरातील प्रसिद्ध सुगम गायक प्रसाद साडेकर यांच्या 'सूर दरबार' वाद्यवृंदाने १ डिसेंबर २०२४ रोजी तब्बल ३८ वर्षे पूर्ण केली आहेत. त्यानिमित्त ६१५ वी 'सूर मिले, गम भुले' मैफिल संत एकनाथ रंग मंदिरात रात्री ८ वा. आयोजित करण्यात आली होती. दर्दी रसिकांनाही आगळीवेगळी सांगीतिक मैफल विलक्षण सुखावून गेली. जुन्या विविध रागांवरील गाण्यांच्या सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध झाले. आजकाल मानसिक ताण-तणाव, मधुमेह, हृदयविकार, उच्च रक्तदाब, अस्थमा इत्यादी व्याधींनी घराघरात शिरकाव केला आहे. संगीतोपचाराद्वारे (डॉक्टरांचे औषध घेऊनच) काही अंशी नियंत्रण मिळविता येवू शकते. या संकल्पनेतून ही मैफल आयोजित केली होती.

प्रारंभी अंजली साडेकर, दत्ताभाऊ गावंडे, रवींद्र मोदी, डॉ. राजेंद्र सिंग परदेशी, राजेंद्र सिंग बग्गा, प्रसाद साडेकर, पंकजा अग्रवाल त्यांच्या मातोश्री विशाल अग्रवाल यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून मैफलला प्रारंभ झाला.

कार्यक्रमाची सुरुवात 'भूप' रागातील बंदिशीने झाली. युगंधराने ती सादर केली. त्यानंतर त्यावर आधारलेले चित्रपटगीत अश्विनी जोशी यांनी सादर केले. भूप राग श्रवणाचे फायदे दमा, अस्थमा या व्याधी कशा काहीअंशी नियंत्रित येऊ शकतील हे साडेकर यांनी सांगितले. श्रीकांत उमरीकर यांनी मैफलचे निवेदन केले.

'सूरदरबार' चे निर्माते आणि गायक प्रसाद साडेकर यांनी सादर केलेले 'मधुबन में राधिका नाचे रे' हे राग हमीरवर आधारित गीत रसिकांची दाद घेऊन गेले. कविता वतनी यांनी गायलेले 'रैना बीती जाये, श्याम ना आए', डॉ. अभिषेक परळीकर यांनी गायलेले 'खोया खोया चांद खुला आसमान', गणेश देशपांडे यांनी गायलेले 'तेरे मेरे बीच मे,कैसा है ये बंधन अंजना', पंकज अग्रवाल यांनी गायलेले 'रिमझिम गिरे सावन', राजेंद्रसिंग बग्गा यांनी गायलेले 'पुकारता चला हू मैं' आणि युगंधराने गायलेल्या बंदीशी दाद घेऊन गेल्या.

## थंडीची तीव्र लाट येणार, पारा घसरणार

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

तीन-चार दिवसांपासून थंडीचा कडाका वाढला आहे. येत्या दिवसांत यात आणखी तीव्र वाढ होण्याची शक्यता हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे.

फेंगलचा प्रभाव आता पूर्णपणे निवळला आहे. यामुळे आता हिवाळा आपल्या पूर्वपदावर आला आहे. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात असलेला पारा आता घसरणीकडे लागला आहे. सोमवार, ०९ रोजी किमान तापमानात साडेचार अंशाने घट झाली होती तर मंगळवार, १० रोजी यात आणखी घट होऊन पारा १२. २, तर बुधवारी, ११ रोजी १२.४ अंशावर आला. येणाऱ्या दिवसांत यात आणखी घट होऊन तीव्र लाटेचा इशारा हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी दिला आहे. मंगळवार, १० रोजी कमाल २७. ५, तर किमान १२. २ अंश तापमानाची नोंद चिकलठाणा वेधशाळेने घेतली आहे. बुधवारी, ११ रोजी कमाल २९.४, तर किमान १२.४ अंश सेल्सिअस एवढे होते.

फेंगलचा प्रभाव संपुष्टात आला आहे. तरीही दक्षिणेत अजूनही अनेक क्षेत्र प्रभावित आहेत. त्यामुळे तामिळनाडूमधील तिरुपती मंदिर परिसरात १३-१४ आणि १७-१८ डिसेंबर रोजी पाऊस पडण्याची शक्यता आहे. मात्र महाराष्ट्रात कुठेही पावसाची शक्यता नसून यापुढे तीव्र थंडीची लाट येणार आहे. पूर्व आणि पश्चिम विदर्भ, दक्षिण आणि उत्तर महाराष्ट्र, कोकणपट्टी, खान्देशसहित राज्यातील बहुतांश ठिकाणी पुढील १० ते १२ दिवस थंडीची तीव्र लाट येणार आहे. राज्यात सर्वाधिक थंडी उत्तर महाराष्ट्रात राहणार असून, यानंतर विदर्भातील घाटाच्या खाली अधिक थंडी राहणार आहे. यासोबतच मराठवाड्यातही तीव्र थंडीची लाट येईल तसेच ढगाळ वातावरण राहणार असल्याची माहिती डख यांनी दिली आहे.

शेतकऱ्यांनी काढणीला आलेला कांदा काढून घ्यावा, द्राक्ष उत्पादकांनी थंडीपासून द्राक्ष बचावासाठी प्रयत्न करावे लागणार असलयाचे डख यांनी म्हटले आहे.

## कपाशी पिकामध्ये एकात्मिक पीक पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे : डॉ. सूर्यकांत पवार यांचा सल्ला

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : कापूस हे महत्त्वाचे पीक असून, कापसाची उत्पादकता वाढविण्यासाठी एकात्मिक पीक पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक असल्याचे मत राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्पाचे (एनएआरपी) प्रमुख डॉ. सूर्यकांत पवार यांनी हातमाळी येथे बुधवारी, ११ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित कापूस प्रक्षेत्र दिवस आणि 'माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी' या कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

कृषी विज्ञान केंद्र, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर व केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये विशेष कापूस प्रकल्प राबवला जात आहे. या प्रकल्पाअंतर्गत मौजे हातमाळी (ता. जि. छत्रपती संभाजीनगर) येथे ११ डिसेंबर रोजी कापूस प्रक्षेत्र दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी छत्रपती संभाजीनगरचे तालुका कृषी अधिकारी श्याम गुळवे, मंडळ कृषी अधिकारी राठोड, केव्हीकेच्या कार्यक्रम समन्वयक इंजि. गीता यादव, विषय विशेषज्ञ तथा विशेष कापूस प्रकल्पाचे सहप्रकल्प अधिकारी डॉ. बस्वराज पिसुरे, डॉ. संजूला भावर तसेच कापूस तांत्रिक तज्ज्ञ सतीश कदम, जयदेव सिंगल तसेच गावचे सरपंच हिरालाल लक्ष्मण भगुरे, उपसरपंच सोमीनाथ घायट, श्रीमती प्रभावतीताई पडूळ यांच्यासह गावातील शेतकरी व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

उत्पादन वाढीसाठी...

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. पवार म्हणाले की, कापूस पिकाची उत्पादकता वाढवण्यासाठी उत्पादन खर्च देखील कमी करण्याची गरज आहे. यासाठी एकात्मिक अन्नद्रव्य, कीड-रोग आणि लागवड पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. कापूस पिकामध्ये फवारणी व खतांवर अमाप खर्च केला जात आहे. त्यामुळे उत्पादन खर्च कमी करण्याची गरज आहे आणि यासाठी एकात्मिक पीक पद्धतीचा अवलंब शेतकऱ्यांनी करावा. दादा लाड कापूस लागवड तंत्रज्ञानामध्ये योग्य वाणाची निवड, बेडवर लागवड, योग्य अंतर आणि संतुलित व गरज लागेल तेंव्हाच खतांचा वापर करणे या बाबी शेतकऱ्यांनी लक्षात घेतल्या पाहिजेत. गळ फांदी काढणे व शेंडा खुडणे ही महत्त्वाची कामे आहेत. तसेच कापसाची लागवड ही ९० बाय ३० सेंटिमीटर या अंतरावर करावी. या पद्धतीने झाडांची एकरी संख्या वाढून उत्पन्न वाढते. तसेच सर्व शेतकऱ्यांनी बेडचा व ठिबक सिंचन पद्धतीचा वापर प्रभावीपणे करणे गरजेचे आहे. अन्नद्रव्य, कीड व रोग व्यवस्थापनासाठी एकात्मिक एकात्मिक व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करावा. ज्यामध्ये निळे व पिवळे चिकट सापळे लावणे, कामगंध सापळे लावणे, निंबोळी अर्काचा नियमितपणे वापर करणे, जैविक बुरशीनाशकांचा वापर करणे इत्यादी पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे.

कुट्टी जमिनीत कुजवा

डॉ. पिसुरे यांनी विशेष कापूस प्रकल्पाबद्दल सविस्तर माहिती दिली तसेच शेतकऱ्यांनी कापसाची फरदड न घेता कापसाच्या पऱ्हाटीची कुट्टी करून ती जमिनीमध्ये कुजवावी. जेणेकरून जमिनीला मोठ्या प्रमाणामध्ये सेंद्रिय खत उपलब्ध होते व जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते. तसेच जमिनीचा सेंद्रिय कर्ब देखील वाढतो. कापूस पिकामध्ये कापूस लागवडीसाठी विविध लागवड तंत्रज्ञानाचा अवलंब व त्याचा शेतकऱ्यांचा अनुभव यासाठी सदर प्रकल्प छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात राबवण्यात येत आहे. बरेच शेतकरी या तंत्रज्ञानाचा अवलंब करीत आहेत. या तंत्रज्ञानाच्या तांत्रिक बाबींवर सविस्तर चर्चा आणि मार्गदर्शन करण्यासाठी कृषी विज्ञान केंद्राद्वारे जिल्ह्यांत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी इंजि. यादव यांनी कृषी प्रक्रिया उद्योग तर डॉ. भावर यांनी फळबाग लागवड तंत्रज्ञान याबद्दल सविस्तर माहिती दिली. यानंतर शेतकऱ्यांच्या शेतावर प्रक्षेत्र भेटी देऊन मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन व आभार प्रदर्शन सतीश कदम यांनी केले होते.

## सोयगाव येथे जागतिक एड्स दिवस बाबत संवेदिकरन व जनजागृति मार्गदर्शन संपन्न



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१२ डिसेंबर : ग्रामीण रुग्णालय सोयगाव व कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सोयगाव व जिल्हा छत्रपती सभाजीनगर च्या जिल्हा एड्स नियंत्रण विभागाच्या जिल्हा कार्यक्रम अधिकारी साधना गंगावणे,जिल्हा पर्यवेक्षक संजय पवार, वैद्यकीय अधिक्षक डॉ.दिनाजी खंदारे यांच्या मार्गदर्शनाखाली सोयगाव शहरातील छत्रपती श्री शिवाजी महाराज स्मारक समिती भोकरदन संचालित कला,विज्ञान व वाणिज्य निवासी महाविद्यालय जागतिक एड्स दिवस बाबत संवेदिकरन व जनजागृति व मार्गदर्शन कार्यक्रम महाविद्यालयात घेण्यात आला.याप्रसंगी सुनील वानखेडे समुपदेश यांनी एच.आय. व्ही.एडस या आजरा संदर्भात मुलांना माहिती दिली व सरकारी दवाखान्यात आय.सी.टी. सी.विभागात मोफत एच.आय.व्ही.तपासणी केल्या जाते व या आजरा संदर्भात मोफत सल्ला दिला जातो.असे सांगितले या कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या प्राचार्य अनुराधा विनोद पवार,विजय देसाई,स्वप्नील पाटील,आशिष पाटील,ऋषिकेश निकम,गणेश वामने,प्राध्यापक अमोल आगे,प्राध्यापक राजेंद्र रोकडे व ग्रामीण रुग्णालयाचे अतुल मुळे,गणेश भोटकर,भूषण चव्हाण हे उपस्थित होते.यांनी मोलाचे सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी रित्या घडून मदत केली.

## पालोद शिवारात अवैध रित्या वाळू उपसा करणारा ट्रॅक्टर शेतकऱ्यांनी दिला पकडून

### मिली भगत मुळे कोणतीही कारवाई न करता ट्रॅक्टर दिला सोडुन!

सिल्लोड /प्रतिनिधी

तालुक्यात महसूल व पोलीस प्रशासन यांच्या आशीर्वादाने सर्रासपणे अवैध रित्या वाळू उपसा सुरू असुन अशा व्यवसाय मुळे वाळू माफिया आणि प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी मात्र चांगले गब्बर होत आहे.

एखादे ट्रॅक्टर शेतकऱ्यांनी पकडून दिले तरी ते कोणत्याही प्रकारची कारवाई न करता सोडुन दिले जात आहे.अशाच प्रकारे पालोद शिवारात गट क्रमांक १९ खेळणा नदीच्या पात्रातून रात्रीच्या वेळी बेसुमार वाळू उपसा सुरू होता, ४० ते ५० ब्रास वाळू उपसा झाल्यानंतर संबंधित नदी पात्राच्या कडेला शेती असलेले शेतकरी संतोष पाटील साखळे यांच्या ही बाब लक्षात आली, त्यांनी हे वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टर पकडून देण्याचा निश्चय केला आणि रात्रीच्या वेळी आणि शेतात दबा धरून बसले, नेहमी प्रमाणे वाळू करर्णाय़ांनी ट्रॅक्टर मध्ये वाळू भरली आणि नदीच्या वर ट्रॅक्टर निघतात संतोष सांगळे यांनी महसूल विभाग काही तरी कारवाई करेल अशा अपेक्षेने तलाठी यांना मोबाईल द्वारे संपर्क करुन तलाठी यांना बोलावून घेतले, परंतु तहसील कार्यालयातील लिपिक राजपूत यांनी घटनास्थळी येऊन शेतकऱ्यांचे आणि तलाठी यांचे काही एक न ऐकता ट्रॅक्टर सोडून दिला.

त्यामुळे कुंपणच शेत खाते असेल तर काय म्हणावं असा प्रश्न शेतर्क़यांना पडला. सिल्लोड तालुक्यात अनेक नदी पात्रातून

अवैद्य रित्या वाळू उपसा सर्रासपणे पणे सुरू आहे .कुठे तरी तक्रार झाली तर थातुरमातुर कारवाई करुन वाहणे सोडुन दिले जाते.या प्रकारामुळे शासनाचा महसूल बुडत असुन भविष्यात भुजल पातळी कमी होऊन पाण्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

> माझ्या शेताला लागून असलेल्या खेळणा नदीचे पात्र असुन या पत्रातुन अवैध रित्या वाळू उपसा सुरू असुन या मुळे दरड कोसळुन माझ्या जमीनीचे नुकसान होत आहे. स्वतः मी वाळू उपसा करणारा ट्रॅक्टर पालोद सजेच्या तलाठी यांना बोलावून पकडून दिला असतांना तो ट्रॅक्टर मालकावर कोणत्याही प्रकारची कारवाई न करता सोडून दिला असल्याचे समोर आले आहे.या प्रकारामुळे रक्षणकर्ते जर भक्ष्यण करते होत असेल तर जन सामान्य माणसाने कोणाकडे जावे?
>
> -संतोष पाटील साखळे
> प्रगत शील शेतकरी, लिहाखेडी

## मागील हंगामातील फळे नष्ट करा

### एक दिवस बळीराजासाठी : डॉ. संजय पाटील

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : मोसंबी झाडावरील मागील हंगामातील शिल्लक राहिलेली वाळलेली, काळपट, बुरशीचा प्रादुर्भाव झालेली फळे तोडून नष्ट केल्यास पुढे फळगळीवर नियंत्रण होण्यास मदत मिळणार असल्याचे प्रतिपादन मोसंबी संशोधन केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. संजय पाटील यांनी केले.'एक दिवस बळीराजासाठी' या उपक्रमांतर्गत शिरसमार्ग (ता. गेवराई) येथे बुधवारी, ११ रोजी मोसंबी संशोधन केंद्रातर्फे आयोजित मोसंबी परिसंवादात पाटील बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मोसंबी बागायतदार पांडुरंग कोळेकर, प्रकाश कोळेकर, कृषी विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ डॉ. दीपक कच्छवे, मंडळ कृषी अधिकारी शितल माळी, कृषी सहायक मनोज सांगळे, अनिल देशमुख, शेख आदी उपस्थित होते.

'ती' फळे तोडा

यावेळी डॉ. पाटील म्हणाले, मागील वर्षी मोसंबी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात फायटोप्थोरा बुरशीमुळे गळ झाली होती. तोडणीनंतर मागील वर्षीची काही फळे झाडावर शिल्लक दिसत आहेत, त्यावर बुरशीचा प्रादुर्भाव दिसत आहे. येणाऱ्या बहरावर या बुरशीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी फळे तोडून नष्ट करणे फायदेशीर ठरेल तसेच अंबिया बहराच्या मोसंबी बागांचा ताण तोडताना शिफारशीत खतमात्रा देऊन हळूहळू पाणी वाढवत जाणे फुले येण्याच्या दृष्टीने फायद्याचे ठरेल. मोसंबी रोग-किडीबाबत डॉ. कच्छवे यांनी माहिती दिली. यावेळी परिसरातील मोसंबी बागायतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छत्रपती संभाजीनगर परिमंडलात ६३५१ ग्राहकांनी बसवले छतावरील सौरऊर्जा संच

### पीएम-सूर्यघर मोफत वीज योजनेत वीजबिल होणार शून्य

छत्रपती संभाजीनगर : प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत छत्रपती संभाजीनगर परिमंडलात ६ हजार ३५१ घरगुती ग्राहकांनी २३.६६ मेगावॅट क्षमतेचे सौरऊर्जा संच घराच्या छतावर बसवले आहेत. घरीच वीजनिर्मिती होणार असल्याने या ग्राहकांचे मासिक वीजबिल शून्य होणार आहे.

घराच्या छतावर १ ते ३ किलोवॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पाद्वारे घरगुती ग्राहकांना दरमहा सुमारे १२० ते ३६० युनिट वीज मोफत मिळविण्याची संधी प्रधानमंत्री सूर्यघर योजनेत मिळत आहे. सौर प्रकल्प उभारण्यासाठी विविध बँकांकडून सवलतीच्या व्याजदराने कर्जाची सोय उपलब्ध आहे. तसेच महावितरणकडून १० किलोवॅटपर्यंतच्या अर्जांना स्वयंचलित मंजुरी देण्यात येत आहे तसेच सौर नेटमीटरदेखील उपलब्ध करून देण्यात येत आहे.

योजनेत कार्यान्वित झालेल्या सौर प्रकल्पांतून निर्माण झालेली वीज ग्राहकांना वापरता येते. शिवाय ग्राहकाची गरज भागवून वीज शिल्लक राहिल्यास महावितरणकडून ती विकत घेण्यात येत आहे. त्याची रक्कम संबंधित ग्राहकांच्या वीजबिलात समायोजित केली जात आहे. छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून घरगुती वीजग्राहकांना एक किलोवॅटसाठी ३० हजार रुपये, दोन किलोवॅटसाठी ६० हजार रुपये आणि तीन किलोवॅट आणि त्यापेक्षा जास्त क्षमतेसाठी कमाल ७८ हजार रुपये अनुदान थेट मिळत आहे.

याबरोबरच गृहनिर्माण संस्था, गृहसंकुलांसाठी विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन व सामायिक उपयोगासाठी ५०० किलोवॅटपर्यंत प्रति किलोवॅट १८ हजार रुपये असे कमाल ९० लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येत आहे. ३०० युनिटपर्यंत मासिक वीजवापर असणाऱ्या घरगुती वीजग्राहकांसाठी ही योजना अतिशय उपयुक्त आहे. तसेच सुमारे २५ वर्षे या सौर प्रकल्पांतून घरातील वीजवापरासाठी मोफत वीज उपलब्ध होणार आहे. त्यामुळे प्रधानमंत्री सूर्यघर योजनेत घरगुती ग्राहक व गृहसंकुलांनी सहभागी व्हावे, असे आवाहन महावितरणचे मुख्य अभियंता पवनकुमार कछोट यांनी केले आहे.

## श्री छत्रपती शिवाजी विद्यालय सिल्लोड येथे गीता जयंती साजरी



सिल्लोड - आज दि.११डिसेंबर रोजी श्री छत्रपती शिवाजी विद्यालय येथे गीता जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी श्रीमद्भगवद् गीता ग्रंथाचे पूजन विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री संजीव दौड तसेच सर्व शिक्षक यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी शाळेचे सहशिक्षक अमोल तातू यांनी श्रीमद् भगवद् गितेच्या संस्कृत श्लोकाचे मराठीत अनुवाद करून त्यांचा आपल्या जीवनात कसा उपयोग करावा त्याबद्दलचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.त्यानंतर मुख्याध्यापकांनी सुद्धा गितेबद्दल आपले विचार मांडले. सदरील कार्यक्रम प्रसंगी शाळेचे शिक्षक रमेश सोनवणे, विष्णू फरकाडे,कृष्णा सपाटे, पांडुरंग डापके,निशांत म्हस्के,श्रीमती तायडे, श्रीमती काळे, कोलोड सर,रमेश परदेशी,राजपूत सर, मगर सर, कृष्णा भांडारे, संजय पाखरे,गणेश चव्हाण,गजानन दौड,अंगद काळे,पंकज सावंत,यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभारप्रदर्शन श्री रमेश सोनवणे यांनी केले.

## स्व. गोपीनाराव मुंडे यांना अभिवादन



सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.१२, शिवसेना नेते आमदार अब्दुल सत्तार यांच्या जनसंपर्क कार्यालयात लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्या हस्ते लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आळंदी येथील ह. भ. प. विष्णु महाराज केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी माजी नगराध्यक्षा राजश्री निकम, शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, शिवसेना महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख दुर्गाबाई पवार, तालुकाप्रमुख मारुती पा. वराडे, नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक राजेंद्र ठोंबरे, विठ्ठल सपकाळ, शंकरराव खांडवे ,हरिदास ताठे, ज्ञानेश्वर ताठे, सयाजी वाघ, कृउबा समितीचे संचालक शेख जावेद, प्रशांत क्षीरसागर, सुधाकर पाटील, राजू गौर, दादाराव ताठे , अशोक कांबळे, पंढरी ढाकणे, प्रभाकर पारधे, गणेश सयाजी वाघ, सुरेश काळे, कारभारी वाघ , रघुनाथ ताठे , मानसिंग राजपूत , फहिम पठाण, विजय खाजेकर ,सुनील पांडुरंग दुधे, संतोष खैरनार, विशाल खैरे ,प्रवीण मिरकर, दिलीप जाधव , अजय खाजेकर,सुनील लांडगे ,दत्तू पंडित आदींची उपस्थिती होती.

## अत्याधुनिक सीईवी-वी श्रेणीतील बांधकाम उपकरणे लाँच

छत्रपती संभाजीनगरी - महिंद्रा समूहाचा एक भाग असलेल्या महिंद्रा कन्स्ट्रक्शन इक्विपमेंट विभागाने बाउमा कॉनएक्सपो २०२४ मध्ये त्यांची नवीन उत्पादने लाँच केली. ही उत्पादने नावीन्यता आणि विश्वासार्हतेची प्रतीक आहेत. नवीन सीईवी५ श्रेणीतील बांधकाम उपकरणे त्यांच्या श्रेणीतील नवीन मानके स्थापित करतील, प्रगत वैशिष्ट्ये आणि उद्योगातील नवीन मानकांचे पालन करतात. इंडिया एक्स्पो सेंटर येथील महिंद्रा पॅव्हेलियनमध्ये महिंद्राच्या बीएसवी श्रेणीतील बांधकाम उपकरणे रोडमास्टर आणि अर्थमास्टर मांडल्या, तसेच बांधकाम क्षेत्रासाठीचा विस्तृत ट्रक श्रेणी - ब्लेज़ो एक्स ४८ सीएलएस १०४ टिपर, ब्लेज़ो एक्स एम-ड्यूरा ३५ ८४ टिपर, ब्लेज़ो एक्स २८ ट्रांझिट मिक्सर ७.५ घनमीटर ड्रमसह, फुरियो १० फ्युल बाउझर ६के.एल क्षमतेसह आणि बोलेरो कॅम्पर व मॅक्स पिकअप प्रदर्शित केली आहेत.

## सर्वात मोठा नाताळ सोहळा, फिनिक्स मार्केटसिटी येथे

छत्रपती संभाजीनगरी : फिनिक्स मार्केटसिटी पुणे, नाताळच्या जादूची पखरण करण्यास सज्ज आहे. १४ डिसेंबर २०२४ ते १ जानेवारी २०२५ दरम्यान, फिनिक्स मार्केटसिटी घेऊन येत आहे ख्रिसमस वंडरलँड, जिथे सणाचा उत्साह, आनंद आणि अविस्मरणीय अनुभवांची मेजवानी मिळणार आहे. चमचमणाऱ्या ४० फूट उंच ख्रिसमस ट्रीसह, मनमोहक कॅरोल गाणी, लाइव्ह शो, रोमांचक खेळ, आणि आकर्षक ख्रिसमस मार्केटमुळे प्रत्येकाला या ठिकाणी आनंद लुटता येणार आहे. फिनिक्स मार्केटसिटीने नाताळनिमित्त सजावट केलेली असून या ठिकाणी प्रवेश केल्या केल्या तुम्हाला नाताळचा उत्साह अनुभवण्यास मिळेल. या ठिकाणी ४० फुट उंचीचे ख्रिसमस ट्री उभारण्यात आले असून सेल्फी काढण्यासाठी विशेष सोय उपलब्ध असेल. नाताळ विशेष पदार्थांचा आस्वाद घेत असतानाच तुम्ही गुणवंत कलाकारांच्या लाइव्ह संगीताचा आनंद घेऊ शकता. कार्निवल कलाकार त्यांची कला सादर करतील,

## एल्गीकडून पीजी ८५०एस-२९० पोर्टेबल कंप्रेसरचे अनावरण

मुंबई - एअर कंप्रेसर उत्पादनात जागतिक आघाडीवर असलेल्या एल्गी इक्विपमेंट्स लिमिटेड ने पीजी ८५०एस-२९० पोर्टेबल एअर कंप्रेसर नवकल्पना बाउमा कॉनएक्सपो इंडिया २०२४च्या ७व्या संपादनात इंडिया एक्स्पो केंद्र, दिल्ली एनसीआर येथे लॉन्च केली.. तसेच एल्गी आऊटडोअर बूथ, ओजी ३० वर प्रदर्शनात, इलेक्ट्रिकवर चालणारे पीजी ११० ई, पीजी १३२ ई, पीजी २२ ई आणि डिझेलवर चालणारे पीजी५५०-२१५ पोर्टेबल एअर कंप्रेसर आहेत, ज्यांना खाणकाम आणि बांधकामात भारतातील उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला आहे. १००० हून अधिक प्रदर्शक, ७५,००० अभ्यागत आणि जगभरातील बांधकाम, खाणकाम आणि उत्पादन उद्योगातील प्रमुख निर्णय घेणारे ट्रेडशोला भेट देतील अशी अपेक्षा आहे.

## इव्हेंटबझार डॉट कॉम हे भारतातील पहिले सर्वसमावेशक इव्हेंट मॅनेजमेंट प्लॅटफॉर्म

मुंबई : भारतातील इव्हेंट मॅनेजमेंट उद्योगात क्रांती घडवून आणणारा एक महत्त्वाचा व्यासपीठ इव्हेंटबझार डॉट कॉम मंगळवारी अहमदाबाद येथून लॉन्च करण्यात आला. हे व्यासपीठ इव्हेंट मॅनेजमेंट इंडस्ट्रीमध्ये १५ वर्षांपेक्षा जास्त अनुभव असलेले अनुभवी उद्योजक हिरव शाह यांच्या मनाची उपज आहे. इव्हेंट मॅनेजमेंट क्षेत्र, ज्यामध्ये विवाह, सामाजिक आणि उत्सव कार्यक्रम, कॉर्पोरेट इव्हेंट्स आणि बरेच काही समाविष्ट आहे, अंदाजे रु. वर्षाला ६ लाख कोटी. त्याचे प्रचंड आर्थिक योगदान असूनही, हे क्षेत्र अत्यंत असंघटित आहे.इव्हेंट मॅनेजमेंट सेक्टर अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देते, लाखो नोकऱ्या निर्माण करते, परंतु अत्यंत खंडित आणि अकार्यक्षम आहे. दोन वर्षांहून अधिक बारीकसारीक तयारी आणि नियोजनासह इव्हेंटबझार डॉट कॉम हे या आव्हानांना आमचे उत्तर आहे.

## मुंबई उच्च न्यायालयाचा पीपीएलला दिलासा

मुंबई - फोनोग्राफिक परफॉर्मन्स लि. (पीपीएल)च्या लुलू इंटरनॅशनल शॉपिंग मॉल्स प्रा. लि. विरोधातील प्रकणात मुंबई उच्च न्यायालयाने पीपीएलच्या बाजूने आदेश दिला आहे. या लक्षणीय कायदेशीर घडामोडीनुसार, न्या. आर.आय. छागला यांनी ५ डिसेंबर २०२४ रोजी दिलेल्या आदेशामुळे सार्वजनिक जागांवर संगीताचा वापर करण्याबाबत अत्यंत महत्त्वाचे उदाहरण घालून देण्यात आले आहे. ज्येष्ठ वकिल श्री. शरण जागितानी आणि प्रख्यात वकिलांची टीम पीपीएलचे प्रतिनिधीत्व करत आहे. लुलू इंटरनॅशनल शॉपिंग मॉल्स तसेच त्यांच्या नियंत्रणाखालील हॉटेल्स आणि इतर सर्व आस्थापनांमध्ये वापरल्या जाणाऱ्या साऊंड रेकॉर्डिंगवर आपल्या स्वामित्त्व हक्काचा दावा करण्यासाठी पीपीएलने या टीमच्या माध्यमातून कायदेशीर पाऊल उचलले आहे. न्यायालयाने पीपीएलचा दावा मान्य केला आहे आणि प्रतिवादीच्या वकिलांनी केलेली विधाने हमीपत्र म्हणून स्वीकारली आहेत.न्यायालयाच्या आदेशानुसार, लुलू इंटरनॅशनल शॉपिंग मॉल्सने त्यांच्या परिसरात आयोजित कार्यक्रमांमध्ये वापरल्या जाणाऱ्या कोणत्याही ध्वनी रेकॉर्डिंगसाठी पीपीएलकडून परवाने घेणे आवश्यक आहे. यामध्ये लुलूच्या आवारात तृतीय पक्षांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमांचा समावेश आहे.

# मौजे कोल्हा परिसरात एका शेतकऱ्यांच्या शेततळ्यात तीन साप रेस्क्यू

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. ११ डिसेंबर**



मुदखेड तालुक्यातील मौजे कोला येथील सिध्देश्वर माने यांच्या शेत तळ्यात मागील दोन महिन्या पासुन मण्यार जातीचे दोन साप व एक धामण जातीचा साप आणि दिवड जातीचे साप असे एकूण चार साप शेत तळ्यात आढळून आले असता शेतकरी शिध्देश्वर माने यांनी सर्पमित्र आनंद हाटकर यांच्याशी संपर्क साधला आणि सर्पमित्र यांनी शेत तळ्यात जाऊन दोन मण्यार जातीचे साप व एक धामण जातीचा साप रेस्क्यू केला तिनही साप रेस्क्यू करित असताना आनंद हाटकर यांना खुप मेहनत करावी लागली शेवटी तीन तासानंतर तीन साप शेत तळ्यातुन रेस्क्यू करण्यात आले.

दिवड जातीचा साप हा पाण्यातच राहतो त्यामुळे त्या सापा पासुन माणसाला कुठलाही धोका नसल्यामुळे दिवड जातीचा साप रेस्क्यू केला नाही. रेस्क्यू केलेले तीन साप मानव वस्ती पासून दूर जंगलात सोडण्यात येईल असे सर्पमित्र आनंद हाटकर यांनी माध्यमाशी बोलताना सांगीतले आहे. ज्ञानेश्वर माने यांनी सांगीतले कि साप हा शेतकऱ्यांचा मित्र असतो त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्यांनी सापाला मारू नये कारण साप हा पर्यावरणाचा एक भाग असतो अशा ठिकाणी साप आढळला तर सर्पमित्र यांच्याशी संपर्क साधावा असे त्यांनी शेतकर्यांना संदेश दिला आहे.

यावेळी सर्पमित्र आनंद हाटकर यांचे सहकारी रत्नदिप हाटकर, प्रज्योत हाटकर यांनी सहकार्य केले. शेतकरी शिध्देश्वर माने व त्यांच्या शेजारी शेतकरी यांनीही सहकार्य केले.

# राज्य नाट्य स्पर्धेच्या नांदेड केंद्राचा अंतिम निकाल जाहीर

## वसुधैव कुटुंबकम्' आणि 'गंमत असते नात्याची' ही नाटके अंतिम फेरीसाठी पात्र

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ११ डिसेंबर :** ६३ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत नांदेड केंद्रातून तन्मय ग्रुपच्या 'वसुधैव कुटुंबकम्' या नाटकाने प्रथम क्रमांक पटकावला आहे. परभणीच्या राजीव गांधी युवा फोरमच्या 'गंमत असते नात्याची' या नाटकास द्वितीय क्रमांक मिळाला आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे यांनी या निकालांची घोषणा केली. नांदेड येथील कुसुम सभागृहात ता.२५ नोव्हेंबर ते ता.६ डिसेंबर दरम्यान आयोजित प्राथमिक फेरीत एकूण १२ नाटके सादर करण्यात आली. तृतीय क्रमांकासाठी स्वप्नरंग सांस्कृतिक संस्थेच्या 'व्हाईट पेपर' या नाटकाची निवड झाली आहे. परीक्षक म्हणून देवदत्त पाठक, नंदकुमार सावंत आणि डॉ. माणिक वड्याळकर यांनी काम पाहिले.उत्कृष्ट अभिनयासाठी रौप्यपदक नागेश लोकडे (वसुधैव कुटुंबकम्) आणि क्रांती दैठणकर (सेल्फी) यांना मिळाले. तसेच विविध नाटकांतील कलाकारांना गुणवत्ता प्रमाणपत्रांनी गौरवण्यात आले. सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी यशस्वी संघ व कलाकारांचे अभिनंदन केले असून भविष्यातील कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या. यातील 'वसुधैव कुटुंबकम्' आणि 'गंमत असते नात्याची' ही नाटके अंतिम फेरीसाठी पात्र ठरली आहेत. या स्पर्धेसाठी समन्वयक म्हणून किरण चौधरी आणि त्यांच्या टीमने परिश्रम घेतले. अभिनयासाठी मोनिका गंधर्व, नीलिमा चितळे, अर्चना चिक्षे, सुषमा कुलकर्णी, किशोर पुराणिक, गौतम गायकवाड,आदित्य उदावंत आणि चंद्रकांत तोरणे यांना गुणवत्ता प्रमाणपत्रे मिळाली.

# विभागीय टेनिक्काईट स्पर्धेमध्ये अग्रसेन विद्या मंदिर उपविजेता

ईटखेडा / प्रतिनिधी - पैठण रोड येथील अग्रसेन विद्या मंदिर शाळेतील खेळाडूंनी क्रीडा व युवक सेवा संचनालय महाराष्ट्र राज्य पुणे व छत्रपती संभाजीनगर जिल्हा क्रीडा कार्यालयातर्फे विभागीय क्रीडा संकुल येथे आयोजित शालेय विभागीय टेनिक्काईट स्पर्धेमध्ये चमकदार कामगिरी करत द्वितीय क्रमांक मिळविला. या १७ वर्षाआतील मुलींच्या संघामध्ये गार्गी जाधव, ईश्वरी वैदय, सई कवडी, आर्या शिंदीकर, रिद्धी पाटील, इशिका काकडे या खेळाडूंचा सहभाग



होता.

खेळाडूंना शाळेचे क्रीडाशिक्षक सोनी खरात, डॉ.कैलास शिवणकर, रविंद्र माळी, अभिजीत शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. विजेत्या खेळाडूंनी केलेल्या कामगिरीबद्दल शाळा समितीचे विश्वस्त केशवजी लीला, विद्यमान अध्यक्ष राजकुमारजी टिबडेवाला, उपाध्यक्ष राजेशजी भारुका, सचिव निधिजी अग्रवाल, कोषाध्यक्ष पंकजजी अग्रवाल, शाळेचे प्राचार्य संतोष कुमार करवा व उपप्राचार्या मयुरी लोगलवार, अधिक्षक अजय सोनुने सर्व विभागाचे विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# मागेल त्याला सौर कृषिपंप, एक लाखाचा टप्पा ओलांडला

छत्रपती संभाजीनगर : केवळ दहा टक्के रक्कम भरून सौर वीजनिर्मिती पॅनल्स व कृषिपंप असा संपूर्ण संच शेतकऱ्यांना देण्याच्या 'मागेल त्याला सौर कृषी पंप' योजनेच्या अंमलबजावणीत महावितरणने एक लाख पंप बसविण्याचा टप्पा ओलांडला आहे, अशी माहिती महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा शेतकऱ्यांची पेड पेंडिंगची समस्या सोडविण्यासाठी ही योजना राबवण्यासाठी आग्रह आहे. शेतकऱ्यांना सिंचनाच्या बाबतीत स्वतंत्र करणारी आणि त्यांना दिवसा सिंचनाची सुविधा उपलब्ध करणारी ही योजना प्राधान्याने राबवण्याची सूचना त्यांनी केली आहे. सौर कृषिपंप बसवण्यामध्ये महाराष्ट्र राज्याने देशात आघाडी घेतली असून त्याबद्दल नुकताच केंद्र सरकारने आयोजित केलेल्या बैठकीत राज्याचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला.

राज्यात ११ डिसेंबरपर्यंत एकूण १,०१,४६२ सौर कृषी पंप महावितरणकडून बसविण्यात आले आहेत. यामध्ये सर्वाधिक १५,९४० पंप जालना जिल्ह्यात बसविण्यात आले आहेत. बीड (१४,७०५ पंप), परभणी (९,३३४), अहिल्यानगर (७६३०), छत्रपती संभाजीनगर (६२६७) आणि हिंगोली (६०१४) जिल्ह्यांमध्ये जालन्याच्या खालोखाल पंप बसविण्यात आले आहेत.

राज्य सरकारने फेब्रुवारी महिन्यात अर्थसंकल्पात या योजनेची घोषणा केली होती. राज्य सरकारने राज्यात साडेदहा लाख सौर कृषिपंप बसविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. दहा लाखापेक्षा जास्त पंप बसवण्यात येणार असल्याने कृषिपंपासाठी पैसे भरून वीज कनेक्शनची प्रतीक्षा करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांचा पेड पेंडिंगचा प्रश्न सुटणार आहे.

या योजनेत शेतकऱ्यांना प्रधानमंत्री कुसुम योजनेत केंद्र सरकारकडून ३० टक्के तर राज्य सरकारकडून ६० टक्के अनुदान मिळते. त्यामुळे केवळ दहा टक्के रक्कम भरून सिंचनासाठी कृषिपंपासह संपूर्ण संच मिळतो. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना केवळ ५ टक्के लाभार्थी हिस्सा भरावा लागतो.

महावितरणने आतापर्यंत गेल्या काही वर्षात विविध योजनांच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून २ लाख सौर कृषिपंप बसविले असून त्यापैकी एक लाख पंप मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेत या वर्षी बसविले आहेत व देशात अतुलनीय कामगिरी केली आहे.

सौर पॅनल्समधून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ शेतकऱ्यांना कृषिपंपाचे वीजबिल येत नाही. हे पंप पारंपरिक वीजपुरवठ्यावर अवलंबून नसल्याने शेतकऱ्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे दिवसा कधीही सिंचन करता येते. त्यामुळे दिवसा वीज पुरवठ्याची शेतकऱ्यांची मागणी पूर्ण होते.

## जाहीर प्रगटण

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर**
**ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र.५६१/२०२४

अर्जदार : १) सोमनाथ रतन गायकवाड, वय ५३ वर्षे, धंदा शेती, रा. गोपीनाथनगर, लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) शिवनाथ रतन गायकवाड, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. गोपीनाथनगर, लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) मंगला भ्र. अशोक पठारे, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम रा. अनंतपुर, लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) सिमा भ्र. सुनिल शिरसाठ, वय ४४ वर्षे, धंदा घरकाम रा. शिरसाठ गल्ली, लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. ए.बी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ते ४ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिणी असुन अर्जदार क्र.१ ते ४ यांचे वडील नामे रतन सदुजी गायकवाड हे मौजे हर्सल, लासुर स्टेशन ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक २०/०१/२०२२ रोजी हर्सुल, लासुर स्टेशन ता. गंगापुर येथे मयत झालेले आहे व तसेच अर्जदार क्र.१ ते ४ यांची आई नामे जिजाबाई रतन गायकवाड ह्या दिनांक १६/०३/२०११ रोजी मयत झालेल्या आहे. मयत रत्तन सदुजी गायकवाड यांना अर्जदार क्र.१ ते ४ हे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर नसल्याचे नमुद करुन या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत्त अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्द्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ११/११/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर

---

संचिका क्रं. २०२४/३.वि.अ.वै. एम.ए.जी./ज. गृ.नोंद/सी.आर /२०२४ दिनांक : २६/११/२०२४

## जाहीर प्रगटन

अर्जदार :- श्री/श्रीमती रिना प्रदिप जाधव रा.जेऊर ता. जि. अहमदनगर

:-: विरुध्द :-:

गैरअर्जदार :- ग्रामसेवक ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय लासूरस्टेशन जि. छत्रपती संभाजीनगर. ना गंगापुर

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११ (२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार यांची आई नामे मिना दिलीप बनसोडे यांचा मृत्यु दिनांक २०/०१/२००२ रोजी मौजे वैजापूर ता वैजापूर येथे झाला असून ग्रामसेवक ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय लासूरस्टेशन ता गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनूसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक २६/११/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.
दिनांक :- २६/११/२०२४.
उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क. स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

Civil Misc. Application No. 568/2024

सुमनबाई आसाराम जमधडे व इतर

विरूध्द

निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत आसाराम हरी जमधडे हे दि. १२/०८/२०२३ रोजी मौजे वाळुज बु., ता.गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावले असुन अर्जदार नं. १. सुमनबाई आसाराम जमधडे, रा. वाळुज बु., ता. गंगापुर जि. औरंगाबाद २. सुनील आसाराम जमधडे, रा.रुम नं. ८, गणेश दर्शन चाळ, मनवेलपाडा रोड, गीतांजली शाळे जवळ, राणी तलाव, विरार पुर्व, ठाणे, ३. राजेश आसाराम जमधडे, रा. वाळुज बु., ता. गंगापुर जि. औरंगाबाद ४. संगीता शैलेंद्र तिणगोटे, रा.वाळुज, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ५. कल्पना प्रकाश जाधव, रा. करोडी, बजाजनगर, औरंगाबाद यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री. बी.पी.जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार नं. १ ते ५ यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.११/१२/२०२४

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

---

संचिका क्रं. २०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी./ज. मृ. नोंद/सी.आर. /२०२४ दिनांक : २७/०८/२०२४.

## जाहीर प्रगटन

अर्जदार : श्री/श्रीमती ऋषिकेश भानुदास भुजग रा. वाळूज ता गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

:-: विरुध्द :-:

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय वाळुज ता गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११(२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार स्वतः नामे प्राज्वल ऋषिकेश भुजग यांचा जन्म दिनांक २७/०९/२०१८ रोजी मौजे वाळुज ता गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालंय वाळुज ता गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे. त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनुसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक २७/०८/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.
दिनांक : २७/०८/२०२४.
उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

---

संचिका क्र.२०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी./ज.मू. नोंद/सी. आर /२०२४ दिनांक : २७/०८/२०२४.

## जाहीर प्रगटन

अर्जदार : श्री/श्रीमती नकुल नंदु वाघ रा. पानशेंदरा पो जांबोडी ता जि जालना

:-: विरुध्द

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय अगरकानडगांव ता गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११ (२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत..

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार यांचा मुलगी नामे ईश्वरी नकुल वाघ यांचा जन्म दिनांक १९/०९/२०२० रोजी मौजे अगरकानडगांव ता गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय अगरकानडगांव ता गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनूसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक २७/०८/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.
दिनांक : २७/०८/२०२४.
उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

---

संचिका क्र.२०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी./ज.मू. नोंद/सी.आर /२०२४ दिनांक : २७/०८/२०२४.

## जाहीर प्रगटन

अर्जदार : श्री/श्रीमती अंबादास नंदु पवार रा. वाळुज ता गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

:-: विरुध्द :-:

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय वाळुज ता गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

वैजापर

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११(२) व जन्म मृत्यू नोंद बाबत. ३ प्रमाणे

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार यांचा मुलगा नामे कार्तिक अंबादास पवार यांचा जन्म दिनांक ३०/०६/२०१७ रोजी मौजे वाळूज ता गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय वाळुज ता गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे. त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनूसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक २७/०८/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.
दिनांक :- २७/०८/२०२४.
उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

---

संचिका क्रं. २०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी./ज. मृ.नोंद/सी.आर /२०२४ दिनांक : २७/०८/२०२४.

## जाहीर प्रगटन

अर्जदार : श्री/श्रीमती अंबादास नंदु पवार रा. वाळुंज ता गंगापूर

:-: विरुध्द :-:

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय वाळुंज ता गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११ (२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार यांचा मुलगा नामे साई अंबादास पवार यांचा जन्म दिनांक २८/०१/२०२१ रोजी मौजे वाळुंज ता गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय वाळुंज ता गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे. त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनूसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक २७/०८/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.
दिनांक :- २७/०८/२०२४.
उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

---

संचिका क्र.२०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी./ज.मु.नोंद/सी.आर /२०२४ दिनांक :- १७/१०/२०२४

## जाहीर प्रगटन

अर्जदार : श्री/श्रीमती गौसोददीन खुदाबोददीन शेख रा. सावंगी ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

:-: विरुध्द :-:

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय सावंगी ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११ (२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार भुलगा नामे अलिमोददीन गौसोददीन शेख यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९८९ रोजी मौजे सावंगी ता. गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय सावंगी ता. गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे. त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनुसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक १७/१०/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.
दिनांक: १७/१०/२०२४.
उप विभाशीय अधिकारी, वैजापूर,

---

संचिका क्रं. २०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी./ज. मृ. नोंद/सी. आर /२०२४ दिनांक :- १७/१०/२०२४

## जाहीर प्रगटन

अर्जदार : श्री/श्रीमती गौसोददीन खुदाबोददीन शेख रा. सावंगी ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

:-: विरुध्द :-:

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय सावंगी ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) जन्म मृत्यू नोंद बाबत. मध्ये कलम ११(२) व ३ प्रमाणे

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार मुलगी नामे समिना गौसिददीन शेख यांचा जन्म दिनांक १०/१२/१९८३ रोजी मौजे सावंगी ता. गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय सावंगी ता. गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनुसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक १७/१०/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.
दिनांक: १७/१०/२०२४.
उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

---

संचिका क्रं.२०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी./ज.गु. नोंद/सी. आर /२०२४ दिनांक :- १७/१०/२०२४

## जाहीर प्रगटन

अर्जदार : श्री/श्रीमती गौसोददीन खुदाबोददीन शेख रा. सावंगी ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

:-: विरुध्द :-:

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय सावंगी ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

पर

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) जन्म मृत्यू नोंद बाबत. मध्ये कलम ११(२) व ३ प्रमाणे

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार मुलगा नामे अजरोददीन गौसोददीन शेख यांचा जन्म दिनांक ०९/०३/१९९१ रोजी मौजे सावंगी ता. गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय सावंगी ता. गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनुसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक १७/१०/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.
दिनांक: १७/१०/२०२४.
उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

---

संचिका क्रं.२०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी./ज.म.नोंद/सी.आर /२०२४ दिनांक : २८/११/२०२४

## जाहीर प्रगटन

अर्जदार :- श्री/श्रीमती वजीर अमिर पठाण रा. इटावा ता गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

:-: विरुध्द :-:

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय इटावा ता गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय : जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम मध्ये कलम ११(२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार यांचा मुलगा नामे आफताब जावेद पठाण यांचा जन्म दिनांक ०१/०२/२००८ रोजी आलताब जावेद पठाण यांचा जन्म दिनांक २४/१२/२००९ मौजे इटावा ता गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय इटावा ता गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनूसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक २८/११/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.
दिनांक : २८/११/२०२४.
उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### वृंदावन जवळा रुमणा येथे गीता जयंती उत्साहात साजरी



**गंगाखेड,/प्रतिनिधी-** तालुक्यातील वृं जवळा (रु )येथे सकाळी गीता धाम या ठिकाणी गीतेच्या अध्यायाचे पारायण केले, त्यानंतर श्री श्री श्री महंत पद्मनाभानंद गिरी महाराज उत्तराधिकारी श्री तुळजाभवानी संस्थान राजगादी राजा टाकळी गोदावरी किनारा तालुका घनसावंगी जिल्हा जालना यांचे प्रवचन झाले, त्यानंतर सर्वांनी फराळाचा महाप्रसाद घेतला, या कार्यक्रमाचे आयोजन समस्त गावकरी मंडळीच्या वतीने करण्यात आली होती.

### ग्राहक जागरण पंधरवाड्याचे आयोजन करावे ग्राहक पंचायतची मागणी



**गंगाखेड,/प्रतिनिधी-** दरवर्षी दिनांक २४ डिसेंबर हा राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो, त्या अनुषंगाने १५ डिसेंबर ते ३१ डिसेंबर या दरम्यान ग्राहक जागरण पंधरवाडा साजरा करण्यात यावा असे निवेदन अखिल भारतीय ग्राहक पंचायत शाखा गंगाखेडच्या वतीने (दिनांक ९डिसेंबर सोमवार) रोजी तहसीलदार उषाकिरण शृंगारे तसेच पुरवठा अधिकारी प्रीतम डोडल यांना देण्यात आले. ग्राहक दिन साजरा करण्याच्या संबंधाने केलेल्या नियोजनात शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या योजना, ग्राहकांना आवश्यक असलेली सर्व माहिती या गोष्टींचा समावेश असावा. यासाठी कॉलेज, शाळा, व, ग्रामीण भागातील खेडी अशा सर्व ठिकाणी ग्राहक जागरणाचे कार्य करण्याच्या अनुषंगाने नियोजन करावे. यासाठी शहर व तालुक्यातील जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे सदस्य तसेच ग्राहक चळवळीतील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन पथनाट्य, निबंध स्पर्धा, शेतकरी मेळावे अशा उपक्रमाद्वारे व्यापक जनसंपर्क करून ग्राहक जागरणाचे कार्य करावे.ग्राहक जागरण पंधरवड्यामध्ये नव्याने आलेला ग्राहक संरक्षण कायदा, अन्नसुरक्षेच्या बाबतीत विविध माहिती ग्राहकांना पुरवने, दिशाभूल करणारी जाहिरात, सायबर फसवणूक गुन्हे आणि डिजिटल अटक याबद्दल ग्राहकांना माहिती देणे, दैनंदिन जीवनात उद्भवणाऱ्या खरेदी संबंधी विविध कायद्याची माहिती, वैद्यमापनशास्त्र, अन्न व औषध प्रशासन संबंधीच्या मूलभूत अधिकाराची माहिती इत्यादी बाबींचा ग्राहक जागरण उपक्रमामध्ये समावेश असावा. असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे निवेदनावर अखिल भारतीय ग्राहक पंचायत शाखा गंगाखेडचे तालुकाध्यक्ष गोपाळ मंत्री ,सचिव सय्यद ताजुद्दीन, शहराध्यक्ष सुधाकर चव्हाण, कोषाध्यक्ष महेमूद शेख, जिल्हाउपाध्यक्ष सोपानराव टोले ,जिल्हा महिला सदस्य प्रतिमा वाघमारे, मंजुषा जामगे,सदस्य परशुराम पापडू आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### भाजपचं जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन कठोर भुमिकेची केली मागणी

**परभणी,/प्रतिनिधी-** शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोरील संविधान प्रतिकृती अवमान घटनेच्या निषेधार्थ भारतीय जनता पार्टी महानगरच्या वतीने बुधवारी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

महानगर जिल्हाध्यक्ष राजेश देशमुख, डॉ. केदार खंटींग, भीमराव वायवळ, उमेश शेळके, डॉ. मनोज पोरवाल, भालचंद्र गोरे, मोहन कुलकर्णी, रितेश जैन, विजय गायकवाड, रमताई शेजावळे, मंगलताई मुदगलकर, प्रभावती अन्नपुर्वे, मुकेश गाढे, दिनेश नरवाडकर, व्यंकटेश कुलकर्णी, अरुण शेजावळे, स्वप्निल पिंगळकर यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना एक निवेदन सादर केले. त्याद्वारे, सामजिक तेढ निर्माण करण्यासाठी जाणीव पुर्वक केलेला प्रयत आहे. त्याठिकाणी उपस्थित असलेल्या भीम सैनिकांनी वेळीच मोडतोड करणाऱ्या व्यक्तीस पोलिसांच्या स्वाधीन केले. परंतू या कृतिमागे कोण आहे, याची सखोल चौकशी करण्यात यावी. आंबेडकरी समाजाच्या व संविधानप्रेमी जनतेच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत, म्हणून पूर्ववत त्याच ठिकाणी नवीन संविधान प्रतिकृती शिल्प बसवावे. पुतळ्याच्या दोन्हीं बाजूने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत व त्या आरोपीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी करण्यात आली आहे.

### दंगल प्रसंगी लोकप्रतिनिधीचें दुर्लक्ष- नागरिक व व्यापाऱ्यांत नाराजीचा सुर

**परभणी,/प्रतिनिधी-** बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्या समोरील संविधान प्रतिकृतीच्या स्थळावरील काचेची तोडफोड केल्याच्या निषेधार्थ बुधवारी विविध संघटनांनी पुकारलेल्या जिल्हा बंद च्या दरम्यान परभणी महानगरात मध्यवस्तीसह जिंतूर व वसमत रस्त्यावरील सकाळपासून दुपारी उशीरापर्यंत तूफान दगडफेक व जाळपोळी दरम्यान जिल्हा प्रशासन व पोलिस यंत्रणे पाठोपाठ बहुतांशी आजी-माजी लोकप्रतिनिधी,पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी केलेल्या दुर्लक्षामुळे व्यापाऱ्यांसह सर्वसामान्य नागरीकात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. या दरम्यान भारतीय जनता पार्टीच्या उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर यांनी दुपारीच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मोबाईल द्वारे संपर्क साधून परभणीतील परिस्थिती निदर्शनास आणून दिली.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुणालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# कायदा व सुव्यवस्था हातात घेवू नका

## पोलिस महानिरीक्षक शहाजी उमाप यांचे सर्व परभणीकरांना आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी:** कायदा व सुव्यवस्था हातात घेवून परिस्थिती चिघळविण्याचा कोणीही प्रयत करु नये, असा इशारा नांदेड विभागाचे विशेष पोलिस महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी दिला आहे.

महानिरीक्षक उमाप यांनी बुधवारी दुपारी परभणीत दाखल झाल्याबरोबर वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली. त्या पाठोपाठ शहरातील संवेदनशील भागांना भेटी दिल्या. तेथील स्थितीची पाहणी केली. बंदोबस्तावरील अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना सक्त सूचना दिल्या. पाठोपाठ माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलतांना मंगळवारी सायंकाळची संविधानाच्या प्रतिकृतीच्या तोडफोडीची घटना निश्चितच दुर्दैवी आहे. पोलिसांनी या प्रकरणात संबंधित आरोपी विरुध्द गुन्हे दाखल केले आहेत, तो ताब्यात आहे. त्याबाबत आणखीनही कसून चौकशी सुरु आहे. विशेषतः मंगळवारीच प्रशासनाने तात्काळ शांतता समितीची बैठक बोलावून सर्वांबरोबर तपशीलवार चर्चा केली. स्थिती निदर्शनास आणून दिली. यावेळी बंद पुकारणाऱ्या संघटनांच्या प्रतिनिधींनी बुधवारी केवळ आम्ही निवेदन देवू तेही शांततेच्या मार्गाने असा शब्द दिला होता. परंतु, बुधवारी निवेदन देण्यासाठी येतांना आंदोलनकर्त्यां काही कार्यकर्त्यांनी व्यापाऱ्यांच्या बोर्डसवर, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांवर दगडफेक केली. वाहनांचे टायर जाळले तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातसुध्दा धुडघूस घातला. या आंदोलनकर्त्यांना आम्ही बाहेर काढले आहे. कार्यालयासह पुतळा परिसरसुध्दा मोकळा केला आहे. सर्वत्र पेट्रोलिंगसुध्दा वाढविण्यात आली आहे. अन्य उपाययोजनाही करण्यात येवू लागल्या आहेत, असे उमाप यांनी नमूद केले. जिल्हा पोलिस दलाकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध आहे. पोलिस मुख्यालयाचे मनूष्यबळही तैनात करण्यात आले आहे. एसआरपीएफच्या कंपन्याही दाखल झाल्या असून स्थिती नियंत्रणात आणण्याकरीता सर्वतोपरि प्रयत सुरु असल्याचे ते म्हणाले. आंदोलनकर्त्यांनी कायदा व सुव्यवस्था हातात घेवू , असा इशारा देवून उमाप यांनी जे नुकसान झाले आहे, ते दुर्दैवी आहे. रितसर नोंद झाली असतांना, आरोपी अटकेत असतांना या प्रकारे प्रशासनास धारेवर धरण्याचा प्रकार योग्य नाही, असेही स्पष्ट केले.





**जिंतूर- जिंतूर- सेलू विधानसभा मतदारसंघातून सलग दुसऱ्यांदा महायुतीच्या अधिकृत उमेदवार आदरणीय सौ मेघनाताई साकोरेजी बोर्डीकर यांची विधानसभा सदस्यपदी निवड झाली, त्यानिमित्त आज आदरणीय आमदार सौ मेघनाताई साकोरेजी बोर्डीकर यांची त्यांच्या परभणी येथील निवासस्थानी भेट घेऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले व शुभेच्छा दिल्या... यावेळी उपस्थित ज्येष्ठ नेते आदरणीय श्री सुंदररावजी चव्हाण, प्रकाशरावजी दाभाडे (दादा), विनायकरावजी दाभाडे, मंचकरावजी खंडागळे, लिंबाजीराव खंडागळे, गणेशराव दाभाडे व आमचे बंधू काशिनाथ राऊत आदी दिसत आहेत.**

## गंगाखेडच्या भगवती चौकांत स्व.मुंडे यांची जयंती साजरी

**गंगाखेड,/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री तथा माजी केंद्रीय मंत्री स्व. गोपीनाथराव मुंडे यांची जयंती गंगाखेड शहरातील मुख्य भगवती चौकात साजरी करण्यात आली. महापुरुष जयंती समितीच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या निमित्त गोदावरी गंगा स्वच्छता दूत ॲड अशोक कुलकर्णी यांचा सत्कार करण्यात आला.

सर्व महापुरुषांच्या जयंत्या विविध जाती-धर्मियांच्या वतीने एकत्रितपणे साजरी करण्याचा पायंडा गंगाखेड येथे सुरू करण्यात आला आहे. या अंतर्गत स्व. गोपीनाथराव मुंडे यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्य चौकात स्व. मुंडे यांच्या प्रतिमेचे पुजन करून त्यांच्या स्मृतींना ऊजाळा देण्यात आला. तसेच स्वच्छता दूत ॲड कुलकर्णी यांची जयंती समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

काँग्रेस तालुकाध्यक्ष गोविंद यादव , माजी जि. प. सदस्य प्रल्हाद झोलकर, बाळासाहेब राखे सर, बालासाहेब पारवे, संयोजक माधवराव चव्हाण, नारायण घनवटे, डिगंबर यादव, श्रीपाद कोद्रीकर, विशाल मुंडे, शिवराज मुंडे, ईस्त्याक अन्सारी, महेश राव शेटे, डॉ. सचिन सुपेकर, पप्पू मोटे, नेमीचंद नखत जैन, देवीदास नेजे, सर्जेराव घनवटे यांच्यासह महापुरुष जयंती समितीचे पदाधिकारी कार्यकर्ते, शहरातील व्यापारी बांधव व नागरीक उपस्थित होते.

## परभणीतील त्या घटनेचे जिंतूर तालुक्यात पडसाद

**जिंतूर, बोरी, चारठाणा, येलदारीसह भोगावं कडकडीत बंद:**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** परभणी येथील भारतरत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात असलेल्या संविधान प्रतिकृतीच्या अवमानानंतर जिंतूर शहरांमध्ये दि.११ डिसेंबर बुधवार रोजी बंद पाळण्यात आला. तालुक्यात काहीठिकाणी दगडफेक करण्यात आली. एसटीच्या काचा फोडण्यात आल्या, बंदला चांगला प्रतिसाद मिळाला. रात्रीपासूनच जिंतूर शहर बंद होते, सकाळी नऊ ते दहा च्या सुमारास बौद्ध अनुयायांनी शहरांमध्ये फिरून दुकाने व ठिकठिकाणी असणाऱ्या विविध व्यवसायिकांना बंदचे आवाहन केले. काही ठिकाणी दगडफेक झाली. शहरात संभाजीनगर -माहूर या गाडीचे काच फोडण्यात आले. याशिवाय भोगाव येथे काही दुकानावर दगडफेक झाली. शहरांमध्ये भाजी मंडी मध्ये भाजीपाला व्यवसायिकांचे थोड्याफार प्रमाणावर नुकसान करण्यात आले. अपुरा पोलीस फोर्स व मोठ्या प्रमाणावर असणारा जमाव यामुळे पोलिसांची चांगली धांदल उडाली. जमाव हिंसक होत असल्याचे बघितल्यानंतर काही समाजातील नागरिकांनी जमावाची समजूत घालून वातावरण शांत केले. तहसीलदार राजेश सरवदे व पोलीस निरीक्षक बुद्धीराज सुकाळे यांनी बौद्ध अनुयायी यांना शांतता राखण्याचे आवाहन केले. भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने तहसीलदार राजेश सरवदे यांना निवेदनही यावेळी देण्यात आले.

## माणुसकीचं दर्शन घडवणारे लोकनेते म्हणजे स्व.गोपीनाथ मुंडे आदर्शवत- सांगळे

**जिंतूर,/प्रतिनिधी-** समाजातील प्रत्योक घटकाला न्याय देताना उत्तम विचार आणि सुसंस्कृतपणा जपणं महत्वाचं. समाजात वावरताना डोळे उघडे ठेवून चालावं लागतं. उपेक्षित वंचित घटकाला न्याय देण्यासाठी कार्यतत्परता दाखवणं गरजेचं. ग्रामीण भागात छोट्या छोट्या गोष्टी लक्षात घेऊन विकासात्मक दृष्टीकोन ठेवून करत राहिल्यास ते गाव समृद्ध होते आणि माणसं जोडल्या जातात.



शैक्षणिक स्तर उंचावण्यासाठी आपण त्या खेड्यात जाऊन तेथील स्थानिक अडीअडचणी समजून घेणे महत्वाचे .त्याठिकाणी आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या तरचं ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी मदत होईल. कुचित विचार हे खेड्यातील लोक पटकन लक्षात घेतात. आपल्या पासून दुरावत जातात.तेंव्हा सामाजिक बांधिलकी जपताना आपल्या परिवारातील सदस्य म्हणून वागणूक देणं हितावह असते. स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांनी समाजकारणाला महत्वं दिलं.ते लोकांना सदुउपयोग व्हावा यासाठी प्रथम कामं करत. व्यक्ती केंद्रबिंदू मानून त्यांनी समर्पण भाव जागृत ठेवून कर्तृत्व केले म्हणून लोकनेते झाले.असं प्रतिपादन त्र्यंबकेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ .गुलाबराव सांगळे यांनी स्वर्गिय गोपीनाथ मुंडे यांच्या जयंतीनिमित्त केले. व्यासपीठावर डॉ. गुलाबराव सांगळे अध्यक्ष, लक्ष्मण राठोड मुख्याध्यापक भगवान बाबा विद्यालय केहाळ . ता.जिंतुर दत्तराव नागरे प्रमुख अतिथी यांची उपस्थिती होती.

## सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा देण्याची निवेदनाव्दारे साकडे

### सकल मराठा समाजाचे तहसीलदार यांना मागणी

**जिंतूर,/प्रतिनिधी:** बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग गावचे तरुण सरपंच व मराठा आरक्षण चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते संतोष अण्णा देशमुख यांचे अपहरण करून खून करण्यात आला होता यातील सर्व आरोपीला अटक करून खटला फास्टट्रॅक कोर्टात चालून तत्काळ फाशी देण्याची मागणी सकल मराठा समाज जिंतूर तालुका यांच्या वतीने गुरुवार १२ डिसेंबर रोजी तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात आली आहे.




याबाबत सकल मराठा समाजाने दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,मागील काही दिवसांपासून मराठा समाजातील प्रतिष्ठित लोकांना टार्गेट करून धमकी देणे मारहाण करणे असले प्रकार चालू आहेत यातच केज तालुक्यातील मस्साजोग गावचे तरुण सरपंच व मराठा आरक्षण चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते संतोष अण्णा देशमुख यांचे अपहरण करून अमानुषपणे मारहाण करत खून केला आहे .

घडलेला प्रकार अतिशय निंदनीय असून लोकशाहीला काळिमा फासणारा आहे म्हणून घटनेचा निषेध व्यक्त करण्यात आला म्हणून खून करणाऱ्या सर्व आरोपींना अटक करावी,प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करावी, खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवण्यात यावा, घटनेचे साक्षीदार यांना पोलीस संरक्षण देण्यात यावे आदी मागण्या निवेदनात नमूद करण्यात आल्या आहेत सदरील निवेदन तहसीलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आले आहे निवेदनावर सकल मराठा समाजातील तरुणांच्या सह्या आहेत.

## व्यापाऱ्यांच्या नुकसानचे तात्काळ पंचनामे करा- आ.मेघना साकोरे



**जिंतूर,/प्रतिनिधी:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्या समोरील संविधान प्रतिकृतीच्या स्थळावरील काचेच्या तोडफोडीची घटना निश्चितच दुर्दैवी आहे. त्या घटनेतील आरोपींविरोधात कठोर भूमिका घ्यावी, त्याचबरोबर बुधवारी काहींनी व्यापारीपेठांमधून केलेल्या दगडफेकीसह जाळपोळीच्या घटनेत मोठा तडाखा बसलेल्या व्यापाऱ्यांच्या नुकसानीचे प्रशासनाने तात्काळ पंचनामे करावेत, तसेच तोडफोड व जाळपोळ करणाऱ्या समाजकंटकांवर लवकरात लवकर ओळख पटवून गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी भारतीय जनता पार्टीच्या आमदार सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केली.

आमदार बोर्डीकर यांनी बुधवारी सायंकाळी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांची भेट घेतली. संपूर्ण घटनेची माहिती घेतली. आरोपीला तात्काळ अटक करण्यात आली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सर्वांनी शांतता आणि संयम राखावा, असे आवाहनही करण्यात आले आहे, असे गावडे यांनी नमूद केले. यावेळी आमदार बोर्डीकर यांनी नुकसानग्रस्त व्यापाऱ्यांचे तात्काळ पंचनामे करावेत, वेगवेगळ्या घटनांमधील समाजकंटकांची ओळख पटवून गुन्हे दाखल करावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी भारतीय जनता पार्टीचे नेते सुनील देशमुख, रितेश जैन, माजी नगरसेविका सौ. मंगल मुदगलकर, राहुल कनकदंडे, सुशील शर्मा आदी उपस्थित होते.

# परभणी येथील संविधान विटंबनेच्या निषेधार्थ हिंगोलीत कडकडीत बंद

## बंद शांततेत पार पडला, पोलिसांचा तगडा बंदोबस्त



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ डिसेंबर.**
परभणी येथील रेल्वे स्थानक परिसरातील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूतळ्या जवळ संविधानाची विटंबना केल्याच्या निषेधार्थ दि १२ डिसेंबर रोजी आंबेडकरी अनुयायी तसेच संविधान रक्षकांच्यावतीने बंदची हाक देण्यात आली होती. या बंदला शंभर टक्के प्रतिसाद मिळाला असून आंदोलकांनी शांततेत बंद पाळला तसेच उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांना मागण्यांचे निवेदन सादर केले.

परभणी येथील घटनेचे पडसाद हिंगोलीतही उमटले. संविधान रक्षकांच्यावतीने गुरूवार दि १२ डिसेंबर रोजी बंदची हाक देण्यात आली होती. सकाळपासून शहरा-तील सर्व बाजारपेठ बंद ठेवण्यात आली होती. तसेच शाळा, महाविद्यालयातही विद्यार्थी आले नाही त्यामुळे शाळा, महाविद्यालयातही शुकशुकाट दिसत होता.
शहरातील डॉ आंबेडकर चौकात सकाळपासूनच आंदोलनासाठी आंबेडकरी प्रेमी जमा झाले होते. यावेळी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून परभणी येथील घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने महिला, पुरूष तसेच युवक-युवती यांची उपस्थिती होती. कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीकोनातून गांधी चौक, जवाहर रोड, डॉ आंबेडकर चौक या भागात दंगल नियंत्रण पथक तसेच तगडा पोलिस बंदोबस्त लावण्यात आला होता. शहरातील गांधी चौक भागात बॅरीकेटस लावून वाहतुक काही काळासाठी बंद करण्यात आली होती. सकाळपासूनच शहरातील मुख्य बाजारपेठेसह सर्व दुकाने, व्यापारी प्रतिष्ठाने तसेच शाळा, महाविद्यालये बंद ठेवण्यात आली होती.
पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भूजबळ, पोलिस निरीक्षक विकास पाटील यांनी बंदोबस्ताची पाहणी केली. यावेळी परभणी येथील घटनेचा तीव्र शब्दात निषेध करीत आंदोलकांनी शांततेत उपविभागीय अधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा काढून या घटनेतील आरोपी तसेच त्याच्या पाठीशी असलेल्या आरोपीचा शोध घेऊन कठोर कार्यवाही करण्याची मागणी निवेदनात केली.

# सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे जिल्हा परिषदेसमोर धरणे आंदोलन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ डिसेंबर**
सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना अद्याप सातव्या वेतन आयोगाचा २ रा, ३ रा, ४ था हप्ता मिळाला नाही तसेच ५ वा हप्ता अजूनही मंजूर झाला नाही. या प्रमुख मागणीसह इतर मागण्यांसाठी गुरूवारी सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्यावतीने जिल्हा परिषदेसमोर एक दिवसाचे धरणे आंदोलन करीत मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.
मागील अनेक महिन्यांपासून सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्यावतीने या मागण्यांचा प्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे परंतु प्रशासनाच्या उदासिनतेमुळे कर्मचाऱ्यांच्या मागण्यांची अंमलबजावणी होत नसल्यामुळे अखेर सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेच्यावतीने दि १२ डिसेंबर गुरूवारी जिल्हा परिषदेसमोर एक दिवशीय धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी निवेदन सादर करण्यात आले. त्यामध्ये मागील तीन महिन्यांपासून मासिक निवृत्ती वेतन अदा करण्यात अक्षम्य दिरंगाई होत आहे. माहे जुलै २०२४ रोजी देय असणारा सातवा वेतन आयोगातील ५ वा हप्ता अद्याप मंजूर करण्यात आला नाही तसेच काही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना २, ३, ४ था हप्ता अद्याप मिळाला नाही. लोकायुक्त मुंबई यांचे निकालानंतरही संगणक अर्हतेबाबत उपद-ानातून कपात केलेली रक्कम परत मिळालेली नाही. आरोग्य विभागाकडील वरिष्ठ व निवडश्रेणी प्रकरणे तसेच १०, २०, ३० चा लाभ अद्याप मिळाला नाही. शिक्षण विभागातील निवडश्रेणी प्रकरणे प्रलंबीत आहेत. अर्थ विभागातून गटविमा प्रकरणे वारंवार त्रुट्या काढून परत केली जात आहेत. पेन्शन अदालत नियमित घेतली जात नाही या मागण्यांचा समावेश आहे. या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष मनोहर पोपळाईत, सरचिटणीस नामदेव कावरखे, दिगंबर पोपळघट, ग्यानदेव जगताप आदींच्या स्वाक्षऱ्या आहे.
आंदोलनाचे हत्यार उपसताच शिक्षण विभागाने तत्काळ लेखी आश्वासन देत धरणे आंदोलन मागे घेण्याचे आवाहन केले.

# कार्यकर्त्यांच्या प्रयत्नामुळेच माझा विजय- आ. मुटकुळे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ डिसेंबर**
विधानसभा निवडणुकीत भाजपचे पदाधिकारी, बुथ अध्यक्ष, पन्ना प्रमुख आदींनी जीवाचे रान करीत प्रचार केला. सर्व कार्यकर्त्यांच्या प्रयत्नामुळेच मी हिंगोली मतदारसंघातून तिसऱ्यांदा विजयी झालो, असे उद्‌गार भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी काढले.
येथील अथर्व लॉजमध्ये भारतीय जनता पक्षाच्या बुथ अध्यक्षांसह पदाधिकारी व कार्यकर्ते यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, माजी आ. रामराव वडकुते, माजी आ. गजाननराव घुगे, शहराध्यक्ष कैलाशचंद काबरा, विहिंपचे जिल्हाध्यक्ष डॉ मुरलीधर तोष्णीवाल आदींची उप-स्थिती होती.
यावेळी भारतीय जनता पक्षाच्यावतीने भाजपचे आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बोलतांना आ. मुटकुळे म्हणाले की, माझ्या विजयाचे सर्व श्रेय भारतीय जनता पक्षातील सामान्य कार्यकर्त्यांपासून ते सर्व पदाधिकारी, बुथ अध्यक्ष यांना देतो. निवडणुकीच्या काळात रात्रंदिवस काम करून प्रचार करून तुम्ही सर्वांनी मला तिसऱ्यांदा विधानसभेवर पाठविले आहे. त्यामुळे आता माझी जबाबदारी वाढली असून कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी मी कटीबध्द आहे. हिंगोली विधानसभा मतदारसंघातील मागील दहा वर्षाच्या कालावधीत विधानसभा मतदारसंघात विकासाची कामे केली आहेत. ही कामे पुढेही चालूच राहणार असून आगामी काळात हिंगोली विधानसभा मतदारसंघात विकासाची गंगा अशीच चालू ठेवणार आहे. हिंगोली मतदारसंघातील नागरिकांनी मला विजयी केल्याबद्दल त्यांचेही यावेळी आ. मुटकुळेंनी आभार मानले.



**हिंगोली- येथील भाजपच्या जिल्हा कार्यालयात लोकनेते स्व गोपीनाथराव मुंडे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी स्व गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रतिमेस आ. मुटकुळे यांनी पुष्पहार अर्पण करीत आदरांजली वाहीली. यावेळी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी आ. रामराव वडकुते, माजी आ. गजानन घुगे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, मोतीराम इंगोले, कैलाश काबरा, प्रशांत सोनी, शाम खंडेलवाल, सरचिटणीस उमेश नागरे, संजय ढोके, गुड्डू देवकते, उमेश गुठ्ठे, मनोज शर्मा आदी. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### कुरूंदा येथील अवैध धंद्यांना कोणाचे पाठबळ?

वसमत- तालुक्यातील मोठी बाजारपेठ असलेले कुरुंदा हे गाव हळदीचे व्यापार पेठ म्हणून अख्ख्या मराठवाड्यात ओळखला जा-तो. परंतु हे गाव आता हळूहळू गुटखा, मटका, दारू व अवैध धंद्याने ओळखण्यास सुरुवात झाली आहे. पोलीस विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत हद्दीत अवैध धंदे चालवणाऱ्यावर कारवाई करून गुन्हे दाखल करण्याचे आदेश सतत येत असले तरी स्थानिक पोलीस अधिकारी हे कुठलीच भूमिका घेत नसल्याने चर्चेला उलट सुलट उदान आले आहे. मात्र एवढ्या मोठ्या प्रमाणात गुटखा, मटका, जुगार सह अवैध धंदे चालवणाऱ्यांना अखेर कोणाचे पाठबळ आहे हे अजूनही गुलदस्त्यातच आहे. आता याकडे पोलीस विभागाच्या विशेष पथकाने लक्ष घालून एवढ्या मोठ्या प्रमाणात गावात गुटखा येते केव्हा? कुठून येते? एवढा मोठा साठा कुठे ठेवतात? या पाठीम-ागचे धागेदोरे शोधून मुख्य आरोपीला अटक करावी अशी मागणी होत आहे.

### चेकींग दरम्यान दुचाकी निघाली चोरीची



हिंगोली- शहरात पोलिस विभागाच्यावतीने दुचाकी वाहनांची तप-ासणी तसेच ट्रीपल सीट दुचाकीवर कार्यवाही करण्यात येत आहे. गुरूवारी बंदोबस्ता दरम्यान स्थागुशाचे पोनि विकास पाटील आणि सपोनि शिवसांब घेवारे यांनी एका ट्रीपल सीटर दुचाकीला अडवले. तपासणी केली असता सदरील दुचाकी ही चोरीची निघाली. यावेळी अधिक चौकशी केली असता सदरील दुचाकीस्वार हे परराज्यातील असून त्यांनी मुंदडा नामक व्यक्तीकडून गाडी विकत घेतल्याचे सांगितले. आणखी काही गाड्यांचीही यावेळी चौकशी करण्यात येत आहे.

### पोलिसांची २१ वाहन चालकांविरूध्द कार्यवाही

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २१ वाहनचालकांविरूध्द पोलिसांनी कार्यवाही करीत त्यांच्याकडून १४ हजार ५०० रूपयांचा दंड वसूल केला आहे तसेच जुगार कायद्यांतर्गत जिल्ह्यात अवैध दारू विक्री करणाऱ्या ६ ठिकाणी पोलिसांनी छापे टाकले. या छापेमारीत पोलिसांनी आरोपीतांकडून ३३ हजार २२० किंमतीचा मुद्देमाल जप्त करीत आरोपीताविरूध्द जुगार कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# परभणी घटनेच्या निषेधार्थ वसमतमध्ये बंदला शंभर टक्के प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १२ डिसेंबर**
परभणी येथील रेल्वे स्टेशन समोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळील पूर्णकृती संविधान प्रतिकृतीची विटंबना झाली. हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथे बुधवार रोजी आंबेडकर चळवळीतील सर्वच पक्षीय नेत्यांनी बंद पुकारला होता. त्या बंदला वसमत शहरातील सर्वच व्यापारी दुकानदार यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देऊन बंद पाडले. कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडला नाही. शांततेत बंद पाळल्या गेला. यावेळी वसमत येथील सकल मुस्लिम समाजातर्फे उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदना मार्फत मुस्लिम समाजाने निषेध नोंदविला आहे तसेच हा देश संविधानाने चा-लेल घोषणाबाजी करण्यात आली. देशाचे संविधान हे कुण्या एका जातीचे नसून देशाचे संविधान आहे. या संविधानावर हल्ला म्हणजे देशाच्या छातीवर हल्ला जे कुणी हल्या मागे आहे किंवा करण्यास भाग पाडले अशा गुन्हेगारांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. तसेच आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली.

# अनुसूचीत जमातीच्या लाभार्थ्यांसाठी निवासी उद्योजकता प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ डिसेंबर**
उद्योग संचालनालय महाराष्ट्र शासन मुंबई पुरस्कृत व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र हिंगोली आयोजित, महाराष्ट्र उद्योजक व्यापार व गुंतवणूक सुलभता कक्ष ( मैत्री) व जिल्हा उद्योग केंद्राच्या सहकार्याने अनुसूचित जमाती लाभार्थ्यांसाठी निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत १८ दिवशीय प्रशिक्षणाचे आयोजन दि. २० डिसेंबरपासून करण्यात येणार आहे.
या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या मुल-ाखती दि. १८ डिसेंबर, २०२४ रोजी सकाळी ११ वाजता आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय हॉल, कळमनुरी येथे होणार आहेत. यासाठी पात्र लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन निवड करण्यात येणार आहे. नियमितपणे उपस्थित राहून प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या लाभार्थींना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.
या कार्यक्रमात जिल्ह्यात उप-लब्ध असलेल्या अन्न प्रक्रिया उद्योग, दाल मिल, ऑईल मिल, हळद पावडर, मिरची पावडर, मसाले उद्योग, पापड उद्योग, बेकरी उत्पादन, शेवया उद्योग, वेफर्स, गारमेंट, केस व त्वचा निगा आदी उपलब्ध संधीबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.
यासोबतच उद्योजकीय व्यक्तिमत्व विकास , विविध व्यवसाय संधी, संवाद कौशल्य, शासकीय, निमशासकीय व इतर महामंडळाच्या कर्ज व अनुदान योजना, बँकेची भूमिका, प्रकल्प अहवाल, मार्केटींग, व्यवसाय व्यवस्थापन इत्यादीबाबत म ार्गदर्शन करण्यात येणार आहे.
प्रवेश व अधिक माहितीसाठी म हाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे कार्यक्रम समन्वयक सिध्दार्थ थोरात (मो.९५५२१८३०३८) यांच्याशी दि. १५ डिसेंबरपर्यंत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, एस-१२, प्रशासकीय इमारत, हिंगोली येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा उद्य-ोग केंद्राचे महाव्यवस्थापक व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे प्रकल्प अधिकारी यांनी केले आहे.

# कुरूंद्यातील जिल्हा परिषद प्रशालेत रंगले माजी विद्यार्थ्यांचे स्नहेसंमेलन



**तभा वृत्तसेवा**
**कुरूंदा, १२ डिसेंबर**
रंगबिरंगी फुलांची सजावट, शाळेत प्रवेश करताच भव्य दिव्य रांगोळी, स्वागतासाठी लाल कार्पेट, सर्वांच्या डोक्यावर लाल फेटे, यातच प्रत्येक जण आलेल्या मित्र-मैत्रिणींना आपुलकीने भेटून विचारपूस करत होता. त्यावेळी त्यांच्या डोळ्यात एक वेगळाच आनंद पहायला मिळाला. हे चित्र होते वसमत तालुक्यातील कुरुंदा येथील जिल्हा परिषद प्रशालेतील १९९६-९७ मधील दहावीच्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांच्या रविवारच्या स्नेहमेळाव्याचे. २७ वर्षांनंतर एकत्र आलेल्या या बालमित्रांचा स्नेह मेळावा उत्साहात पार पडला. वर्गमित्र-मैत्रिणींनी आपुलकीने एकमेकांची विच-ारपूस करत जुन्या आठवणींना उजाळा देत पुन्हा एकदा विद्यार्थी होण्याचा आनंद घेतला.
स्नेहमेळाव्याच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त शारीरिक शिक्षक दडके होते. यावेळी सेवानिवृत्त शिक्षक बा. ना. देशमुख, टी. आर. काळे, शंकरराव दळवी, गाडे, के. डी. इंगोले, रत्नपारखी, पांचाळ, तिवारी, लिंगायत, कांबळे, धोंडे, कुरुंदे मामा आदी उप-स्थित होते. शिक्षकांनी आपल्या मनोगतात त्यावेळी विद्यार्थ्यांनी खोड्या केल्यानंतर केलेल्या शिक्षेबद्दल माहिती दिली. त्यावेळी केलेल्या शिक्षेमुळे आज तुम्ही विविध पदावर कार्यरत असल्याचे सांगितले. यापुढेही तुम्ही असेच एकत्र रहावे. उत्तरोत्तर तुमची भरभराट व्हावी, असे आशीर्वाद दिले. कार्यक्रम ाचे सूत्रसंचालन विजय सिद्धेवार यांनी केले. तर प्रास्ताविक प्रा. दीपमाला पाटोदे यांनी केले. सध्या विविध पदांवर असलेल्या या बालमित्रांनी दिवसभर सर्व विसरून रविवारी भरवलेल्या शाळेचा मनम ुराद आनंद लुटला. आपले संपूर्ण आयुष्य समाज सेवेसाठी दिलेल्या भंतेजी युवराज कांबळे यांच्या मनोगताने सर्वजण भारावून गेले. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रम यशस्वीतेसाठी दीपक गुंडय्या, बबन पांचाळ, चांदू काळे, देवानंद दळवी, संतोष इंगोले, गंगुताई त्रिमल्ले, आशुतोष गुरुडे, सोमनाथ भद्रे, शेख फयुम, शेख फेरोज आदींनी परिश्रम घेतले.

**सर्व विद्यार्थ्यांनी दिला आठवणींना उजाळा**
प्रारंभी स्नेहमेळाव्याला उपस्थित सर्व मित्र-मैत्रिणींना मनोगत व्यक्त केले. आपला परिचय देत आपण कुठल्या पदावर काम करतो, कौटुंबिक पार्श्वभूमी सांगत लहानपणीच्या आठवणींना उजाळा दिला. शिक्षकांनी त्यावेळी केलेल्या संस्कारामुळे आज आम्ही कसे घडलो, याबद्दल सांगितले. यापुढे पुन्हा पुन्हा एकत्र येऊ, असा विश्वास सर्व मित्र व मैत्रिणींनी व्यक्त केला.

**शाळेच्या प्रवेशद्वारापासून रॅली आणि राष्ट्रगीत**
प्रारंभी सर्व बालमित्रांनी डोक्यावर फेटे परिधान करून शाळेच्या प्रवेशद्वारापासून एका रांगेत येत शाळेपुढे सामूहिक राष्ट्रगीत म्हटले. यावेळी राष्ट्रगीताची ऑर्डरही दडके यांनी दिली. राष्ट्रगीताच्या माध्यम ातून सर्व विद्यार्थी पुन्हा एकदा शाळेच्या आठवणीत रमले. त्यावेळी त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून आले.